# गांधी-गंगा

(मराठी)

संपादकः महेन्द्र मेघाणी

अनुवादः प्रा. डो. मुरलीधर शाह



संक्षिप्त

# गांधी-गंगा

संपादक

**महेन्द्र मेघाणी**

संकलन व अनुवाद

**प्रा. डॉ. मुरलीधर शाह**


पहिली आवृत्ती, नोव्हेंबर २००९

ISBN: 978-81-7229-408-3

मुद्रक व प्रकाशक

विवेक जितेंद्र देसाई

**नवजीवन मुद्रणालय**, अहमदाबाद-३८० ०१४

फोन ; ०७९ - २७५४०६३५, २७०४२६३४

E-mail : sales@navajivantrust.org

Website : www.navajivantrust.org

# प्रकाशकाचे निवेदन

पुस्तकांच्या प्रचारास 'पुण्याच्या व्यापारा'चा दर्जा देणारे श्री महेंद्रभाई मेघाणी दररोज आपल्या नवनवीन लिखाणांद्वारे चांगल्या पुस्तकांच्या प्रसाराचे, ‘पुण्याच्या व्यापारा'चे काम आयुष्यभर सातत्याने करीत आले आहेत.

ते एक चांगले अनुवादक आणि तटस्थ संपादक तर आहेतच; परंतू त्याचबरोबर त्यांचे वाचन व्यापक आणि निवड बेमिसाल आहे. त्याचाच परिपाक म्हणून आम्हाला 'गांधी-गंगा'चे दोन भाग त्यांच्याकडून मिळाले. गांधीजींचे समकालीन, साथीदार, गांधीजींच्या घराण्यातील लेखक तसेच गुजराती भाषेतील जाणकार साहित्यिकांनी गांधीजींबद्दल आठवणींच्या रूपात, प्रसंगांच्या रूपात, कवितेच्या रूपात आणि कथा-कहाण्यांच्या रूपात कित्येक गोष्टी लिहिलेल्या आहेत. महेंद्रभाईनी एकूण बाहत्तर पुस्तकांमधून जवळजवळ तीनशेपेक्षा अधिक स्मरणीय प्रसंग, संस्मरणे, कविता, कथा-गोष्टींचे संपादन 'गांधी-गंगा'च्या दोन भागांतून केले आहे.

घटना आणि संस्मरणांमधून सांगितलेल्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या अधिक लक्षात राहतात, ह्या दृष्टीकोनातूनच 'गांधी-गंगा'च्या दोन भागांमधील निवडक तसेच प्रभावी ८८ घटना व संस्मरणांची ही संक्षिप्त आवृत्ती तयार करण्यात आली आहे. आपण गंगेचे पूजन करताना गंगाजल हातात घेऊन तेच अर्ध्य म्हणून अर्पण करतो. 'गांधी-गंगा'ची ही संक्षिप्त आवृत्ती सामान्य वाचकांसाठी गंगाजलाप्रमाणे ठरेल आणि वाचक त्याचे सढळ हाताने स्वागत करतील, याची आम्हाला खात्री आहे.

ह्या संक्षिप्त आवृत्तीच्या संपादन आणि प्रकाशनास परवानगी दिल्याबद्दल आम्ही श्री महेंद्रभाई मेघाणींचे आभारी आहोत. तसेच पुस्तकाचा प्रभावी अनुवाद करणारे श्री मु. ब. शहा यांचेही आभार मानतो.

# अनुवादकाचे मनोगत

श्री. सोमैय्या टी. आर. के. मुंबई सर्वोदय मंडळ यांनी एकदा श्री. महेंद्र मेघाणी यांनी संपादित केलेल्या 'गांधी-गंगा' या गुजराथी पुस्तकाचे दोन भाग माझ्याकडे पाठवले. दोन्ही पुस्तके अत्त्युतम होती. त्यांच्या काही निवडक आठवणींचा हा अनुवादित संग्रह 'दै. लोकमत' चे संपादक श्री. विजय बाविस्कर यांनी सलग प्रसिद्ध केला.

या पुस्तकात तसा लेखक व आठवणींचा नेमका कालक्रम नाही. थोड्या फार फरकाने वयाच्या व कर्तृत्वाच्या ज्येष्ठतेचा क्रम आहे, पण तो ही परिपूर्ण म्हणता येणार नाही.

'गांधी-गंगे'तील प्रसंग मोहनदास करमचंद गांधी या साध्या माणसाचा 'महात्मा' कसा झाला या संबंधीचे निदर्शक आहेत. या 'गांधी-गंगे'त जो कुणी अवगाहन करेल तो पुनीत होईल. श्री. सोमैय्या काका, श्री महेंद्र मेघाणी, श्री. विजय बाविस्कर यांचे मनापासून आभार.

हे पुस्तक 'नवजीवन प्रकाशन मंदिर' मार्फत प्रकाशित होत आहे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे.

- मु. ब. शहा

# अनुक्रमणिका


**मो. क. गांधी**

१. तिरस्कार

**विनोबा**

२. ज्या गांधींना मी जाणतो
३. आता कुठे उजाडतंय
४. मलयगिरीचे गौरव गान

**लल्लूभाई पटेल**

५. ते दोन शब्द खोडले
६. तुपाचा दिवा
७. भाषणापूर्वीचे काम
८. असा ही एक धोबी
९. गरिबीमुळे कापरे सुटते

**मिली ग्रेहम पोलॅक**

१०. जोहान्सबर्गची सभा व सुराधारी तरूण

**उमाशंकर जोशी**

११. स्त्री चा दर्जा
१२. बचतीवर नजर
१३. राजाकडचा पाहुणचार
१४. कुठल्या तोंडाने खाऊ शकेन ?
१५. गरिबाची आई
१६. लाख मोलाची अधेली
१७. प्रथमत: माझे मस्तक फोडा
१८. दोघेही गप्प बसून होतो
१९. 'महात्मा' म्हणू नका!

**काका कालेलकर**

२०. कंठस्थ 'गीता'
२१. चाळीस हजार परत दिले
२२. अस्पृश्यता ठेवण्याच्या अटीपायी
२३. धर्मयुद्धाचे नियम
२४. अवघड शिस्त
२५. पापाचाही प्रतिनिधी
२६. आईसारखे वात्सल्य
२७. राजनैतिक कैदी
२८. खरा खेळाडू
२९. तीन तपाची स्वराज्य सेवा
३०. सत्यनिष्ठेची पूजा
३१. सनातनी असूनही सुधारक
३२. साबरमतीहून येरवड्यात
३३. तुरुंगातले वाचन
३४. लंगडणारा दत्तोबा
३५. किंग अल्फ्रेड
३६. पाठवणी

**जुगतराम दवे**

३७. आश्रमीय जीवन
३८. नवजीवन

**शहानवाज खान**

३९. जिंदगीभर गुंजते रहेंगे

**रविशंकर महाराज**

४०. जेवढे आहे जेवढे तर वापरा

**रामनारायण पाठक**

४१. विरोधी शक्तिंचा समन्वय

**शंकरलाल बँकर**

४२. हरहुन्नरी मुत्सद्दी

४३. मग तुम्हाला काय सिनेमा काढायला सांगू?
४४. विश्वामित्र असे का वागले?

**नरहरी पारेख**
४५. महादेवभाईची डायरी

**घनश्यामदास बिरला**
४६. रोग्याच्या मृत्यूशय्येवर

**बलवंतसिंह**
४७. चिडिया चुग गयी खेत

**बापूंचे आर्शिवाद**
४८. निःस्वार्थ सेवेमुळेच हृदयाला स्पर्श करता येईल

**क्लेर शेरीडन**
४९. विलक्षण साधेपणा

**धीरूभाई ठाकर**
५०. भव्योज्जवल जीवनाची चिरप्रतिष्ठा

**इंदूलाल याज्ञिक**
५१. ऐतिहासिक सभा

**तनसुख भट्ट**
५२. वेगळ्या पद्धतीची अहिंसा

**मुकुलभाई कलार्थी**
५३. मोची बापू !
५४. चूक-भूल माफ करा !
५५. उत्तम गाता आले तरच गा
५६. इतके घाबरता का?

**जुगतराम दवे**
७२. आश्रम

५७. आज्ञा-पालन
५८. आपण असलो तर फरक पडतो ना !
५९. तुम्ही? आणि मला भीता?
६०. जर बा ने खाल्ले नाही तर मी खाईन

**रावजीभाई पटेल**
६१. 'गीते' चा गूढार्थ
६२. सगळ्यांचे बापूजी

**हरिप्रसाद देसाई**
६३. नवी पेढी वसवायची आहे

**गुणवंत शहा**
६४. जटायू जिवंत झाला !

**महेंद्र मेघाणी**
६५. विस्कटलेल्या मैफलीचे पतंग
६६. गांधी हृदयातल्या तीन मूर्ती

**केशुभाई भावसार**
६७. समन्वयी गांधीजी

**मनु गांधी**
६८. बोलण्यापेक्षा करणे चांगले
६९. दोन डब्यांचा परिग्रह

**आदम घोडावाला**
७०. आपण प्रासंगिक आहोत का?

**जगदीश चावडा**
७१. आफताब

**अमृतलाल बेगड**
८०. अहिंसेला युद्धाच्या मैदानात आणणारे

७३. डबा हेच घर ! डबा हाच आश्रम!

७४. आनंदी सत्याग्रही

**जोसेफ डोक**

७५. कथानायक

**जिवतराम कृपलानी**

७६. गांधीजी आधुनिक होते का ?

**मिर्झा इस्माईल**

७७. संत, मुत्सद्दी, राष्ट्रविधायक

**वल्लभभाई पटेल**

७८. अंगणात वाहणारी गंगा

**जॉन हेन्स होम्स**

७९. एक नरोत्तम

**नगीनदास संघवी**

८१. एक छोटे कर्णफुल

**चंद्रशेखर प्रा. शुक्ल**

८२. गरिबीवर मात करणारा आळस

८३. स्वच्छतेचा धडा

**महादेवभाई देसाई**

८४. वियोग दुःख

**रवींद्रनाथ टागोर**

८५. हृदयी ज्वालामुखी आणि नयनी अमृतधार

**लुई फिशर**

८६. गांधीजी आणि रवींद्रनाथ टागोर

**प्यारेलाल नय्यर**

८७. लहान लहानशा गोष्टींमुळेच जीवन घडते

८८. शेवटचा दिवस

## मो. क. गांधी

## १. तिरस्कार ?

या जगात कुणाचाही तिरस्कार करणे मला जवळ-जवळ अशक्य होते. ईश्वर परायणतेमुळे मी खूप संयमी जीवन जगू शकलो व गेली चाळीस वर्ष कुणाचाही द्वेष करणे मला शक्य झाले नाही. हा एक खूप मोठा दावा आहे हे मी जाणतो, तरी अत्यंत नम्रतापूर्वक मी तो प्रस्तुत करतो. जेथे जेथे दुष्कर्म होत असेल, तेथे तेथे त्याचा धिक्कार करायला मी समर्थ आहे, तसे करतोही. पण इंग्रज प्रशासनाने भारतात जी शिरजोरी चालवली आहे त्याचा केवळ धिक्कारच करीत नाही, तर द्वेषही करतो. हिंदुस्तानाचे अत्यंत निर्दयपणे शोषण करणाऱ्या या नीतीचा मी हृदयापासून धिक्कार करतो. त्याप्रमाणे ज्या धृणित प्रथेचे कोट्यवधी हिंदू समर्थन करतात त्या अस्पृश्यतेचाही मी धिक्कार करतो, मात्र शिरजोरी करणाऱ्या इंग्रजांना किंवा हिंदूना मी धिक्कारात नाही, कारण प्रेमाने किंवा अन्य उपायांनी त्यांचे हृदय परिवर्तन करता येईल असे मला अजूनही वाटते.

# विनोबा

## २. ज्या गांधीना मी जाणतो

गांधीजींना सगळा देश बापू म्हणत होता. पण मला असे वाटते की, ते ‘पित्या’ पेक्षा 'माता' अधिक होते. आपण जेव्हा जेव्हा त्यांची आठवण करतो तेव्हा तेव्हा दुसऱ्या कुठल्याही गुणांपेक्षा त्यांचे वात्सल्य अधिक आठवते. जुन्या परंपरेचे फळ व नव्या परंपरचे बीज म्हणून एका वत्सल मातेसमान महापुरुषाचे दर्शन आपल्याला बापूजींमध्ये होते. 'गीते' च्या कर्मयोगाचे प्रत्यक्ष आचरण मी बापूमध्ये पाहिले. स्थितप्रज्ञाची लक्षणे ज्याला लागू पडतात असा शरीरधारी क्वचितच आढळेल. पण या लक्षणांच्या खूप जवळ पोहचलेल्या महापुरुषाला मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिले. त्यांच्या आश्रयाला मला राहता आले हे माझे भाग्यच. त्यांचा आश्रय घेणाऱ्या प्रत्येकाला याचा अनुभव येतो की, आधी आपण वाईट होतो पण नंतर चांगले झालो, लहान होतो पण नंतर मोठे झालो. हजारो लोकांचे महत्त्व त्यांनी वाढवले.

गांधीजींचे काही विचार लोकांना आवडत नाहीत. तर कुणीतरी त्यांना म्हणायचे. ‘तुम्ही आता हिमालयात जाणेच योग्य.’ बापू त्याला हसून उत्तर देत. जर तुम्ही हिमालयात गेलात तर मी तुमच्या पाठोपाठ येईनच, आणि जर तुम्ही येथेच राहिलात तर तुमचा हा सेवक तुमची सेवा करायला इथेच राहील. 'जेथे स्वामी तेथे सेवक’ पुढे ते असेही म्हणत की, 'माझ्या तपस्येचा हिमालय तर तेथेच आहे, जेथे दारिद्र्य आहे जेथले शोषण अजून दूर करावयाचे आहे व दु:ख निवारण बाकी आहे'.

एक नैतिक ध्वनि आला आणि सगळ्या देशाने त्याचे अनुकरण केले अशी कुठलीही संस्था किंवा व्यक्ती सध्या देशात दिसत नाही. वेगवेगळ्या पक्षाचे नेते जनतेपुढे जाऊन एक दुसऱ्यांवर चिखल उडवितात. यामुळे जनतेत कुठलीही कार्यशीलाता निर्माण होत नाही. देशात एक प्रकारची निष्क्रियता, शून्यता आणि रिकामेपण आले आहे. जनता भ्रमित आहे व काय करावे हे तिला सुचत नाही?

# ३. आता कुठे उजाडतंय

स्वराज्य मिळाले आणि ईश्वराने गांधीजींना उचलून नेले. ईश्वराचा हेतू जाणणे मनुष्याच्या लेखी कठीणच, तरी चिंतनाने आपण त्याचे अनुमान करू  शकतो, आपल्या देशाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले यापेक्षा ईश्वराची इच्छा वेगळी असती तर त्याने गांधीजींना आपल्यात राहू दिले असते. पण देश सर्व प्रकारच्या पराधीनतेमधून बाहेर पडावा असे त्याला वाटत होते. इंग्रजांच्या जाण्यामुळे बाहेरचा असलेला दबाव तर गेला. गांधीजींना घेऊन ईश्वराने आपली बुद्धी डळमळीत करून टाकली जणू ते आपल्याला सांगत आहेत की ‘तुम्ही लोक सर्वथा स्वतंत्र आहात. स्वतंत्र बुद्धीने विचार करा व खऱ्या अर्थाने स्वतंत्र बना, मनुष्य कितीही महान असला तरी तो काय सर्व देशाला स्वराज्य देऊ शकेल? माझी झोप मलाच पार पाडावी लागते.'

त्याप्रमाणे माझे स्वराज्य पण मलाच मिळवावे लागेल. परमेश्वर नेहमी आपल्यासाठी वरून महापुरुष पाठवणार असेल तर त्याने आपली उन्नती होईलच असे नाही. ईश्वर वारंवार अवतार घेत नाही, ही सुद्धा त्याची कृपाच समजायला हवी. लोक असं म्हणतात की गांधीजीनंतर सर्वत्र अंधार पसरला आहे. माझे म्हणणे असे की उजाडायला सुरूवात झाली आहे. डोळे उघडले तर लक्षात येईल. गांधीजी वारंवार हे सांगत होते की, मी जे काही सांगतो त्यावर तुम्ही स्वतंत्र बुद्धीने विचार करा; आणि ते पटले तरच त्याप्रमाणे वागा. पण आपण विचार करण्याचे श्रमसुद्धा न घेता केवळ त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालत राहिलो, म्हणून ईश्वरानेच असे ठरवले की आता या लोकांना विचार करण्याचा त्रास द्यावाच लागेल.

# ४. मलयगिरीचे गौरव गान

वडाच्या झाडाच्या सावलीत इतर लहान झुडपे वाढत नाहीत. या करता की लहान झाडांना मिळणारे पोषण मोठे झाड खेचून घेते. ह्या उदाहरणावरून असे म्हणता येते की, मोठ्या पुरूषांच्या आश्रयाने छोटी माणसे वाढत नाहीत.

पण मोठी माणसे वेगळी व महापुरूष वेगळे. महापुरूष महत्त्वाकांक्षी म्हणजे स्वार्थी नसतात. ते महानच असतात. ते इतरांचे पोषण घेत नाहीत. उलट इतरांना पोसत असतात. त्यांना वत्सल गायीची उपमा देता येऊ शकेल. गाय स्वत:चे दूध पाजून वासराचे पोषण करते. त्यामुळे वासरू रोज वाढते. आपल्यामुळे सर्वांची उन्नती व्हावी ही महापुरूषांची आकांक्षा असते. दुसऱ्यांना उन्नत करण्यासाठी ते नम्र होतात, खाली वाकतात. बापूजींच्या जीवनात आपण हा 'गोवत्स न्याय' प्रत्यक्ष बघू शकतो. त्यांचा आश्रय ज्यांनी घेतला ते लहानाचे मोठे झाले. जे खोटे होते ते खरे झाले. कठोर होते ते कोमल बनले. बापूजींच्या सोबत असलेला प्रत्येक जण स्वत:च्या अनुभवातून हेच सांगेल. एका कवीने लिहिले आहे 'ज्याच्या आश्रयाला असलेले वृक्ष जसेच्या तसे राहतात तो सुवर्णगिरी किंवा रजतगिरी का असेना. पण आम्ही त्याचा गौरव करीत नाही. आम्ही गौरव करतो मलय पर्वताचा कारण त्याच्या आश्रयाने सामान्य वृक्षसुद्धा चंदनाचे बनून जातात.’

# लल्लूभाई पटेल

## ५. ते दोन शब्द खोडले

कलकत्त्यात हिंदू-मुसलमानांच्या दंगली सुरूच होत्या. एका टोळक्याने गांधीजी राहात होते त्या घरावरच हल्ला चढवला. दरवाजे-खिडक्या तोडून त्यांनी फर्निचरचेही नुकसान केले. गांधीजींवरही विटा फेकल्या पण सुदैवाने कुणालाच इजा झाली नाही. या घटनेमुळे ते गहन विचारात बुडाले. त्यांनी  उपवासाचा निर्णय जाहीर केला. त्यांनी सांगितले की, भान हरपलेल्या कलकत्त्याला ठिकाणावर आणण्यासाठी मी उपवास करतोय. माझा धर्म म्हणतो की, घरोघर फिरून तू लोकांना स्वतःचे मतभेद विसरून पुनश्च एक व्हायला सांगायला हवे. पण आता या वयात ते शक्य नाही. म्हणून मी उपवासाचा आश्रय घेतलाय. उपवासात पाणी, सोडा व लिंबूचा रस घेण्याविषयी निवेदनातच त्यांनी म्हटले होते. राजाजी त्यावेळी बंगालचे गव्हर्नर होते. त्यांना वाटले की, लिंबुचा रस घेणे गांधीजींनी ज्या अर्थी ठरवले आहे, त्याअर्थी उपवास सोडण्यासंबंधी त्यांच्याशी बोलण्याची संधी आहे, राजाजींनी गांधीजींची भेट घेऊन त्यांना उपवास न करण्याची कारणे सांगितली. ते म्हणाले 'उपवासच करायचा असेल तर मग हा लिंबूचा रस तरी कशाला हवा?' गांधीजींनी निर्मलबाबूंकडे पाहिले आणि म्हणाले 'माझे निवेदन तुम्ही तपासले तेव्हा ही गोष्ट तुमच्या लक्षात कशी आली नाही ? राजाजी मला गेली कित्येक वर्षे ओळखत आहेत आणि त्यामुळे त्यांनी माझी दुबळी नस अगदी बरोबर पकडली. माझ्या मनात खोलवर कुठेतरी ही आशा होती की, आपण हा उपवास पार पाडू शकू. लिंबूचा उल्लेख मी त्यामुळेच केला.’ असे म्हणून त्यांनी पेन्सिल उचलली व निवेदनातले 'लिंबूचा रस' हे शब्द खोडून टाकले !

## ६. तुपाचा दिवा

त्या दिवशी सेवाग्राममध्ये नित्य सायंप्रार्थनेनंतर बापू प्रवचन करणार होते. त्या दिवशी गांधी जयंती होती. त्यामुळे जवळपासच्या गावांमधीलही बरेच लोक प्रार्थनेत हजर होते. गांधीजींसाठी एक उंच आसन तयार करण्यात आले होते. कुठल्याही पद्धतीची सजावट नव्हती. फक्त सफेद खादीने ती बैठक सुशोभित करण्यात आली होती. दूर एका ताम्हनात तुपाचा एक दिवा जळत होता.  गांधीजी आले. त्यांचे लक्ष त्या दिव्याकडे गेले. त्यांनी डोळे बंद केले व प्रार्थना सुरु झाली. प्रार्थनेनंतर काही बोलायला सुरुवात करण्याआधी बापूंनी प्रशन केला. “हे ताम्हन कुणी आणले?” बा म्हणाल्या...” “ते मी आणले आहे” बापू - “कुठून मागवले?” बा - “गावातून.” क्षणभर गांधीजी बा कडे पहात राहिले. स्वत:च्या पतीला दीर्घायुष्य व आरोग्य लाभावे यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करणे हा प्रत्येक हिंदू स्त्रीचा धर्म आहे असे मानून कस्तुरबानी ते ताम्हन मागवले व दिवा लावला.

मग बापूंनी हा प्रश्न का विचारला ते बा ना कळले नाही. गांधीजी म्हणाले, “आज सर्वांत वाईट काम कुठले झाले असेल ते हे की बा ने ताम्हन मागावून त्यात तुपाचा दिवा लावला. आज माझा जन्मदिवस आहे. त्यासाठी हा दिवा लावण्यात आला ? माझ्या जवळपासच्या गावातील लोकांचे जगणे मी रोज पाहात असतो. भाकरीवर लावायला त्यांना साधे तेलाचे दोन थेंबसुद्धा मिळत नाही आणि आज माझ्या आश्रमात तुपाचा दिवा जळतोय ! आज माझा जन्मदिवस असला म्हणून काय झाले ? आज तर सत्कर्म करायला हवे. पाप नव्हे. गरीब खेडूतांना जी वस्तू मिळत नाही, त्याचा दुरूपयोग करण्याची परवानगी आपल्याला कुणी दिली ?”

## ७. भाषणापूर्वीचे काम

एकदा गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून लंडनला गेले. आफ्रिकेतले एक महान नेते म्हणून त्यांची कीर्ती लंडनमध्ये पोहचली होती. त्यावेळेला लंडनमध्ये बरीच हिंदी माणसे राहायची. त्यात अनेक क्रांतिकारी युवक होते व कितीतरी विद्यार्थी. त्या सर्वांना भारताचे स्वातंत्र्य हवे होते. गांधीजींच्या उपस्थितीचा फायदा घेऊन त्यांनी एक समारंभ ठरवला. कार्यक्रम एवढाच की आधी जेवण व नंतर भाषणे.

युवकांनी गांधीजींना अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. ती स्वीकारताना त्यांनी एकच अट घातली की, जेवण पूर्णत: शाकाहारी असेल व त्यात दारूचा समावेश नसेल. युवकांनी ही अट मान्य केली. आफ्रिकेच्या संघर्षातील विजेते गांधीजी अध्यक्ष म्हणून लाभले, यातच मुले खुश होती. मुलांनी ताटे साफ करणे, भाजी निवडणे वगैरे कामे स्वत: हौसेने केली. गांधीजी पण समारंभापूर्वी सहा तास आधी तेथे पोहचले व शांतपणे मुलांसोबत कामाला लागले. कुणाचा याची कल्पनाही नव्हती की समारंभाचे अध्यक्ष गांधीजी त्यांच्यात बसून भांडी साफ करीत आहेत.

समारंभाची वेळ व्हायला आली. नेते मंडळी दरवाज्याजवळ गांधीजींच्या स्वागतासाठी उभे राहिले. पण गांधीजी आले नव्हते. कुणीतरी सांगितले की आज गांधीजींना बहुदा उशीर होतोय. तेव्हा आधी भोजनाची व्यवस्था नीट पाहून घेऊ या. एक नेता आत गेला. एक सडसडीत शरीरयष्टीचा युवक इतर युवकांसोबत स्वयंपाक घरातली काम करीत होता. त्यांच्यावर दृष्टी जाताच तो अत्यंत आश्चर्याने त्यांना बघत राहिला. जणू काही सी.आय.डी चा मनुष्य तेथे घुसला असावा. एकाने विचारले 'कोण आहे तो?' त्या नेत्याने लाजेने खाली पहात म्हटले- 'आपल्या आजच्या समारंभाचे अध्यक्ष मि. गांधी !' कर्णोपकर्णी ही गोष्ट सर्वांना कळली. जे हॉलमध्ये येऊन बसले होते त्यांना कळले की अध्यक्ष तर स्वयंपाक घरात काम करीत होते !

काही म्हणाले 'पाहुण्यांकडून अशी कामे करून घ्यायची ? हे लाजिरवाणे आहे.' क्रांतिकारी युवकांना गांधीजींची ही रीत पाहून आश्चर्य वाटले. त्यांनी धावत जाऊन त्यांना काम बंद करण्याची विनंती केली. गांधीजींनी सांगितले, “थांबा, आता हे काम हातावेगळे करूनच उठू या” ताटे मांडली गेली. गांधीजींनी वाढण्यातसुद्धा भाग घेतला व नंतर अध्यक्षपदावरून एक मर्मस्पर्शी भाषणही केले.

# ८. असा ही एक धोबी !

दक्षिण आफ्रिकेत गांधीजींच्या नेतृत्वाखाली हिंदी लोकांनी सत्याग्रहाचा संघर्ष सुरू केला होता. मोठ्या संख्येने लोक तुरुंगात जात होते. त्यातले अनेक असे होते ज्यांच्या मागे त्यांच्या कुटुंबाकडे पहायला कुणीही नव्हते. अशा कुटुंबाची गांधीजींच्या टॉलस्टॉय फार्ममध्ये व्यवस्था करण्यात आली होती. तुरुंगातून सुटून आल्यानंतर गांधीजी फारच कामात असत, तरीही वेळ काढून ते या कुटुंबातील भगिनींना भेटत व आश्वासन देत. अनेकदा ते त्यांना घरकामात मदतही करत. एके दिवशी गांधीजी त्यांच्या जवळ गेले. त्यांनी त्या आयांना सांगितले 'आज तुम्हा सर्वांचे कपडे मी धुवून देतो. नदी लांब आहे व तुम्हाला लहान मुलांना सांभाळावे लागते. त्यांची शी-शू झालेले कपडेही मला देऊन टाका. “अरे गांधीभाईंना असे कपडे धुवायला कसे सांगता येईल ? आम्हीच ते धुवून टाकू.” प्रेम आणि संकोचाने त्या स्त्रियांनी उत्तर दिले. पण गांधीजी असे ऐकणार थोडेच होते. कपडे घेवून जाण्याविषयीचा त्यांचा आग्रह चालूच राहिला. भगिनींना फार संकोच वाटायचा.

पण शेवटी गांधीजींच्या प्रेमाचा व आग्रहाचा विजय झाला. सर्व कापडांचा एक भलामोठ्ठा गठ्ठा बांधून गांधीजींनी तो पाठीवर लादला व नदीकडे निघाले. तेथे गेल्यावर सर्व कपडे त्यांनी काळजीपूर्वक धुतले. नदीच्या काठावर ते वाळवले. त्यांच्या घड्या करून 'फॉर्म' वर आल्यावर ते घरोघर पोहचवूनसुद्धा दिले. त्या महान धोब्याने धुतलेले ते कपडे नेसताना त्या भगिनींना किती धन्यता वाटली असेल !

# ९. गरिबीमुळे कापरे सुटते

दिल्लीला कडाक्याची थंडी होती. गांधीजी त्या वेळेला बिर्ला भवनात राहत होते. सकाळी प्रार्थनेच्यावेळी ते हात गोठून जातील इतक्या थंड पाण्याने तोंड धुवायचे. ते दृष्य बघणाऱ्या कुणालाही वाटेल की त्यांनी गरम पाण्याने तोंड धुतले तर बरे. तशी कुणी सूचना केली तर ते नकार देत. म्हणत 'पाणी गरम करण्याचा बोझा इतरांवर कशासाठी लादायचा ?'

अशाच थंडीत सकाळची प्रार्थना आटोपल्यावर त्यांनी टपालात आलेल्या पण निकामी असलेल्या पाकिटांचा एक मोठा ढिग पाहिला. हातात कैची घेऊन ते ती पाकिटे कापायला बसले. एका बाजूला कोऱ्या कागदाची चळत ठेवून ते लिहिण्याचे पॅड तयार करित होते. या गरीब देशात कागदांची अशी नासाडी व्हावी हे त्यांना सहन होत नव्हते. पण पाकिटे कापता कापता त्यांचा हात थंडीने कापायला लागायचा. अशा जीवघेण्या थंडीत त्यांनी हे काम करू नये म्हणून कुणीतरी म्हणाले. ‘बापूजी, तुम्ही तर थंडीमुळे कापता आहात.’ बापूजी म्हणाले 'नाही'. थंडीमुळे मी कापत नाही. ही नैसर्गिक थंड हवा तर शरीरासाठी उपयुक्त असते. पण या देशाच्या आम जनतेचे दारिद्र्य आणि गरीबी यांचा विचार केला की कापरे सुटते.' व पाकिटे कापण्याचे काम त्यांनी सुरू ठेवले.

# मिली ग्रेहम पोलॅक

## १०. जोहान्सबर्गची सभा व सुराधारी तरूण

एके दिवशी जोहान्सबर्गमध्ये हिंदी लोक व त्यांच्या समर्थकांची सभा भरली होती. हॉल गर्दीमुळे तुडुंब भरलेला होता. एक तसूभर जागाही रिकामी नव्हती. लोक बाहेर व्हरांड्यात, दरवाज्यात व अंगणात उभे होते. गांधीजी मुख्य वक्ता होते. ते जेथे जेथे जात, तेथे त्यांना ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी व्हायची.

सभा संपली. गांधीजी व्यासपीठावरून उतरले. त्यांनी काही लोकांबरोबर थोडी चर्चा केली व मी आणि ते बाहेर पडलो. आम्ही दरवाजाच्या बाहेर पडलो तेव्हा अंधारात उभ्या असलेल्या एका माणसाला मी पाहिले. गांधीजींनीही त्याला हेरले असावे, कारण ते सरळ त्या माणसाकडेच गेले. त्याला काही सांगत होते. तो क्षणभर विचलित झाला; पण नंतर गांधीजींसोबत चालू लागला. मी त्यांच्या जवळूनच चालत होते. आम्ही एक गल्ली पार केली. ते दोघे काय बोलत आहेत हे मला कळत नव्हते. कारण ते दोघे फारच हळू आवाजात बोलत होते.

गल्लीच्या शेवटी त्या माणसाने गांधीजींच्या हातात एक वस्तू दिली व तो निघून गेला. त्या सगळ्या प्रसंगाने मी थोडी अस्वस्थ झाले. तो मनुष्य गेल्यानंतर मी विचारले, ‘त्याला काय हवे होते ? तो एखादी खास मागणी करण्यासाठी आला होता का ?’

गांधीजी शांतपणे म्हणाले 'हो, त्याला माझा जीव घ्यायचा होता. !’

‘तुमचा जीव ?' मला धक्काच बसला. ‘किती भयानक ? तो वेडा बिडा होता का ?' नाही, तो असे मानतो की मी त्यांच्या लोकांना धोका देत आहे. सरकारशी संगनमत करून मी हिंदी लोकांचे अहित करू इच्छितो आणि तरीही त्यांचा नेता म्हणून मिरवतो. 'पण असे मानणे हीच भयंकर दुष्टता आहे.' मी थोड्या जोरात बोलले. “त्याला पोलिसात द्यायला हवे होते. तुम्ही त्याला जाऊ कसे दिले ? तो कुणीतरी वेडा असावा.” गांधीजी म्हणाले- 'नाही. तो वेडा नाही, पण त्याचा गैरसमज झालाय, आणि तुम्ही हे पाहिलत की मी त्याच्याशी बोलल्यानंतर तो हा सुरा माझ्या हातात ठेवून निघून गेला. माझ्यावर वार करण्यासाठीच त्याने तो हा आणला होता.’ 'त्याने

तुमच्यावर अंधारात वार केला असता तर... ?’ मधेच गांधीजी म्हणाले ‘तुम्ही इतक्या घाबरू नका. त्याच्या मनात हे होते की माझा खून करावा पण तसे करण्याची हिंमत त्याच्यात नव्हती. तो समजतो तितका जर वाईट मी असेन तर मी मरणेच योग्य आहे. पण आता त्या विषयी फार चिंता करण्याचे कारण नाही. हे प्रकरण येथे संपले. तो मला घायाळ करण्याचा पुन्हा प्रयत्न करेल असे मला वाटत नाही. मी जर त्याला पोलिसात दिले असते तर तो माझा शत्रू झाला असता. आता तो माझा मित्र आहे.

## उमाशंकर जोशी

## ११. स्त्री चा दर्जा

आमच्यात अनेकदा वादविवाद होत. अशीच एकदा स्त्रियांच्या स्थितीविषयी चर्चा चालू होती. गांधीजी म्हणाले, पश्चिमेने स्त्रीला जे स्थान दिले त्यापेक्षा तिला पूर्वेने अधिक उच्च व सन्मानाचे स्थान दिले आहे. मी त्यांना म्हटले. ‘मला तुमचे हे मत पटत नाही. पूर्वेने स्त्रीला पुरुषांची ताबेदार बनविली. तिला स्वत:ला काही व्यक्तिगत जीवन आहे असे वाटत नाही. गांधीजी, ‘तुमचं चुकतंय. पूर्वेच्या लेखी स्त्री हो पूजजीय आहे. मी- 'पण मला तसे दिसत नाही. तर असे दिसते की ती पुरूषाची भोगवृत्ती संतुष्ट करण्यासाठी झटत असते.'

गांधीजी-'जीवनाच्या मोठमोठ्या क्षेत्रात ती पुरूषांच्या बरोबरीने व कधी कधी तर पुढे असते. लहान-लहान बाबतीत कदाचित ती पुरूषांची सेवा करीत असेल’ मी विचारले, ‘पण पुरूषाने खुर्चीवर बसून राहावे व स्त्रीने त्यांच्या मागे उभे राहावे अशी जेथे पद्धत आहे तेथे पुरूष स्त्रीला स्वत:च्या बरोबरीची मानतो असे कसे म्हणता येईल ?'

सहज स्मित करता करता गांधीजी म्हणाले, ‘पुरुष अजूनही त्या आदर्शापर्यंत पोहचले नाहीत हे खरे. पण जवळपास सर्वच पुरुषांच्या मनात या गोष्टीचे भान असतेच असते.’

## १२. बचतीवर नजर

येरवडा तुरुंगात गांधीजींचे कपडे त्यांचे साथी शंकरलालभाई धूत असत. एके दिवशी गांधीजींनी त्यांना सांगितले, “तुम्ही कपडे धुणे राहू द्या. मी ते धुवीन” धुण्यात काही कसर राहिली असावी असे मानून शंकरलालभाईंनी विचारले पण गांधीजी म्हणाले, “तुम्ही कपडे अगदी व्यवस्थित धुता. पण मला वाटतं की साबण थोडा जास्त वापरला जातोय. मी इतकाच साबण दुप्पट दिवस वापरेन.”

शंकरलालभाईंनी सांगितले “मी आता काटकसर करीन” त्यांच्या मनात होते की, थोडा साबण जास्त गेला तरी चालेल पण कपडे तर स्वच्छ होतात. मात्र त्यांना आता काटकसर समजली. एकदा सकाळी गांधीजी म्हणाले, “शंकरलाल, आज शेगडी पेटवू नकोस, पाणी गरम करावयाचे नाही” “का?” गांधीजी म्हणाले, “रात्री वऱ्हांड्यात गॅसबत्ती पेटत असते. माझ्या मनात विचार आला की त्या गॅसबत्तीवरच तांब्यावर पाणी ठेवले तर ते सकाळपर्यंत आपोआप गरम होईल. हा प्रयोग यशस्वी झाला. मला प्यायला गरम पाणी मिळाले.” शंकरलालभाईंना थोडे वाईट वाटले. त्यांना वाटले की पहाटे उठून शेगडी पेटविण्याचे श्रम मला पडायला नकोत म्हणून बापूजी असे करताहेत. ते म्हणाले, “मला असे वाटते की माझ्या कामामुळे आपण संतुष्ट नाही आहात” गांधीजी म्हणाले, “अरे बाबा, तुम्ही तुमचे काम उत्तम तऱ्हेने करीतच होतात, पण हा एक प्रयोग आहे. पेटलेल्या गॅसबत्तीवर पाणी गरम करून पाहिले. तो प्रयोग यशस्वी झाला. आपले तेवढेच कोळसे वाचले ना. त्यात वाईट वाटून घेण्यासारखे काहीच नाही !”

# १३. राजाकडचा पाहुणचार

१९३१ च्या गोलमेज परिषदेत उपस्थित राहण्यासाठी बापूजी लंडनला आले होते. राजा पंचम जॉर्जने शंभर नागरिकांसाठी एक भोजन समारंभ आयोजित केला. हिंदी वजीर सर सॅम्युअल होरला गांधीजींना बोलवावे याची चिंता होती. एकतर, राजा अशा बंडखोरांना भेटेल का ? दुसरे, तो त्यांना भेटला तरी गांधीजींचा वेश समारंभाला शोभेल असा असणार नव्हता. सॅम्युअल यांनी राजाशी बोलणी करणे इष्ट मानले. राजाने प्रथमतः आपल्या मनातले विष बाहेर काढले, 'काय ? त्या बंडखोर फकीराने माझ्या अधिकाऱ्यांवर केलेल्या हल्ल्यानंतरही मी त्याला माझ्या महालात बोलावू ?' थोड्या वेळाने पुन्हा त्यांनी ‘त्या उघड्या अंगाच्या व योग्य त्या पोषाखात नसलेल्या छोट्याशा माणसाविषयी’ नाराजी व्यक्त केली. पण शेवटी हे नक्की झाले की पोषाखाविषयी कुठलीही अट न घालता गांधीजींना जेवण्याचे आमंत्रण द्यावे.

समारंभात योग्य वेळी गांधीजींना राजासमोर हजर करण्याची जबाबदारी हिंदी वजिराने स्वत:कडे घेतली. त्यांनी गांधीजींची व राजाची भेट घडवून आणली. गांधीजींची बंडखोरी विसरणे राजाला शक्यच नव्हते. गेले पूर्ण वर्ष गांधीजी हिंदुस्तानात सत्याग्रहाचे प्रचंड आंदोलन चालवित होते. पण दोघांमध्ये चर्चा सुरू झाली. गाडी रूळावर आली. राजा सहृदयी होता आणि गांधीजींना रीतीभातीचे चांगले ज्ञान होते. पण मध्येच एकदा राजाची नजर गांधीजींच्या पंचावर पडली. वजीराच्या छातीचे ठोके वाढले !

चर्चा पूर्ण व्हायला आली. पंचम जॉर्ज स्वतःची जबाबदारी जाणणारे होते. मात्र जाता जाता त्यांनी गांधीजींना इशारा दिला. “लक्षात ठेवा, मि. गांधी, माझ्या साम्राज्यावर होणारे कुठलेही आक्रमण मी खपवून घेणार नाही.” हिंदली वजिराचा श्वास तेथल्या तेथे थांबला. त्याला वाटले आता तलवारी एकमेकांना भिडणार पण गांधीजींच्या सुजनतेने सर्व काही सांभाळून घेतले. ते म्हणाले. “आपल्यासारख्या नामदारांचा पाहुणचार घेतल्यावर आपल्याशी राजकीय चर्चेत पडावे असे मला वाटत नाही.” मित्रत्वाच्या वातावरणात दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला. हिंदी वजिराला हायसे वाटले.

## १४. कुठल्या तोंडाने खाऊ शकेन?

१९४७ च्या उन्हाळ्यात बिहार जातीवादाच्या वडवानलात होरपळत होता. बापू हा वणवा विझवण्याचा प्रयत्न करीत असताना एकदा दिल्लीला आले. त्या दिवसात त्यांचे खाणेपिणे खूपच कमी झाले होते. एकदा सकाळी आंब्याच्या रसाचा एक प्याला भरून मनुने तो गांधीजींपुढे ठेवला. बापूजींनी विचारले, 'जरा तपास करून मला आधी हे सांग की या आंब्याची किंमत काय आहे ?

मनूला आधी वाटलं की बापू विनोदात बोलत आहेत. ती कागदाच्या नकला करण्यात मग्न झाली. थोड्या वेळाने तिने पाहिले तर बापूजींनी रस घेतला नव्हता. तिने त्यांना रस घेण्याचा आग्रह केला. बापू म्हणाले, ‘मला वाटले की तू आंब्यांची किंमत विचारून लगेच परत येशील. आंबे भेट म्हणून आले असले तरी किंमत विचारल्यावरच तू ते मला खायला द्यायला हवे होते. तू ते केले नाहीस. मी तुला विचारल्यावरही तुझे काही उत्तर नव्हते. एक आंबा साधारणत: दहा आण्याला मिळतो असे मी ऐकले आहे. हे फळ खाल्याशिवायही मी जगू शकतो. ते खाल्याने माझ्या शरीरात रक्त वाढत नाही, उलट कमी होते. या अशा भयंकर महागाईत आणि दु:खातही तू चार आंब्याचा रस भरलेला ग्लास मला दिलास. म्हणजे एक ग्लास रस अडीच रूपयांना पडला. मी कुठल्या तोंडाने हा रस खाऊ शकेन ?' तेवढ्यात बापूजींच्या पाया पडायला एक-दोन निराश्रित भगिनी आपल्या मुलांसहीत येऊन पोहचल्या, बापूजींनी लगेच दोन वेगवेगळ्या वाट्यांमध्ये तो रस विभागला व मुलांना देऊन टाकला. त्यांना हायसे वाटले. ते मनूला म्हणाले, ‘ईश्वर माझी मदत करतो याचा हा दाखला. ईश्वरानेच या मुलांना पाठवले. मी पण जशा मुलांची अपेक्षा करीत होतो तशीच ती होती. ही ईश्वराची केवढी मोठी दया आहे.’

# १५. गरिबांची आई

एकदा बापू सेवाग्रामला होते. कस्तूरबा बाहेरगावाहून येणार होत्या. सगळे सारखे चौकशी करायचे. बा केव्हा येणार ? कुठल्या गाडीने येणार ? बा सुरतकडे गेल्या होत्या. मुंबईला पोहचून त्या वर्ध्याला येणार होत्या. पण तो थोडा लांबचा रस्ता होता आणि महागडाही. सुरतेला जाऊन 'ताप्ती व्हॅली' गाडीने भुसावळला येण्यास भाडेही कमी लागले असते.

एक भगिनी कस्तुरबाना भेटायला मुद्दाम थांबल्या होत्या. मुंबईहून गाडी येणार होती. त्यांनी विचारले, 'आता या गाडीने बा येणार ना ?' बापू उतरले. 'जर बा पैसेवाल्यांची बा असेल तर ती आत्ताच येईल आणि जर ती गरिबांची बा असेल तर ती सुरतेहून 'ताप्ती व्हॅली' ने सकाळपर्यंत पोहचेल.' आणि गरिबांची आई असलेल्या कस्तुरबा दुसऱ्या दिवशी सकाळी पोहचल्या. या अनोख्या दंपतीविषयी होरेस अलेक्झांडरने लिहिले. "बा आणि बापू एका घरात असो की जवळ-जवळच्या खोल्यांमध्ये. ते एकमेकांशी फारसे बोलत नसत. पण आपल्याला सर्व काळ हेच वाटे की, ती दोघं एकमेकांना आतून पूर्णपणे जाणून आहेत."

# १६. लाख मोलाची अधेली

खादी कामासाठी पैसे गोळा करत बापूजी ओरिसामध्ये फिरत होते. एका सभेत ते बसलेले असताना एक अत्यंत म्हातारी स्त्री आली. केस सर्व पांढरे झालेले. कंबर पूर्णपणे वाकलेली. स्वयंसेवकांबरोबर भांडून तंटून ती गांधीजींपर्यंत पोहचली. 'मला आपले दर्शन करायचे होते' तिने सांगितले व नंतर कनवटीतून एक अधेली काढून गांधीजींच्या पायाशी ठेवली आणि शांतपणे निघून गेली. त्या बाईने ठेवलेली ती अधेली गांधीजींनी पटकन उचलली व स्वत:च्या कनवटीला लावली. सर्व हिशोब चोखपणे ठेवणारे जमनालाल बजाज जवळच बसले होते.

ते म्हणाले ‘ती अधेली माझ्याकडे द्या बापू’ गांधीजी म्हणाले, ‘नाही, तुम्हाला ती देता येणार नाही.' जमनालालजी म्हणाले 'चरखा संघाचे हजारोंचे चेक माझ्याकडे येतात आणि साध्या एका अधेलीचा विश्वास बाळगू शकत नाही ?' गांधीजी म्हणाले, ‘ही अधेली लाखमोलाची आहे. माणसाजवळ लाखो रूपये असले आणि त्याने त्यातले हजार रूपये दिले तर त्यात नवे काही नाही. पण या वृद्ध, गरीब म्हातारीने जी अधेली दिली, ती कोट्यवधी रूपयांपेक्षा अधिक आहे. तिचे मन केवढे उदार असेल याची कल्पना करा.’

## १७. प्रथमत: माझे मस्तक फोडा

नागपुरात महासभेचे अधिवेशन चालले होते. गांधीजी आपल्या झोपडीत वल्लभभाई आदींबरोबर चर्चा करीत होते. झोपडीच्या बाहेर एक मारवाडी दंपत्ती गांधीजींच्या दर्शनासाठी आत यायला स्वयंसेवकाबरोबर वाद घालीत होते. शेवटी वल्लभभाई म्हणाले, 'जे कुणी असतील त्यांना आत पाठवा'. तेवढ्यात एक दुसरा स्वयंसेवक धावत आला व त्याने बंगाल-छावणीत गडबड झाल्याविषयी सांगितले. गांधीजी ताठ उभे राहिले. त्यांची हजामत नुकतीच आटोपली होती. सूर्याची किरणे पडून डोके जणू तळपत होते. जवळ पडलेली चादर खांद्यावर घेऊन बापू निघाले.

मोठ्या मेहनतीने महात्माजींचे दर्शन घेणारे ते दंपत्ती अवाक् होऊन त्यांना पहातच राहिले. 'तुम्ही थोडा वेळ थांबा. मला तुमच्याशी बोलायचं आहे,' असे सांगून त्या बाईने गांधीजींच्या चादरीचे एक टोक पकडले. जाण्याच्या घाईत असलेल्या गांधीजींनी ती चादर तशीच सोडली व ते पुढे निघून गेले. वल्लभभाई विनोदानं म्हणाले, 'अशा प्रसंगी ते आपली पैशाची पिशवी पण फेकून देतील व त्या ठिकाणी धावून जातील.' त्या कडाक्याच्या थंडीत गांधीजी बंगाल-छावणीत दाखल झाले. तेथे तर अद्भुत दृश्य होते. गांधीजींच्या असहकाराच्या ठरावाला विरोध करण्यासाठी दासबाबू कलकत्त्याहून २५० प्रतिनिधी स्वखर्चाने घेऊन आले होते. बॅनर्जी ठरावाच्या बाजूने होते व त्या दोघांच्या माणसांमध्ये बेबनाव झाला होता. गांधीजी तेथे पोहचून एका स्टूलावर उभे राहिले. बंगालीशिवायच्या सर्वांना त्यांनी आधी तेथून जायला सांगितले. नंतर बंगालींना म्हणाले, "या तक्रारीचे मूळ कारण मी आहे. तेव्हा आता डोकीच फोडायची असतील तर आधी माझे डोके फोडा", थोड्या वेळात सर्व वातावरण थंडावले. दासबाबूंबरोबर तेथेच गांधीजींनी सल्लामसलत केली. परिणामी जे दासबाबू ठरावाच्या विरोधी होते. त्यांनीच तो ठराव स्वत: मांडला !

# १८. दोघेही गप्प बसून होतो

बापूजी येरवडा तुरुंगात होते तेव्हा कस्तुरबा त्यांच्या भेटीला आल्या. एका निश्चितवेळी तुरुंगाधिकाऱ्याच्या उपस्थितीत त्यांची भेट ठरली. बा आणि बापू एकमेकांचे कुशल क्षेम विचारत होते तेव्हा तुरुंगाधिकाऱ्याला वाटले की या दोन पवित्र आत्म्यांच्या भेटीच्या वेळी मी तेथे उभा राहिलो तर त्यांना मोकळेपणी बोलता येणार नाही. थोडे पुढे पाठीमागे असलेले बरे असा विचार करून तो थोडा लांब जाऊन फेऱ्या मारायला लागला. तुरुंगाधिकारी हसत हसत परत आला.

त्याने बापूजींना विचारले. 'तुमचं बोलणं पूर्ण झालं ना?' गांधीजी: 'बोलणं ?' तुमच्या उपस्थितीत आम्ही एकमेकांची खबरबात विचारली. पण तुम्ही गेल्यानंतर एक चकार शब्दही उच्चारला नाही.' तुरुंगाधिकारी - 'पण का, बापूजी ?' गांधीजी- 'तुम्ही तुरुंगाचा नियम जाणताच आहात. अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत तुरंगात कैदी भेटीला येणाऱ्याशी गोष्ट करू शकत नाही. तुम्ही होतात तोपर्यंत आम्ही एकमेंकाची खबरबात घेतली. पण तुम्ही गेल्यावर आम्ही दोघेही शांतपणे बसून होतो !'

## १९. 'महात्मा' म्हणू नका...!

मुंबईच्या एकसलसियर थिएटरमध्ये एक सभा हक करण्यात आली होती. ती मलबारातल्या संकट निवारणासाठी होती व गांधीजी त्याला उपस्थित होते. बॅरिस्टर जयकरांचे भाषण झाल्यानंतर गांधीजींच्या हेही लक्षात आले की, सभा जशी मलबार संकट निवारणासाठी आहे, तशीच ती त्यांच्या सन्मानासाठीही आहे. वेगवेगळ्या राष्ट्रीय पक्षाचे आणि जातीचे लोक एकामागून एक येत व गांधीजींचा गौरव करणारी भाषणे करीत. जमनादास द्वारकादासची पाळी आली.

गांधीविषयी आदर दर्शविण्यात ते कुणापेक्षाही कमी नाहीत असे त्यांच्या भाषणात ध्वनित होते असतानाच सभेतून कुणीतरी ओरडले. “गांधीजी नव्हे, महात्माजी म्हणा !” जमनादासांनी फार सरळपणे सर्वांना समजावून सांगितले की, “स्वत: गांधीजींना ‘महात्मा' हे संबोधन आवडत नाही. त्यांनी स्वत:च मला तसे सांगितले आहे. मी त्यांचे मन दुखवू इच्छित नाही.” त्यांनी आपले भाषण पुढे सुरु केले. पण मध्येच पुन्हा कुणीतरी घोषणा दिली. जमनादासजींनी पुन्हा तेवढ्याच नम्रपणे खुलासा केला. अन्य भाषणे झाली. शेवटी गांधीजींच्या भाषणाची वेळ येऊन ठेपली. अत्यंत व्यथित स्वरात ते म्हणाले, “दोन-तीन मित्रांनी भाई जमनादासचा व सर्व सभेचा अपमान केला आहे. मीच जमनादासला हे सांगितले होते. ‘महात्मा' या नावाने अनेक आलतू-फालतू कामं झाली आहे. मला तर त्या शब्दाचा दुर्गंध येतो. जेव्हा कुणी फार फार आग्रहाने मला ‘महात्मा’ म्हणून संबोधतो तेव्हा माझा आत्मा तळमळतो. मी जेवढा जेवढा या शब्दाला विरोध करतो तेवढा तेवढा तो शब्द मला अधिक चिकटतो. म्हणून केवळ जिभेने नाही म्हणून चालत नाही. आश्रमात तर हा शब्द उच्चारायलासुद्धा मनाई आहे. भाई जमनादास माझ्याविषयी खूपच गौरवपूर्ण बोलले, पण 'माझ्यासारखा दुर्देवी मनुष्य दुसरा आढळणार नाही'. असे तरी ते बोलले असते तरी त्यांना थांबवण्याचा अधिकार आपल्यापैकी कुणालाही नाही.” गांधीजी हे बोलत असतानाच समोरच्या गॅलरीतील एकजण उभा राहिला. त्याने नम्रपणे दोन्ही हात जोडून सर्वांना प्रणाम केला. गांधीजी म्हणाले, “बस्स, एवढे पुरे आहे. पण अजून दोघेजण आहेत, त्यांनी माफी मागायला नको का?” अन्य दोघे उभे राहिले. त्यांनीही माफी मागितली. गांधीजींना बरे वाटले. ते म्हणाले, “तुम्ही जमनादासजींचा अपमान केलात तेव्हा मला फार दु:ख झाले. पण तुम्ही विनयपूर्वक माफी

मागितली म्हणून हे दुःख सुखात परिवर्तीत झाले. माफी मागणाऱ्यांचे तर भले होईलच पण ज्यांनी हे दृश्य पाहिले त्या त्या सर्वांचे पण भले होईल.”

# काका कालेलकर

## २०. कंठस्थ 'गीता'

सगळी भगवद्गीता तोंडपाठ करण्याचे बापूजींनी ते दक्षिण आफ्रिकेत होते तेव्हाच ठरवले. तेथे ते रोज सकाळी भिंतीवर गीतेचे दोन-तीन श्लोक लिहून ठेवीत व दात घासता घासता ते तोंडपाठ करीत . येरवड्यात बराच रिकामा वेळ आहे हे पाहिल्यावर गांधीजींनी गीतेचे शुद्ध उच्चारण व श्लोक तोंडपाठ करण्याचे ठरविले. मला म्हणाले, "काका, मला गीतेचे उच्चारण शुद्ध स्वरूपात करावयाचे आहे. मी तुम्हाला आश्रमातल्या मुलांना शिकवतांना पाहिलंय. जिथे कुठे मी अशुद्ध उच्चारण करेन तेथे मला थांबवा. मी पुन्हा पुन्हा बोलून तो उच्चार सुधारेन. मी 'मोठा' आहे, 'महात्मा' आहे, मला कशाला त्रास द्या, असा कुठलाही विचार करून माझ्यात वाचादोष राहू दिला तर लक्षात ठेवा, त्याचे पाप तुम्हाला लागेल. मला एक विद्यार्थी समजा व जोपर्यंत मी निर्दोष उच्चारण करीत नाही तोपर्यंत मला वारंवार सुधारत राहा." जेथे मी एखादी चूक असल्याचे सांगत असे तेथे गांधीजी पेन्सिलीने एक लहानशी खूण करीत. तो भाग वारंवार वाचीत. एकच ओळ किंवा शब्द अनेकदा शिकवण्याचा नैसर्गिक नियम हाच आहे. मुले या पद्धतीनेच उच्चारण आणि लहेजा शिकत असतात.

## २१. चाळीस हजार परत दिले

आश्रमातील सुरुवातीचे दिवस. गांधीजींकडे गिरजा शंकर जोशी नावाचे एक ज्योतिषी नेहमी येत. एकदा बापूजींनी त्यांना सांगितले की, ‘एरव्ही तर तुम्ही नियमित येथे येता, मग आश्रमातल्या मुलांना संस्कृत का शिकवित नाही ?’ त्यांनी मुलांना संस्कृत शिकवण्याचे मान्य केले.

ते फल ज्योतिषी होते. अहमदाबादच्या अनेक धनिकांचा त्यांच्या विद्येवर विश्वास होता. सोमालाल नावाच्या एका व्यक्तीला गांधीजींना काही दान देण्याची इच्छा झाली. त्यांनी जोशींसोबत चाळीस हजार रुपये शाळा बांधण्यासाठी दिले होते.

घर बांधण्याचा विचार करीत होते. त्या आधीच अहमदाबादेत इन्फ्युएंझाचा प्रकोप उसळला. रोज जवळपास सोळाशे माणसे मृत्यूमुखी पडायची. सर्वत्र हाहाकार माजला. बापूजींनी जोशीला सांगितलं... या वर्षी तरी आपल्याला घर बांधता येणार नाही. शाळेची इमारतही होऊ शकणार नाही. त्यामुळे सोमालाल भाईंनी पाठवलेले पैसे त्यांना परत पाठवू. जोशी म्हणाले, ‘पण त्यांनी पैसे परत मागितलेले नाहीयेत.' बापू म्हणाले, 'त्याने काय होतंय ? ज्या कामासाठी पैसे पाठवले ते काम हल्ली होणार नाही. मग ते पैसे  आपल्याजवळ का ठेवायचे?' जोशींचे उत्तर होते. 'आता नाही तर भविष्यात केव्हा तरी तर छात्रालय बांधले जाईलच ना? त्यावेळी हे पैसे कामाला येतील. गांधीजींचे उत्तर होते, 'हो, पण ज्या वेळेला इमारत बांधली जाईल त्यावेळेला कुणीतरी दाता भेटेलच. पैसे परत करू.' सोमालालभाईंना ही सर्व हकीगत जोशींनी सविस्तर सांगितली. सोमालाल भाई म्हणाले, ‘एकदा जे पैसे दिले ते दिले. मी परत घेणार नाही !’

# २२. अस्पृश्यता ठेवण्याच्या अटीपायी

१९२१ सालची गोष्ट. अहमदाबादेत त्यावेळी गुजराथ विद्यापीठाची स्थापना झाली होती. त्या दिवशी विद्यापीठाच्या नियामक मंडळाची बैठक होती. त्यात मि. ॲन्ड्र्यूज पण होते. बैठकीत त्यांनीच प्रश्न विचारला, 'विद्यापीठात हरिजनांना दाखल करणार की नाही ?' मी त्यांना लगेच म्हणालो. 'अवश्य दाखल करून घेणार'. पण आमच्या नियामक मंडळात काही वेगळ्या विचारांचे लोक होते. अस्पृश्यता हटवायला त्यांची परवानगी नव्हती.

दुसरेही वेगवेगळ्या अडचणी सांगू लागले. त्या दिवशी हा प्रश्न सुटला नाही. प्रकरण शेवटी बापूजींकडे गेले. त्यांनीही तेच उत्तर दिले जे मी दिले होते. सगळ्या गुजराथेत याची चर्चा सुरू झाली. मुंबईतले कित्येक धनवान वैष्णव गांधीजींना भेटायला आले. ते म्हणाले, 'राष्ट्रीय शिक्षणाचे काम हे धर्मकार्य आहे. त्यात तुम्ही सांगता तेवढे पैसे देऊ पण आपण हा हरिजनांचा प्रश्न सोडून द्या. आम्हाला तो पचत नाही.' ते विद्यापीठासाठी पाच-सात लाख रूपये देणार होते.

बापूजींनी त्यांना सांगितले, 'विद्यापीठ फंडाची गोष्ट तूर्तास बाजूला ठेवू. अस्पृश्यता कायम राहू द्यावी या अटी पायी जर उद्या मला कुणी हिंदुस्थानाचे स्वातंत्र्य देऊ केले तरी मी ते स्वीकारणार नाही. विद्यापीठ फंडाची ती काय कथा?'

# २३. धर्मयुद्धाचे नियम

लहान मोठ्या लढाया लढण्यातच बापूजींचे सारे आयुष्य गेले. बहुधा लढण्यासाठीच त्यांचा जन्म असावा, असे म्हटले तरी चालेल. तरी एकाही माणसाशी त्यांचे वैर नव्हते. दक्षिण आफ्रिकेत त्यांच्या विरोधी असणारे एक हिंदी लोकांचे शिष्टमंडळ जनरल स्मट्स यांना भेटायला गेले. आपले म्हणणे जनरल स्मट्सच्या मनावर ठसवण्याएवढे ज्ञान आणि भाषाप्रभुत्व त्या लोकांपैकी कुणाकडेच नव्हते. शेवटी त्यांनी गांधीजींनाच हे काम करण्याविषयी विनंती केली !

गांधीजींनी ते काम स्वीकारले व त्या लोकांचे पूर्णपणे समाधान होईल अशा पद्धतीने पारही पाडले ! या प्रसंगामुळे गांधीजींचे अजातशत्रूपण तर सिद्ध झालेच पण आपल्या विरोधकाच्या गुणांची कदर करुन त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकणाऱ्या त्या हिंदी लोकांविषयी श्रद्धाही वाढली. आपल्या मोकळेपणामुळे गांधीजींनी अनेक शत्रूंना मित्र बनवले होते. अनेकांना सज्जनतेचे धडे दिले आणि ज्या ठिकाणी द्वेषाचे व कपटनीतीचे कारस्थान होते तेथील लोकांना धर्मयुद्धाच्या नियमाची आवश्यकता शिकवली.

# २४. अवघड शिस्त

एकदा मी अडचणीत सापडलो. बापूजींचे खाणे काय किंवा अन्य गोष्टी काय, सगळं काही तोलून मापून असे. बाजारातून एक शेर किसमीस आली. बापूजी म्हणाले, 'ही आता आठ दिवसात पुरायलाच हवी, किसमीस किती आहे ती मोजा व तिचे आठ सारखे भाग करा म्हणजे रोज किती लागते ते आपण पाहू’ मला आठवतं त्याप्रमाणे रोज २० किसमीस लागायची. पण तो खुराक कमी पडेल असे मला वाटले. या बाबतीत बापूजींशी चर्चा करण्यात काही अर्थ नाही हे मला माहीत होते. म्हणून मी रोज त्यातली मोठमोठी निवडून २० किसमीस देणे सुरु केले. थोड्या दिवसात मोठी किसमीस संपली. आता अधिक द्यायची तर त्यांची परवानगी घ्यायला हवी. मी सांगितले, “मोठी किसमीस संपली. लहान किसमीसीमुळे पोषण होणार नाही. म्हणून अधिक देऊ या’ थोडे रागावतील, नाराज होतील, याची कल्पना होती आणि तशी मनाची तयारीही होती. पण प्रकरण अपेक्षेपेक्षा फारच गंभीर बनले. असे का केले? असा दोष देऊन गांधीजी म्हणाले, ‘आता मला हे काम तुमच्याकडून काढून अन्य कुणालातरी द्यावे लागेल'. एकाच्या जागी दुसऱ्याने काम करायला तुरुंग म्हणजे काही आश्रम नव्हता. आणि मी ते काम करणार नाही म्हणजे बापूजी स्वत: करतील. मी तसा हळव्या मनाचा नाही पण त्या दिवशी खूप रडलो. बापूजी थोडे वरमले. माझे काम माझ्याकडेच राहिले. बाकीच्या दिवसात लहान लहानशी का होईना पण २०च किसमीस त्यांच्यासाठी मला तयार करावी लागली.

## २५. पापाचाही प्रतिनिधी

गांधीजींच्या सत्याग्रहाचे एक व्याकरण होते. या व्याकरणाचे नियम न पाळता जर सत्याग्रह करण्यात आला तर तो दुराग्रह ठरतो. जबरदस्तीचा एक प्रकार ठरतो. गेल्या वीस वर्षात (१९५० नंतर) कुणीही शुद्ध सत्याग्रहाचा दाखला लोकांसमोर ठेवला नाही. परिणामी, सत्याग्रहाची जागा हत्याग्रहाने घेतली. हत्याग्रह एक तर कायदेशीररित्या सरकारला खाऊन टाकेल किंवा सर्वत्र केवळ गुंडांचे राज्य निर्माण होईल.

जेव्हा चौरीचौरा हत्याकांड झाले त्यावेळी गांधीजींनी ते एक राष्ट्रीय पाप मानले होते आणि प्रायश्चित्त म्हणून स्वत: उपवासाला सुरूवात केली होती. त्यावेळी अनेकांनी गांधीजींना भेटून सांगितले की, तुम्ही स्वत:ला अहिंसेचे पुजारी म्हणवता, हे सर्वच जाणतात. ज्यांनी प्रत्यक्ष हिंसा केली त्यांच्याशी तुमचा संबंध जोडण्याची कुणीही हिंमत करणार नाही. मग तुम्ही स्वत:ला त्या पापासाठी जबाबदार का धरता? गांधीजीचे उत्तर होते, 'मी स्वत:ला मनाने भारताचा प्रतिनिधी मानतो. सर्व भारताचा मी सेवक प्रतिनिधी आहे. भारतात जसे पुण्यवान आहेत तसेच पापीही आहेत. मी त्या सर्वांचा प्रतिनिधी आहे. या देशातल्या कुठल्याही व्यक्तीने अशी हिंसा केली तर त्याची जबाबदारी माझ्या मस्तकी येऊन पडते. समग्र भारताच्या वतीने मी पश्चात्ताप व्यक्त केला नाही तर माझ्या प्रतिनिधीत्वाला लाज वाटेल.’ म्हणूनच सारे राष्ट्र त्यांना 'राष्ट्रपिता' म्हणत होते.

## २६. आईसारखे वात्सल्य

बापू विलायतेतून (दक्षिण आफ्रिकेतून विलायतमार्गे) हिंदुस्तानात आले तेव्हा मी शांतिनिकेतनमध्ये होती. बापूंच्या फिनिक्स आश्रमातून आलेली मंडळीही तेथे पाहुणे म्हणून राहत होती. वर्तमानपत्र वाचायचो. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतल्या आपल्या लोकांचा ताजा इतिहास जाणायचो.

तेथे असलेल्या गांधीजींच्या फिनिक्स आश्रमाविषयीही मला माहिती होती आणि आश्रमावासीयांनीसुद्धा बहुधा माझं नाव ऐकलं असावं. मी त्या फिनिक्स मंडळीमध्ये मिळून मिसळून गेलो. सकाळ-संध्याकाळची प्रार्थना त्यांच्या सोबतच करायचो व संध्याकाळचे भोजनही. हे आश्रमवासी रोज सकाळी उठून तासभर मजुरी करायचे. शांतिनिकेतनवाल्यांनी त्यांच्यावर एक काम सोपवून दिले होते.

जवळ एक छोटा तलाव होता व त्याच्याजवळ एक टेकडी होती. ती टेकडी खोदायची व त्यातली माती तलावात टाकून तो पुरून टाकायचे हे काम होते. आम्ही दहा-वीस जण रोज खूप उत्साहाने ते काम करायचो. बापूजी शांतिनिकेतनमध्ये आले तेव्हा रात्री बऱ्याच उशिरापर्यंत त्यांच्याशी आमच्या गप्पा चालल्या होत्या. सकाळी प्रार्थना झाल्याबरोबर आम्ही कामाला निघालो. परत आलो तर आमच्यासाठी फळे वगैरे नाश्त्याचे सामान अगदी व्यवस्थितपणे वेगवेगळ्या ताटात लावून ठेवलेले आढळले. आम्ही सर्व कामावर गेलो होतो. मग मागे ही सर्व मेहनत कुणी केली ? मी बापूंना विचारले “हे सर्व कुणी केले?” ते म्हणाले “मी केलं, का बरं ?” मी संकोचाने म्हणालो “तुम्ही का केलंत ? तुम्ही सर्व तयारी करावी व आम्ही आयतोबासारखे खावे, हे मला पटत नाही.” ते म्हणाले, “का ? त्यात गैर काय आहे ?”

मी म्हणालो, “आपल्यासारख्यांकडून अशी सेवा घेण्याची आमची लायकी हवी की नको?”

याचे जे उत्तर बापूजींनी दिले त्याच्यासाठी मी मुळीच तयार नव्हतो, ते नितांत अनपेक्षित होते. (मी त्यावेळी बापूजींशी इंग्रजीतच बोलायचो.) मी म्हटलं, “वुई मस्ट डिजर्व इट” (आमच्यात तशी योग्यता असायला हवी) हे ऐकताच ते अत्यंत स्वाभाविकपणे उद्गारले “वुईच इज ए फॅक्ट”

(तुमचं म्हणणं खरं आहे) मी त्यांच्याकडे पहातच राहिलो. हसता हसता ते म्हणाले “तुम्ही तिकडे कामावर गेला होतात आणि नाश्ता करुन पुन्हा कामावर गेला असता. माझ्याकडे थोडा वेळ होता म्हणून मी हे काम करून तुमचा वेळ वाचवला. एक तास काम केल्यानंतर असा नाश्ता मिळविण्याची धमक तुम्ही मिळवली की नाही ?”

# २७. राजनैतिक कैदी

स्वराज्यासाठी मिठाचा सत्याग्रह सुरु करून गांधीजी १९३० मध्ये तुरुंगात गेले. सरकारने त्यांना येरवडा तुरुंगात एक राजनैतिक कैदी म्हणून ठेवले होते. त्यावेळेला त्यांच्यासोबत राहण्यासाठी सरकारने माझी निवड केली आणि साबरमती जेलमधून मला येरवड्यात पाठवण्यात आले. गांधीजींसोबत मी पाच-सव्वापाच महिने राहिलो. त्या काळात गांधीजी येरवड्यात जवळ-जवळ साडे-आठ महिने राहिले होते. सरकारबरोबर पटले नाही म्हणून त्यांनी खासगी मुलाखती घेणे बंद केले व प्रत्येक आठवड्याला अनेक लोकांना पत्रे पाठवणे सुरू ठेवले. त्या काळात त्यांनी शेकडो पत्रे पाठवली. पण गांधीजींची चित्तवृत्ती अगदी शंभर टक्के टकळी आणि सूत कताई यात व त्यामध्ये काय सुधारणा करता येईल यात रमलेली असायची. जेव्हा ते अगदी एकाग्रपणे चरखा चालवत, त्यावेळी चरख्याचा तालबद्ध आवाज जणू अनुष्टुभ छंदात लिहिलेल्या महाभारताचे श्लोक ऐकत आहोत, इतका मधुर आणि भव्य भासत असे. या दिवसात तुरंगात बसल्या बसल्या त्यांनी कौले, मातीच्या घड्याचे तुकडे, बांबू यापासून कितीतरी टकळ्या स्वत: तयार केल्या. 'जीवचक्र', ‘बारडोली चक्र', खेडूतांचा चरखा’ असे अनके अनेक प्रकारचे चरखे त्यांच्याकडे आले.

त्यांनी त्या प्रत्येक चरख्याचे वैशिष्ट्य व दोष जाणून घेतले व शेवटी स्वत: एक सुंदर चरखा शोधून काढला, त्याचे नाव 'येरवडा-चक्र' आहे. तुरूंगात पोहचण्यापूर्वीच त्यांनी बाहेरून एक पिंजण मागवून आपल्या तुरूंगातल्या खोलीच्या व्हरांड्यात टांगून ठेवली होती. कापूस पिंजण्याचे व पेळू तयार करण्याचे काम त्यांनी अगदी व्यवस्थितपणे सुरु केले. अशा रितीने टकळी किंवा चरखा बनविणे, कापूस पिंजणे, पेळू बनविणे, सूत कातणे, त्याचे लडी बनविणे व टोप्या शिवणे ही सगळी कामे ते फार एकाग्रतेने करीत. पण तुरुंगात बसल्या बसल्या ते हिंदुस्थानातल्या असंख्य लोकांची आणि त्यांची कुटुंबांची चिंताही करीत. त्यांना जेवढी पत्रे येतील. त्या सर्वांच्या व्यक्तिगत व कौटुबिंक जीवनात त्यांना गहिरा रस असे. त्यांच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्याचा समन्वित विचार करून ते योग्य तो सल्ला देत.

# २८. खरा खेळाडू

बापूजींना कुठकुठले लोक सहयोगी म्हणून मिळाले ! पण त्यांनी त्याविषयी कधी चुकूनही तक्रार केली नाही. पत्त्यांमधला खरा खेळाडू तो असतो जो हातात आलेल्या पानांच्या आधारे पुढचा खेळ खेळतो. हातातली पाने वाईट आहेत, अशी तक्रार तो कधीही करीत नाही. तो सांगतो. “पाने कशीही असोत. मी ती घेऊन खेळत राहणार, खेळ सोडणार नाही” आपल्या सगळ्या जीवनात बापूजींनी कधीही 'देवाने मला असे साथीदार का म्हणून दिले ? असा देश माझ्याच वाट्याला का आला ?' या किंवा अशा तक्रारी केलेल्या नाहीत.

जे काही आपल्या भाग्यात असेल त्याचा त्यांनी सर्वांत जास्त चांगला उपयोग करून घेतला. त्यांच्यात तशी अद्भुत शक्ती होती. इतके विविध प्रकारचे लोक त्यांच्या चारी बाजूला होते. त्यांनी त्या सर्वांना सांभाळले त्यांच्यावर वेगवेगळी कामे सोपवली व ती त्यांच्याकडून करवूनही घेतली. हे करीत असताना सत्याशी द्रोह होऊ नये म्हणून ते सतत सावध राहत. ही काही लहान-सहान सिद्धी नव्हती.

# २९. तीन तपाची स्वराज्य सेवा

ज्या युगात आपण राहतो आहोत ते युग हजार एक वर्षांपर्यंत तरी 'गांधी युग' म्हणून ओळखले जाईल. माणसाला माणुसकीचे शिक्षण देणारे ॠषीमुनी आणि पैगंबरांची परंपरा गांधीजींनी त्यांच्या जीवनात अखंडित ठेवली. मानवजातीला त्यांनी अशी एक नवी प्रेरणा, श्रद्धा आणि दीक्षा दिली जी जीवनात उतरवताना, तिचा विस्तार करताना व ती आत्मसात करताना माणसाला एक हजार वर्षांचा पुरूषार्थ वापरावा लागेल.

१९१५च्या प्रारंभी दक्षिण आफ्रिकेतून गांधीजी कायमचे भारतात राहायला आले. १९२० मध्ये त्यांनी सर्व देशाची स्वराज्यसंबंधीच्या हालचालीची सूत्रे आपल्या हातात घेतली आणि एक जबरदस्त आंदोलन देशात जागवले. बरोबर दहा वर्षांनी त्यांनी लाहोर काँग्रेसमध्ये पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय स्वीकारून, शेवटच्या निर्णयासाठी मिठाचा सत्याग्रह सुरू केला आणि त्यानंतर बरोबर १२ वर्षांनी इंग्रज सरकारला भारत सोडून जाण्याची नोटीस बजावली. पाच वर्षाच्या त्या संघर्षानंतर भारत स्वतंत्र झाला. ‘बारा वर्षाचे एक तप' या हिशोबाने गांधीजींची ही अदभुत व रोमहर्षक स्वराज्य सेवा बरोबर तीन तपांपर्यंत चालली व फलद्रूप झाली. या बत तपांचा इतिहास गांधीजींसारख्या अनेक राष्ट्रपुरूषांच्या जीवनात, त्यांच्या वाणीत व त्यांच्या प्रवृत्तीमध्ये प्रतिबिंबित झालाच आहे. पण या तीन तपादरम्यान ज्या लहान-मोठ्या व्यक्तींनी त्यात भाग घेतला आणि त्या संघर्षाची प्रवृत्ती व प्रेरणेचे निरीक्षण, मनन केले; त्यांचे हे काम आहे की, त्यांनी या संबंधीची संस्मरणे लिहून ठेवावीत.

पण गांधीजींचा विस्तृत परिचय होण्याच्या दृष्टीने विविध साहित्याची आवश्यकता आहे. महादेवाभाईंच्या डायऱ्या आणि त्यांनी लिहिलेली साप्ताहिक पत्रे हे संपूर्ण गांधी जीवन रेखाटण्यासाठी फार महत्त्वपूर्ण साधन ठरेल. लहानमोठ्या प्रसंगाविषयी बारीक सारीक माहितीही लोकांपुढे यायला हवी.

# ३०. सत्यनिष्ठेची पूजा

आश्रमाच्या स्थापनेचे दिवस होते. आम्ही कोचरबच्या बंगल्यात राहत होतो. त्यावेळी अध्यापक धोंडो केशव कर्वे त्यांच्या संस्थेसाठी मदत गोळा करायला अहमदाबाद येथे आले होते. ते बापूंना भेटायला मुद्दाम आश्रमात आले. बापूंनी सगळ्या आश्रमवासियांना एकत्र केले, आणि त्यांना कर्वे यांना साष्टांग प्रणिपात करायला सांगितले. नंतर ते म्हणाले, 'गोखलेजी ज्या वेळेला दक्षिण आफ्रिकेत आले तेव्हा मी त्यांना विचारले की, तुमच्या प्रांतात सत्यनिष्ठ माणसे कोण-कोण आहेत ?' ते म्हणाले, 'मी या यादीत माझे नाव घालू शकत नाही. मी सत्याच्या मार्गाने चालण्याचा आटोकाट प्रयत्न करतो, पण कधी-कधी राजकारणात खोटे बोलावे लागते. मात्र मी ज्यांना जाणतो अशी तीन माणसे आहेत, जी खरीखुरी सत्यवादी आहेत. एक अध्यापक कर्वे, दुसरे शंकरराव लवाटे (ते आयुष्यभर दारूबंदीचे काम करीत होते) आणि तिसरे...' म्हणून ते थोबले. मग म्हणाले, 'सत्यनिष्ठ लोक आपल्यासाठी तीर्थरूप आहेत. सत्याग्रह आश्रमाची स्थापनाच मूळात सत्याच्या उपासनेसाठी आहे. अशा आश्रमात जर कुणी सत्यनिष्ठ व्यक्ती येणार असेल तर तो आपल्यासाठी सर्वांत अधिक शुभ दिवस मानावा.’ कर्वे खूपच सद्गदित झाले. काही बोलू शकले नाहीत. गांधीजींना इतकेच म्हणाले, ‘बापू, तुम्ही मला खूप लाजवले. तुमच्यापुढे माझ्यासारख्याचा काय पाड ?'

# ३१. सनातनी असूनही सुधारक

बापूजी ज्यावेळी दक्षिण आफ्रिकेतून भारतात आले त्या वेळेला त्यांच्या डोक्यावर शेंडी नव्हती व गळ्यात जानवेही नव्हते. हरीद्वारच्या कुंभमेळ्यात एका साधूने बापूजींकडे या दोन्ही गोष्टीविषयी आग्रह धरला. बापूजी शेंडीसाठी 'हो' म्हणाले पण जानव्यासाठी साफ 'नाही' म्हणाले, या संबंधीची हकीगत मला सांगताना ते म्हणाले, "मला हिंदू समाजात फार मोठ्या सुधारणा करावयाच्या आहेत. पण त्या सुद्धा एक निष्ठावान हिंदू म्हणून वेळ आली तर मी या समाजाविरूद्ध उपवास पण करीन, तसे झाले तरच मी या समाजात काही परिवर्तन घडवून आणू शकेल. जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत त्यांच्या पद्धती पाळणे व त्यांना प्रसन्न ठेवणे हेच योग्य आहे. डोक्यावर शेंडी ठेवणे यासारख्या अत्यंत क्षुल्लक गोष्टीत सुधारणा करून, समाजापासून स्वत:ला तोडण्यात लाभ कुठला ?" पण जानव्याविषयी बोलताना ते म्हणाले, 'हिंदू समाजात आपण निष्कारण अनेक विभाग पाडले. त्याचे अनेक तुकडे झाले. यातल्या काही लोकांना जानवे घालण्याचा अधिकार आहे, काहींना नाही. हा भेद निष्कारण आहे. गांधीजी फार मोठे सुधारक होते, पण मुळात ते 'बनिया' (व्यापारी) होते. त्यामुळेच त्यांनी स्वत:चा समावेश सनातन्यांमध्ये केला पण कार्यक्रम मात्र सुधारकांचा स्वीकारला.

# ३२. साबरमतीहून येरवड्यात

गांधीजींच्या मनात असे कधीही नव्हते की मला साबरमती तुरुंगातून काढून येरवड्याला आणण्यात यावे आणि जर विचारण्यात आले असते तर मीही एका वेगळ्या कारणासाठी 'नाहीच' म्हणालो असतो ! आश्रमाच्या प्रारंभापासून असूनही गांधीजींची अगदी अंतरंग सेवा करणाऱ्यांमध्ये मी कधीही नव्हतो. त्यांना काय हवे, काय नको याची बारीक-सारीक माहिती मला नव्हती. दुसरे, मी माझ्या आयुष्यात कुठलेही काम व्यवस्थितपणे केलेले नाही. त्यामुळे ‘गांधीजींची सेवा संतोषकारक पद्धतीने आपण करू शकू' असे मला वाटायचे नाही. त्यांच्यासोबत तुरुंगात एकटे राहणे हा अलभ्य लाभ असूनही, आपल्या कामामुळे बापूंना समाधान वाटणार नाही. या एका भीतीपोटी मी ‘नाही’ म्हणालो असतो. बापूजींचा विचार होता की, 'काका' साबरमती तुरुंगात अगदी व्यवस्थित आहेत. अनेक राजकैद्यांना शिकवतात. इतकेच नव्हे तर अनेक विद्वानांच्या मदतीने जणू एक महाविद्यालयच तुरुंगात चालवत आहेत. त्या सेवेतून त्यांना बाहेर काढणे उचित नव्हे.

इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स कर्नल डॉर्डल मला ओळखत होते. १९२३ साली जेव्हा मी प्रथमत: साबरमती तुरुंगात गेलो तेव्हा ते लष्करातून अगदी नवे नवेच जेलखात्याचे सुपरिंटेंडेंट म्हणून दाखल झाले होते. तेव्हाचा त्यांचा माझा पाच-सात महिन्यांचा परिचय होता आणि आम्हा दोघांमध्ये थोडा सद्भावही निर्माण झाला होता. म्हणून त्यांनी माझी निवड केली. गांधीजींची इच्छा नसतानाही मी येरवडा तुरुंगात दाखल झालो. मला युरोपियन वार्डात-जेथे बापूजी राहत होते- नेण्यात आले. बापूजींना पाहिल्यानंतर मी हर्षभरित झालो. खरे तर मला रडूच कोसळायचे. पण स्वत:ला सावरत मी त्यांच्या पाया पाडलो.

## ३३. तुरुंगातले वाचन

१९२१-२२ मध्ये बापूजी प्रथमत: भारतातल्या तुरुंगात येरवडा येथे दाखल झाले होते. त्यावेळीही तुरुंगातल्या लायब्ररीतून त्यांनी अनेक पुस्तके मागवून ती वाचली. त्यातली दोन पुस्तके त्यांना विशेष आवडली. 'Seekers After God' आणि सर रूपयार्ड किपलिंगची 'Jungal Book'. या वेळेला त्यांनी माल ती वाचण्याची सूचना केली. भाग्याने तुर्नागातल्या ग्रंथालयात ती दोन्ही पुस्तके होती. 'Seekers After God' मध्ये सेनेका, एपिकटिस व मार्कस् ऑरेसियस या तिघा रोमनांच्या जीवनाविषयी तीन दीर्घ निबंध आहेत. त्या प्रारंभिक तुरुंगात त्यांना वाचण्यासाठी मी माझ्या जवळचे पुस्तक 'Decline and fall of the Roman Empire' पाठविले होते याची बापूजींना आठवण होती, ते मला म्हणाले, 'Seekers After God' मध्ये गिबनचा सर्व सारांश सामावलेला आहे. ते पुस्तक तुझ्यासारख्याने अवश्य वाचायला हवे. या पाच-सहा महिन्यात गांधीजींकडे अनेक पुस्तके आली. त्यातली दोन त्यांनी वाचल्याचे मला आजही स्पष्ट आठवते.

एक होते ॲप्टन सिंकलेरचे 'Goose steps' त्यात त्याने आजच्या अमेरिकेचे शिक्षण तंत्र किती सडलेले आहे याचे पुराव्यासहित वर्णन केले होते. एक प्रेरणादायक पुस्तक होते. नेत्रविना असलेल्या हेलन केलरची जीवन गाथा 'Midstreem' बापूजींनी तिच्या आरंभिक जीवनाची कथा 'The Story of my life' वाचली होती आणि तिची खूप प्रशंसाही केली होती म्हणून तुरुंगात मी 'Midstreem' सर्वांत पहिल्यांदा वाचली. नंतर बाहेर पडल्यावर 'The story of my life' वाचले. श्री. भगवानभाई देसाई यांनी 'अपंगनी प्रतिभा' या शीर्षकाने त्या पुस्तकाचा गुजराती अनुवाद केलाय. तुरुंगात माझा सर्वांत आवडता उद्योग म्हणजे बापूजींची लहानमोठी सेवा करण्याचा व ते रिकामे असले की, त्यांच्याशी विविध विषयावर गप्पा मारण्याचा होता. त्यांच्या लहान-सहान कामातही पुष्कळ वेळ पसार व्हायचा. माझा सर्वांत मोठा आनंद खरकटी भांडे घासणे, विसळणे, लावणे, त्यांचा बिछाना अंथरणे, त्यांच्या वस्तू जेथल्या तेथे ठेवणे, हवी असेल ती वस्तू चटकन काढून देणे, त्यांच्यासाठी स्वयंपाक करणे, त्यांच्या सूत कातण्याची व पिंजण्याची तयारी करणे, पत्रे वाचून दाखविणे या सर्व कामात दिवस केव्हा पसार होई याचा पत्ताच लागत नसे. उरलेला वेळ वाचनात जाई.

## ३४. लंगडणारा दत्तोबा

येरवड्यात मी प्रवेश केला. पाहिले की बापूंच्या सेवेसाठी सामान्य कैद्यातील दत्तोबा नावाच्या एका व्यक्तीला स्वयंपाकाचे काम सोपविण्यात आले आहे. त्या बिचाऱ्याला संधीवात होता. लंगडत लंगडत चालायचा. फार कमी बोले पण दिलेले काम व्यवस्थितपणे पार पाडी. बापूजींसाठी पाणी गरम करणे, त्यांचे कपडे व्यवस्थित ठेवणे, दूध गरम करणे आणि अशीच अन्य कामे त्यांच्यावर सोपविण्यात आली.

त्याला लंगडतांना पाहून बापूंनी माझ्यामार्फत त्याची सर्व चौकशी केली. दुसऱ्या दिवशी सकाळी जेल सुपरिटेंडेंट मेजर मार्टिनला त्यांनी सांगितले, “त्याच्यावर मी काही निसर्गोपचार करू इच्छितो. तुमची परवानगी मिळेल ?” तुरुंगाच्या डॉक्टरांनी सहा-एक महिने त्याला औषध दिली. त्याने काही लाभ झाला नाही. मेजर मार्टिनने सांगितले, “माझी काही हरकत नाही. तुम्ही तुमचा इलाज करू शकता.” बापूजींनी सांगितले, “मी आधी काही दिवस त्याला उपवास घडवितो. मग थोडा खुराक. माझा जो खुराक असेल त्याच वस्तू त्याला देईन.” आपल्या जीवनात इतका रस घेणारी व्यक्ती दत्तोबाला आधी भेटली नव्हती. तो उपचार घ्यायला राजी झाला. पण त्यापेक्षा त्याला याचे आश्चर्य अधिक वाटत होते. बापूजी त्याला रोज बोलवत. त्याच्या प्रकृतीत घडणाऱ्या बदलाप्रमाणे त्याच्या भोजनात आवश्यक ते बदल करीत. थोड्याच दिवसात तो बरा झाला. लंगडत चालणारा दत्तोबा आता पळू शकत होता. यानंतर तो विशेष निष्ठेने बापूजींची सेवा करू लागला यात आश्चर्य काय ? तुरुंगातून आधी मी सुटलो, नंतर बापूजी व स्वत:ची सजा पूर्ण करून शेवटी दत्ताजीही सुटला. बऱ्याच दिवसानंतर बापूजी मुंबईत मणीभवनात आले. मी त्यांना भेटायला गेलो आणि अचानक एके दिवशी दत्तोबा बापूंना भेटायला आला. मी त्याला बापूंकडे घेऊन गेलो. बापूजींनी त्याला प्रेमाने विचारले, ‘हल्ली काय करतोस ?’ त्याने सांगितले की, 'फोर्टजवळ त्याने एक छोटसं इराण्याचं हॉटेल काढलं आहे.’ बापू खूपच कामात होते. त्यांनी सांगितले ‘दत्तोबा, आज आता वेळ नाही. तू उद्या आठवणीने ये. उद्या भेटू'. 'हो' सांगून तो गेला पण परत आला नाही. बापूजींना खूपच पश्चात्ताप झाला. ते म्हणाले “त्याचे दुकान नीट चालावे म्हणून मला त्याला काही पैसे द्यायचे होते. गरीब माणूस... मजूरी करून पोट भरतो. तो दोन-दोनदा भेटायला कसा येऊ शकेल ? मला तेव्हाच त्याला पैसे द्यायला हवे होते.” मी खूप विचार केला पण मुंबईसारख्या विशाल मानव सागरातून दत्तोबाला कसा शोधणार ?

# ३५. किंग अल्फ्रेड

प्रत्येकाने जवळच्या प्रांताची भाषा शिकावीच असा गांधीजींचा आग्रह होता. मी आश्रमाच्या शाळेत नियुक्त झालो तेव्हा अभ्यासक्रमात गांधीजींनी गुजराथी, हिंदी आणि संस्कृत या भाषांसोबत मराठी हा विषयसुद्धा ठेवला होता. एकदा ते म्हणाले की, “दक्षिण आफ्रिकेत गिरमिट यांची सेवा करण्यासाठी मी तामीळ शिकलो. मग मुंबई इलाख्यात राहून मराठी न येणे कसे चालेल ?” येरवडा तुरुंगात त्यांना मराठी शिकण्याची संधी मिळाली. माझ्या मदतीने मराठी शिकायचे त्यांनी ठरवले. सामान्य कैद्यांसाठी असलेल्या लायब्ररीतून आम्ही चार-पाच पाठ्यपुस्तके मिळवली, ती घेऊन आमचे काम सुरू झाले. बापू ती वाचत जात आणि मी त्यांना शब्दांचा अर्थ समजावून सांगे. जेथे कळत नसे तेथे ते लगेच विचारीत, रोज काही मिनिटे मराठीला दिली जात. एके दिवशी कवितेच्या धड्यात हस्ताक्षरविषयी 'दासबोधा'त आलेल्या रामदासांच्या काही ओळी होत्या. बापूजींना त्या खूपच आवडल्या. त्यांनी त्या लिहून काढल्या. त्या अनेकदा वाचल्या व जेथे जेथे कळले नाही ते वारंवार विचारून घेतले. त्याच्यानेही त्यांचे समाधान झाले नाही. शेवटी त्यांनी तो सर्व धडाच लिहून काढला व आश्रमातल्या आपल्या साप्ताहिकाला पाठवून दिला. ही सूचनाही दिली की, सर्व आश्रमवासीयांनी लक्षपूर्वक हे वाचावे. बापूजींचे स्वत:चे अक्षर जेमतेम होते. म्हणून चांगल्या अक्षराची महती त्यांना विशेष होती.

मराठी वाचता वाचता 'अल्फ्रेड दी ग्रेट' चा धडा आला. इंग्लंडचा हा राजा आपल्या शत्रूकडून पराजित होऊन तो एका म्हातारीकडे अज्ञातवासात राहात असतो. म्हातारीने त्याला पोळ्या भाजण्याचे काम दिलेले असते. पण स्वत:च्या चिंतेत तो एवढा मग्न असतो की, शेवटी पोळ्या जळून जातात. म्हातारी त्याला याबद्दल खूप ठपका देते. आम्ही तो धडा एकत्र वाचला. जेव्हा जेव्हा माझ्याकडून चूक व्हायची किंवा एखादी गोष्ट विसरायचो तेव्हा तेव्हा बापूजी मला 'किंग अल्फ्रेड' म्हणत असत.

# ३६. पाठवणी

कितीही उत्साहाने मनुष्य तुरुंगात गेला असो. ज्या दिवशी त्याची शिक्षा पूर्ण होते व सुटकेचा दिवस जवळ येतो तसतसा त्याचा आनंद वाढतो. पण यावेळी माझी स्थिती नेमकी उलट होती. कैदी असल्यामुळे मर्जीनुरूप तुरुंगाच्या भिंतीबाहेर पडता येत नव्हते. पण बापूजींसोबत राहायला मिळत असल्यामुळे बाहेर जाण्याची इच्छाच होत नव्हती. तुरुंगाचे नियम व बंधने खूप कडक असली तरी बापूजी सोबत असल्यामुळे त्यांचे फारसे काही वाटत नव्हते. असे वाटायचे की साडेपाच महिने आपण आपल्या घरीच राहात होतो व आता कुणीतरी घरातून बाहेर काढत आहे म्हणून मी विषादानेच राहिलेले दिवस मोजत होतो. शेवटी जाण्याचा दिवस आला. माझे सगळे सामान ठिकठाक करून जेलरच्या ऑफिसात पाठवले. प्रातर्विधी आटोपून तयार झालो.

बापूजींनी प्रेमाने बऱ्याच सूचना केल्या. 'इतक्या दिवसाच्या एकांतानंतर बाहेरच्या धामधुमीत जायचं आहे, म्हणून मन उत्तेजित होईल. बाहेर गेल्यावर पहिल्या दिवशी भोजन थोडे कमी घ्या. सगळ्यांना भेटता येईल पण रात्रीचे जागरण नको.’ मी खाली वाकून नमस्कार केला. माझ्या डोळ्यात पाणी होते पण बापूजींचे डोळेही भरून आले. त्यांनी माझ्या पाठीवर एक थाप ठेवली. त्यात प्रेम आणि आशिर्वाद दोन्ही होते. विरह म्हणजे काय ? याचा अनुभव त्या दिवशी आला. इतके दिवस बापूजींसोबत रहायला मिळाले हे भाग्यच. या आधी व नंतरही असे भाग्य वाट्याला आले नाही म्हणून त्या सहवासाची धन्यता अलैकिकच म्हणायला हवी.

# जुगतराम दवे

## ३७. आश्रमीय जीवन

आश्रमात एक छात्रालय होते. त्यात देश-विदेशातले विद्यार्थी शिकत. कुणी कातणे, कुणी विणणे, कुणी पिंजणे तर कुणी कारखान्यात चरखे बनवणे शिकत व अभ्यासही करीत. आश्रमात लहान बालकांचे एक बालमंदिरही चालत असे पण त्यासाठी वेगळे शिक्षक नव्हते. आश्रमवासी भगिनीच ते बालमंदिर चालवित. आश्रमात एक सुंदर गोशाळा होती. त्यात अनेक प्रकारच्या गायी होत्या. एक लहानसे चर्मालयसुद्धा होते. मेलेल्या गुराची चामडी काढणे, ती कमावणे, त्यापासून चपला, जोडे तयार करणे ही कामे तेथे चालत. कत्तल करण्याआधी जनावरांचे कातडे काढणे, वापरणे तेथे निषिद्ध मानले जाई. आश्रमवासी या अहिंसक चामड्याची पादत्राणे वापरत.

आश्रमात शेतीवाडीही होती. सर्व प्रकारची फळझाडे असत. भाज्या होत, शेतीत अन्नधान्य व कापूस पिके. या सर्व कामात बाहेरचा कुणीही मजूर नव्हता. सर्व कामे आश्रमातील बंधू-भगिनी व मुले वाटून घेत. क्रमाक्रमाने ती स्वयंपाकघरात, शेतीत, पाणी भरणे, भांडी घासणे-विसळणे, गोशाळेतले शेण काढणे, ती स्वच्छ ठेवणे, संडास साफ करणे इत्यादी कामे करीत. सूर्य उगवल्यापासून संध्याकाळपर्यंत एखादे मधमाशांचे पोळे जसे प्रत्येक क्षणी उद्योगात गुंतलेल असते, तसे आश्रमीय जीवनाचे होते. गांधीजींनी म्हणूनच त्याचे नाव 'उद्योग मंदिर' ठेवले. ते अत्यंत योग्य होते.

# ३८. नवजीवन

आश्रमात आता गांधीजींच्या कामाचे बस्तान ठिकठिक बसले. त्यांच्या डोक्यात एक साप्ताहिक ‘नवजीवन' काढावयाचे होते. त्याचा पहिला अंक ७-९-१९१९ ला निघाला. त्यासाठी अहमदाबादेत त्यांनी एक छोटासा प्रेस खरेदी केला. त्याचे काम दिवसेंदिवस वाढतच गेले. प्रेसमध्ये असलेली माणसे त्या कामाला अपुरी पडत. गांधीजींना स्वामी आनंद यांची आठवण झाली. त्यांना सर्व प्रकारच्या छपाई कामात रस होता. ते हे काम करू शकतील याचा गांधीजींना विश्वास होता. गांधीजींनी त्यांना बोलविणे पाठविले व ‘नवजीवन’ च्या कामाला जोडून दिले. १९१९ च्या शेवटी शेवटी स्वामी आनंद ‘नवजीवन' मध्ये दाखल झाले व नंतर एक-दोन महिन्यातच मलाही तेथे बोलावून घेतले.

ते १९१९-१९२० चे दिवस होते. गांधीजींनी सविनय कायदेभंग, हरताळ आणि उपवासाची सूचना सरकारला आधीच दिली होती. आता ‘नवजीवन' प्रेसमध्ये त्यांच्या हस्तलिखितांचा ओघ सुरू झाला. ८ पानांचे साप्ताहिक १२ ते १६ पृष्ठांपर्यंत आले. चुडी ओळच्या लहानशा गल्लीत, त्याहीपेक्षा लहान जागेत चालत असलेल्या ‘नवजीवन' प्रेसमध्ये धमाल चालत असे. छापलेल्या पानांचा टाईप मोकळा होऊन तो धुण्याआधीच पुढची नवी पाने छापून घेण्याचा हुकुम डोक्यावर असायचा. त्याही गांधीजी अनेकदा पेन्सिलीने लिहीत. ती पाने नीट वाचणे हा एक मोठा उद्योग ठरायचा. मशीन चालविणारे, कंपोजिटर्स, प्रूफे तपासणारे, सगळ्यांना दिवसाचे तास कमी पडायचे. रात्रभर जागरण करण्याची तर त्यांच्यात जणू स्पर्धा लागे. पण या सर्वांत स्वामी आनंद यांची जणू कडी असे. तीन रात्री सतत जागरण करूनही चौथ्या दिवशी सकाळी प्रूफे वाचण्याची त्यांची तयारी असे ! ‘नवजीवन' व 'यंग इंडिया'त गांधीजींच्या तेजस्वी लिखाणांचा अविरत ओघ सुरू होता. चुडी आळीतला छापखाना त्यासाठी खूपच लहान पडायचा. स्वामीजींनी सारंगपूरजवळचे एक मोठे घर शोधून काढले. मौलाना महंमद अलीने आपल्या बंद छापखान्याची सर्व मशिनरी गांधीजींना दिली. नव्या घरात आधी ती लावण्यात आली.

## शहानवाज खान

# ३९. जिंदगीभर गूँजते रहेंगे

देशाच्या स्वातंत्र्याचे युद्ध देशाबाहेर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अधिपत्याखाली लढले गेले. मी त्यांचा एक मामुली शिपाई होतो. आम्ही लोकांनी हत्यारांनी इंग्रज फौजांचा मुकाबला केला; पण लढाईच्या मैदानात आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही.

लाल किल्ल्यातून सुटल्यावर मला जवळपास दीड वर्षे महात्मा गांधींसोबत राहण्याची संधी मिळाली... मी त्यांना खूपच जवळून पाहिले. मी पाहिले की, ते आयुष्यातले प्रत्येक पाऊल सत्य आणि अहिंसेची तत्त्वे आचरून टाकीत असत. ते निश्चयपूर्वक हे मानीत की, कुठलीही प्रामाणिक व चांगली वस्तू प्राप्त करून घ्यायची असेल तर त्यासाठीचे उपायही प्रामाणिक उत्तमच असायला हवेत. आपल्या तत्त्वासाठी ते जगातला मोठ्यातला मोठा धोका स्वीकारायला घाबरत नसत. जेथे कुठे हिंसा आणि अत्याचार दिसेल तेथे ते त्याविरूद्ध अगदी निडरपणे लढत. नौखालीत जेथे जेथे अत्याचार झाले. तेथे तेथे अनवाणी पायी चालत गेले.

गाव न् गाव पालथे घातले. जेथे जेथे ते जात तेथे जगलीपणाची दृश्ये दिसत. जळालेली गावे, सर्वस्व गमावलेले व भेदरलेले लोक ज्यांचे सगळे काही नष्ट झाले होते असे. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिले तर जाणवायचे की त्यांना स्वत:च्या भविष्याची अजिबात खात्री नाही पण ज्यावेळी ते गांधीजींचा चेहरा पाहत त्यावेळी त्यांच्या दु:खी व उदास चेहऱ्यावर हास्य उमलायचे. ते नि:संकोच म्हणत की, आता बापूजी आले आहेत. आता आमचे कुणीही काहीही बिघडवू शकत नाही. त्यांच्यात एक आत्मनिर्भयता जागत होती. मी हेच बिहारमध्ये सुद्धा अनुभवले होते. मला असे वाटते की, मोठ्यातल्या मोठ्या फौजा जरी त्यांच्या रक्षणासाठी आल्या असत्या तरी त्यांना एवढे सुरक्षित ...वाटले नसते. जेवढे गांधीजी तेथे आल्यामुळे वाटले.

मला सारखे वाटायचे की, शेवटी या माणसात अशी कुठली ताकद होती? जो दुसऱ्यांचा आधार घेऊन चालायचा. त्याच्यामुळे या भेदरलेल्या आणि अन्याय सहन करणाऱ्या लोकांमध्ये एकाएकी इतकी बहादूरी कुठून आली ? या माणसाकडे अशी कोणती शक्ती होती त्यामुळे हा

अन्यायी लष्करासमोर एकटा उभा राहतो व त्यांना पराभूतही करतो ? निश्चितच ती सत्य आणि अहिंसेचे शैली होती. जिच्या पुढे अन्याय, अत्याचार आणि हिंसा उभेही राहू शकत नव्हते. ते जेथे जात तेथे लोकांना बहादूरीचा धडा देत.

बहादूरी ही लोकांच्या मनातून मृत्यूचे भय कायमचे काढून टाकत होती. मी लढाईच्या मैदानात शिपायांच्या बहादूरीचे खूप प्रसंग पाहिले आहेत. पण जी बहादूरी महात्माजी लोकांना शिकवीत होते ती वेगळ्याच प्रकारची बहादूरी होती. ते लोकांना सांगत होते की, अत्याचार आणि अन्याय याचा मुकाबला करताना स्वत:चे प्राण द्या पण इतर कुणाचे प्राण घेण्याचा प्रयत्न करू नका. ही सर्वांत श्रेष्ठ प्रकारची बहादूरी होती.

१९४८ च्या जानेवारीचा दिवस मला चांगला आठवतो. दिल्लीत अत्याचार आणि हिंसेला थांबवण्यासाठी त्यांनी शेवटचे मरणव्रत (उपवास) आरंभले होते. त्या दिवशी मी आणि माझे काही मित्र त्यांना भेटायला गेलो. ते त्या दिवशी खूपच आनंदात होते. हसता हसता म्हणाले, “मी आज फारच खूश आहे. कारण आजही मी अन्याय आणि अत्याचार यांच्याविरूद्ध लढतोय, गप्प बसलेलो नाही” उपवासाच्या चौथ्या दिवशी त्यांची स्थिती फारच बिघडली. डॉक्टरांनी सांगितले की, जर बारा तासाच्या आत त्यांनी उपवास सोडला नाही तर त्यांच्या प्राणाला धोका आहे. सर्व लोक घाबरले व सर्वांनी प्रयत्न केला की गांधीजींनी उपवास सोडावा. संध्याकाळी गांधीजींनी मला बोलावले व सांगितले “शाहनवाज, तुम्ही नेताजींचे शिपाई आहात. माझ्या सोबत तुम्ही वर्षापेक्षाही अधिक काळ काम केले आहे. मला फसवू नका. सत्य सांगा की, दिल्लीत अन्याय आणि अत्याचार संपले का ?” मी उत्तर दिले की... 'नाही' आता ही बाहेर उभी असलेली माणसे घोषणा देत आहेत. 'गांधीला मरू द्या' मी हो गोष्ट सांगिल्याबरोबर गांधीजीच्या चेहऱ्यांवर प्रसन्नता पसरली. त्यावेळी त्यांचे शब्द किती सुंदर होते. ते म्हणाले “जर गांधीची तत्त्वे मेली तर समजा गांधी जिवंत असतानाच मेला; पण जर गांधीची तत्त्वे जिवंत राहिली तर समजा की गांधी अमर आहे.”

## रविशंकर महाराज

## ४०. जेवढे आहे तेवढे तर वापरा

एकदा चार-पाच तरूण माझ्याकडे आले. बोलता बोलता ते म्हणाले “महाराज, आम्हाला अंडी खायचीय. तुमचं काय मत आहे ?” आता या प्रश्नाचे उत्तर ते काय देणार ? मी तात्काळ म्हणालो, 'मित्रा, अंडी खावी की नाही हे मला विचारून काय उपयोग ? ते अंडी देणारीलाच विचारलेले बरे' “पण दादा, आम्ही निर्जीव अंडी खाल्ली तर?” ‘आधी मला ते सांगा की तुम्हाला अंडी खायची गरज का वाटली?’ 'का? अंड्यात भरपूर व्हिटॅमिन आणि प्रोटीन असते' तरूणांपैकी एक उद्गारला. ‘आधी तुमच्याकडे आहे ते व्हिटॅमिन तर वापरा. कमी पडले तर मग मला विचारा.'आणि या संदर्भात गांधीजींची एक आठवण मला आली. मी ती मुलांना सांगितली. गांधीजी प्रयोगवीर होते. अनेक प्रकारचे प्रयोग करायचे. त्यांचे जीवनच एक प्रकारचा प्रयोग होता. एके दिवशी त्यांच्या मनात आले की, जर मानवाने कच्चे अन्न खाण्याची सवय लावली तर त्याचा वेळही खूप वाचेल व तो कमीत कमी वस्तुंमधून अधिकाधिक शक्ती मिळवू शकेल. झाले ! प्रयोगाला त्यांनी स्वत:पासून सुरूवात केली. ते त्यांचे वैशिष्ट्य होते. मला ती योजना आवडली म्हणून मीही त्यात सामील झालो. तीन-चार दिवस तर बापूजींचे फार छान गेले पण नंतर हगवणीचा त्रास सुरू झाला.

एकदा काही आणण्यासाठी मी त्यांच्या खोलीत गेलो. त्यांनी मला बोलविले. 'तुमचा प्रयोग चालू आहे? 'वजन कमी झाले?' “हो, पाऊण शेर कमी झाले पण शक्ती?' 'थोडी कमी झाली असे वाटते तर खरे' 'सध्या तुम्ही काय काम करता आहात?’ मी त्यांना माझ्यावर सोपविलेल्या कामांची यादी सांगितली. ‘ही सगळी कामे करता?’ ‘हो, त्यात काही अडचण येत नाही’ पण मग शक्ती कमी झाली असे कशावरून म्हणता ?' आता त्या बनियाला मी काय उत्तर देऊ. पण नंतर बापूजींनी जे भाष्य केले ते आयुष्यभर माझ्या लक्षात राहिले.

'तुम्हाला हे माहित आहे का, की आपल्या शक्तीपेक्षा जास्त शक्ती शरीरात निर्माण झाली तर ती विकारांना जन्म देते. हे फार समजून घेण्यासारखे आहे. म्हणून जेवढे काम करावयाचे आहे तेवढीच शक्ती उत्पन्न करायला हवी. जास्तीच्या शक्तीने कुठलाच लाभ नाही. उलट जास्तीची शक्ती मनात आणि इंद्रियांमध्ये विकार निर्माण करते'.

## रामनारायण पाठक

## ४१. विरोधी शक्तिंचा समन्वय

गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वात अनेक परस्पर विरोधी शक्तिंचा अद्‌भुत समन्वय आढळतो. क्रांतिकारक असूनही ते प्राचीनतेचा आदर करतात. मृदू आहेत पण हट्टीही आहेत. आग्रही आहेत पण खूप सूट देणारेही आहेत. प्रेमी आहेत तेवढेच भीषणही आहेत. त्यामुळे अनेकदा त्यांनी उच्चारलेली वाक्ये कमालीची भेदक ठरतात. एकदा ते म्हणाले की, 'सर्व देश अशा पामर अवस्थेत पडून राहण्यापेक्षा तो या पृथ्वीतलावरून नष्ट झाला तरी मला चालेल !'

दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले, 'स्त्री पुरूषाची भोगदासीच राहणार असेल तर मानव जाती संततीविहीन राहिलेली मला अधिक आवडेल.' वेळ आली व भारतात फार मोठा सत्याग्रह सुरू झाला तर हजारो युवकांना असह्य कष्ट भोगताना व मृत्यूमुखी पडताना पाहून त्यांच्या डोळ्यात एक टिपूससुद्धा येणार नाही, याची मी कल्पना करू शकतो. मला ते मानवापेक्षा नैसर्गिक गूढ शक्तींनी युक्त असलेले अधिक वाटतात. निसर्ग सूक्ष्मातल्या सूक्ष्म, केवळ दुर्बिणीमुळेच पाहू शकता येतील अशा जीवांनासुद्धा पोसतो. तोच निसर्ग आपल्या कुठल्यातरी अगम्य हेतूसाठी समुद्रात वादळे आणतो, पर्वतांना भेगा पाडतो. देशच्या देश उद्धवस्त करतो. गांधीजी अशाच तऱ्हेने एखाद्या अत्यंत सामान्यातला सामान्य माणसाची सेवा करू इच्छितात आणि हजारोंचा नाशही अपेक्षित करतात. निसर्ग एक उदाहरण म्हणून असंख्य व्यक्तिंना क्रूरपणे ठार मारतो. गांधीजी पण एक सत्य सिद्ध करण्यासाठी मोठ्यातला मोठा त्याग करायला सिद्ध आहेत. अगदी मनमोकळे व स्पष्टवादी असूनही मला ते त्यांच्या आत्मगहनतेतून स्फुरणाऱ्या शक्तींमुळे निसर्गासारखेच गूढ, अगम्य, अमेय व अप्रतिरुद्ध वाटतात.

## शंकरलाल बँकर

# ४२. हरहुन्नरी मुत्सद्दी

महंमद अली जीना जेव्हा होमरूल लीगचे मुंबई शाखेचे प्रमुख होते तेव्हा मी त्या शाखेचा मंत्री होतो म्हणून ते माझ्याशी खूप मोकळ्या गप्पा करीत. जवळपास एक वर्षभर मी गांधीजींबरोबर तुरुंगात होतो. त्यामुळे स्वाभाविकपणे ते गांधीविषयी चौकशी करीत, गांधींच्या साधू जीवनाचा माझ्यावर खूप मोठा परिणाम झाला होता, त्यामुळे मी त्यांच्याविषयी खूप बोलायचो. पण जीनांच्या मनात गांधीजीविषयी वेगळे विचार होते. ते मला म्हणाले, 'तुम्ही गांधीजींना ओळखत नाही. ते मोठे क्रांतिकारी आहेत पण महामुत्सद्दीही आहेत. बघा या सरकारशी असलेला संघर्ष त्यांनी किती चातुर्याने चालवला आहे. आधी ते लोकांशी संपर्क साधतात. ज्याविषयी त्यांना दुःख वाटते ती गोष्ट ते स्वत: हातात घेतात.

आंदोलन सुरू करुन ताकद गोळा करतात व मग संघर्ष सुरू करतात. तो संघर्ष जोरात चालत असतानाच काहीतरी गडबड होते. हिंसा झाली की सरकारचे हात बळकट होतील अशी पावले उचलायला ते सुरूवात करतात आणि संघर्ष आटोपता घेतात. तसेच झाले की शांतता प्रस्थापित होते. मग थोड्या दिवसांनी असंतोषाचे आणखी एखादे कारण आढळले की, पुन्हा लढाई सुरू करतात. असा संघर्ष सुरू करणे, मग तो आवरता घेणे, मग पुन्हा लढाई सुरू करणे अशा पद्धतीने ते लोकांना लढत चालू ठेवण्याचे शिक्षण देत असतात. सरकारची ताकद फार मोठी आहे व लोकांमध्ये दौर्बल्य आहे. त्यामुळे सतत संघर्ष प्रारंभ करणे, मध्येच थांबवणे, मग पुन्हा सुरू करणे व लोकांना त्यासाठी तयार करीत राहणे हे गांधी करतात. तुम्ही समजता तसे ते साधू पुरूष नाहीत. ते मोठे हरहुन्नरी, मुत्सद्दी पुरूष आहेत.

## ४३. मग तुम्हाला काय सिनेमा काढायला सांगू ?

१९२२ साली गांधीजींना सहा वर्षाची कैद ठोठावण्यात आली. त्यांच्यासोबत मलाही एक वर्षाची कैद झाली. वर्षभर मी त्यांच्यासोबत तुरुंगात होतो. त्यावेळी सूत कातणे व पिंजणे यांना त्यांच्या आयुष्यात मुख्य स्थान होते. शरीर दमेपर्यंत रोज दोन तास पिंजायला आणि चार तास कातायला त्यांनी ठेवले होते. अशात ज्यांची कैद पूर्ण व्हायला आली होती असा एक नेता त्यांना भेटायला आला व म्हणाला, "बापू तुरुंगातून बाहेर गेल्यावर मी काय करावे ? तुमचा सल्ला घ्यायला आलोय." गांधीजींनी सांगितले, "बाहेर गेल्यावर अगदी जोरात खादीचा प्रचार करा." ते नेते खादीप्रेमी होते व नियमितपणे सूतही कातीत. पण लोकांच्या वृत्तीविषयी त्यांचे मन द्विधा होते. ते म्हणाले, "बापू आपले म्हणणे बरोबर आहे, पण ही खादी खपणार कशी ? लोकांना ती आवडली नाही तर ?" त्या भल्या माणसाच्या या प्रश्नाने गांधीजींना उद्विग्न केले. थोड्या व्यग्रतेने ते म्हणाले, "ठीक आहे. तर मग आता तुम्हीच सांगा की मी दुसरे कुठले काम तुम्हाला सांगू ? असं सांगू की तुम्ही एक सिनेमा काढा ? सिनेमा लोकांना खूप आवडतो. शेकडोंच्या संख्येने लोक तो बघायला येतील आणि त्यासाठी पैसेही देतील.

पण त्याने काय होणार ? आपले काम लोकांना आवडेल तेच करावयाचे नाही. ज्यात त्यांचे हित आहे तो मार्ग त्यांना दाखवणे योग्य आणि चरखा हाच तो मार्ग आहे." गरीब प्रजेला लज्जारक्षणापुरतेसुद्धा वस्त्र मिळत नाही हे माहित झाल्याबरोबर त्यांनी बाकी सर्व वस्त्रांचा त्याग केला व अर्धवस्त्र राहणे पसंत केले. देशाच्या गरिबीचे दु:ख तर आहेच पण त्याहीपेक्षा अधिक लोकांमध्ये त्यासंबंधी असलेला आळस त्यांना खटकत होता. आपल्या देशांची इतकी दयनीय स्थिती का झाली ? त्याच्या मुळात हा आळसच आहे. प्रजेला जर गरिबी बोचत असेल तर खूप प्रयत्न करून तिने ती दूर करायला हवी. पण आज तर आळसाचे प्रमाण इतके वाढले आहे की, जेवढी गरिबी व दु:ख मोठे तितकाच आळसही मोठा ! हा आळस दूर झाला तर गरिबी दूर होईल आणि हा आळस दूर करण्याचा एकमेव मार्ग आहे जे काम खेड्यातील जनता सहजतेने करू शकेल ते तिला करायला लावणे. त्यात त्यांच्या शरीराचे व मनाचेही भले आहे.

## ४४. विश्वामित्र असे का वागले ?

तुरुंगात वेळ मिळाला की त्याचा पुरेपूर उपयोग करावयाचा असे गांधीजींनी ठरवले होते. बाहेर असले की, सार्वजनिक कामांचा इतका रेटा असायचा की, दुसरे काही करायला फुरसतच मिळायची नाही. तुरूंगात मात्र अशा कामांसाठी भरपूर वेळ मिळायचा. मात्र त्यासाठी कार्यक्रमाची अगदी व्यवस्थित मांडणी करावी लागे. गांधीजींच्या दृष्टीने चरखा सर्वांत जास्त महत्त्वाचा असला तरी लिहिण्या-वाचण्याचे कामही महत्त्वाचे होते. साधारणत: रोज चार तास त्यात जायचे. कुठली पुस्तके आधी वाचायची याचा विचार त्यांनी आधीच करून ठेवला होता. त्याप्रमाणे नियमित वाचन सुरू झाले. गुजराथी पुस्तकांत 'रामायण, महाभारत, भागवत, टिळकांची गीता, ज्ञानेश्वरी इत्यादी पुस्तके होती. वाचण्यासोबत लिहिणेही चालले होते. 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास', 'बालपोथी' वगैरेचे लेखन तुरुंगात झाले.

गांधीजींनी 'ज्ञानेश्वरी'चा गुजराती अनुवाद वाचला. त्यांना तो ग्रंथ फारच भावला, ते म्हणाले-"मी तुम्हाला हे पुस्तक वाचण्याविषयी सांगू शकतो..." माझे मन त्यावेळी आध्यात्मिक बाबींकडे फारसे वळले नव्हते. मी म्हटले, "तुम्ही सांगताहात तर वाचावेच लागेल. पण माझी ती वृत्ती नाही," त्यांना माझे मन कळत होते. त्यांनी पुन्हा त्याविषयी आग्रह केला नाही. पण नंतर खूप दिवसांनी तो ग्रंथ वाचण्याचा योग आला आणि त्यावेळी तुरुंगात वाचलं नाही याचा खूप पश्चात्ताप झाला. ईश्वराची कृपा असली तरच असा ग्रंथ वाचण्याची बुद्धी होते.

गांधीजी लोकमान्य टिळकांची 'गीता' वाचत होते तेव्हा एके दिवशी मला म्हणाले, "तीन दिवसापासून माझे मन फार दु:खी आह."

"का बरं?" मी विचारलं.

ते म्हणाले, "मी लोकमान्य टिळकांची 'गीता' वाचतोय. त्यात आपद्धर्माविषयी सांगितलयं व त्यासाठी विश्वमित्राचा दृष्टांत दिला आहे. दुष्काळ पडला होता. कुठेही अन्नाचा एक दाणासुद्धा मिळत नव्हता. विश्वमित्रांना खूप भूक लागली. शेवटी ते चांडाळाकडे गेले व तेथे मेलेल्या कुत्र्याचे मांस खायला बसले. चांडाळ म्हणाला, "तुम्ही ब्राम्हण, मी चांडाळ. हे मांस सुद्धा मेलेल्या कुत्र्याचे आहे नि तुम्ही ते खाता आहात. हे कसे ?" विश्वमित्रांनी उत्तर दिले- "यावेळी ही गोष्ट काढू

नकोस. हा आपद्धर्म आहे.  जीव राखायचा असेल तर याशिवाय पर्याय नाही. म्हणून तू बोलू नकोस." ही गोष्ट सांगून किंचित अडखळत गांधीजी म्हणाले. "हिंदू धर्म असा कसा असेल? विश्वमित्राने प्राण द्यायला हवे होते पण ते असे का करतील ? माझ्या मनातून ही गोष्ट जात नाही आणि त्यामुळेच खूप दु:ख होते." दोन-तीन दिवस ते सतत त्यावर विचार करीत होते. मी त्यांचे विचार जाणू शकलो नाही. पण मला वाटते की, त्या काळात जे घडले ते घडले. आज त्याविषयी दु:ख का कारायचे ?

## नरहरी पारेख

## ४५. महादेवभाईंची डायरी

१९१७ मध्ये महादेवभाई गांधीजींच्या सोबतीला आले. थेट १९४२ मध्ये आपल्या जीवनांपर्यंत त्यांनी आपली डायरी लिहिली. गांधीजींचा पत्रव्यवहार, त्यांची भाषणे, वेगवेगळ्या व्यक्तिंशी झालेली त्यांची बातचित, विविध विषयांवरचे त्यांचे विचार या सर्वांची नोंद ते घेत. गांधीजींचे सर्व जीवन सर्वथा खुले होते. त्यांच्याबाबतीत जेवढ्या खासगी आणि व्यक्तिगत गोष्टी जगाला ज्ञात होत्या, तेवढ्या अन्य कोणा नेत्याविषयी. ते क्वचितच जाणत असतील. तरी, गांधीजीविषयी जाणून घेण्यासारख्या पुष्कळ गोष्टी लोकांना अजून कळलेल्या नाहीत.

बाहेर प्रसिद्धी न पावलेली गांधीजींची अनेक वैशिष्ट्ये आणि जीवनप्रसंग, तसेच आयुष्याविषयीचे त्यांचे विचार या डायऱ्यांमध्ये वाचायला मिळतात. त्यांनी वाचलेल्या अनेक पुस्तकांचे विवेचन आणि काही पुस्तकातली आकर्षक उदाहरणेही या डायरीत आढळतात. महादेवभाईंच्या डायऱ्या गांधी जीवन चरित्राचा कच्चा पण अत्यंत महत्त्वाचा मसाला आहे. मानव जातीला प्रेरणा देणारे बहुउपयोगी साहित्य म्हणून त्यांचे महत्त्व अबाधित राहील. कथावस्तूच्या उदात्तपणाविषयी व ते सादर करण्याच्या चित्ताकर्षक शैलीमुळे 'महादेवभाईंच्या डायरी' चे स्थान जगातल्या अशा प्रकारच्या साहित्यात सर्वोच्च आहे.

# घनश्यामदास बिरला

## ४६. रोग्याच्या मृत्यूशय्येवर

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. दिल्लीत एक बाई अगदी मरणासन्न होती. रोगाशी लढता लढता बिचारीचे शरीर पार खंगून गेले होते. केवळ श्वास चालत होता. तिने जगण्याची आशा सोडून दिली होती. केवळ शेवटच्या यात्रेला जायचे आहे, असे समजून ती रामनामाचा जप करीत असे. पण तिला असे वाटायचे की, 'जर गांधीजींचे दर्शन झाले तर फार बरे. जाता जाता शेवटी निदान त्यांना भेटता तरी यावे ?' गांधीजी तर दिल्लीच्या जवळपास नव्हते. त्यामुळे त्यांचे दर्शन होणे अशक्यच. पण मृत्युपंथाला पोहचलेल्या व्यक्तीच्या आशेवर पाणी पडणे मला योग्य वाटेना. मी तिला म्हटले, 'पाहू या. ईश्वर कदाचित तुझी इच्छा पूर्ण करेल.’

दोन दिवसानंतर मला कळले की, गांधीजी कानपूरहून दिल्ली मार्गे अहमदाबादला जात आहेत. त्यांची गाडी सकाळी चार वाजता दिल्लीला पोहचत होती. आणि अहमदाबादची गाडी पाच वाजता निघत होती. दरम्यान  केवळ तासाभराचे अंतर होते. आजारी बाई दिल्लीपासून दहा मैलावर होती. तासाभरात तिला भेटून परत येणे कठीण काम होते.

थंडीचे दिवस होते. वारा जोरात वाहात होता. सकाळच्या वेळी त्यांना मोटारने (त्यावेळी मोटारी टप असलेल्या नसत) २० मैलांचा प्रवास करवणे भयानक होते. दुसरे, गांधीजी येत आहेत हे त्या दु:खी बाईला माहितही नव्हते. गांधीजी गाडीतून उतरले. मी त्यांना दबक्या आवाजात विचारले, 'आज आपल्याला थांबता येईल का?' गांधीजी म्हणाले, ‘फार मुश्किल आहे.' मी हताश झालो. त्या रोगी स्त्रीची किती निराशा होईल याची मला कल्पना होती.

गांधीजींनी विचारले, “थांबण्याविषयी का सांगता आहात ?” मी त्यांना कारण सांगितले. गांधीजी म्हणाले, 'चला, आत्ताच चला.' ‘पण या थंडीत आणि वाऱ्यात तुम्हाला सकाळी सकाळी मोटारीत बसवून कसा घेऊन जाऊ?'

‘त्याची चिंता करू नका. आधी मला मोटारीत बसवा. वेळ घालविण्यात  काय अर्थ आहे? चला चला..' मी गांधीजींना मोटारीत बसवले. थंडी भयंकर  होती. सुसाट वारे वाहत होते. सूर्योदय

अजून झाला नव्हता. सर्वत्र ब्राह्ममुहूर्ताची शांतता होती. ती रोगी महिला मृत्युशय्येवर पडून 'राम राम' म्हणत होती. गांधीजी तिच्या खाटेजवळ पोहचले. मी तिला म्हटले 'बघ, गांधीजी आले.' तिला विश्वासच वाटत नव्हता. ती घाबरली. तिने उठून बसण्याचा प्रयत्न केला पण शरीरात तेवढीही शक्ती नव्हती. तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्या रोगी स्त्रीच्या आत्म्याला किती शांती लाभली हे तिचे डोळेच सांगत होते. गांधीजींची गाडी स्टेशनवरून सुटली होती पण पुढच्या स्टेशनवर आम्ही तिला पकडू शकलो.

## बलवंतसिंह

## ४७. चिडिया चुग गयी खेत

एकदा बापूजींनी एक योजना मांडली. सर्वांची उष्टी भांडी क्रमाक्रमाने दोन-तीन जणांनी धुवायची. त्यामुळे लोकांमध्ये प्रेमभावही वाढेल, एकमेकांची भांडी धुण्यात जो घृणाभाव असतो तोही कमी होईल. इतरांचा वेळ वाचेल तो वेगळाच. मला ही गोष्ट पटली नाही. मी त्यांना म्हणालो, ‘सगळ्याची उष्टी भांडी धुण्यामुळे खूप अव्यवस्था माजेल.' बापू म्हणाले, 'अव्यवस्थेत व्यवस्था स्थापित व्हावी हे तर आपले काम आहे. चला, पहिली पाळी माझी आणि बा ची. बस्स. बा ना घेऊन ते भांडी घासण्याच्या जागी जाऊनसुद्धा बसले. सगळ्यांना त्यांनी सांगितले. ‘आपापली उष्टी ताटे इथे ठेवा, हात धुवा आणि आपल्या कामाला लागा.' प्रथमत: तर लोक घाबरलेच. पण बापूंचा चेहरा बघितल्यावर त्यांनी आपापली भांडी ठेवली व निघून गेले. बा आणि बापूंनी भांडी घासायला सुरूवात केली. माझ्याकडे रसोड्याचा चार्ज होता. मला ते नाही म्हणू शकत नव्हते. मी ही त्यांना मदत करू लागलो.

जेव्हा बा आणि बापू सर्वांची उष्टी भांडी साफ करीत होते, तेव्हा माझ्या मनात आनंद आणि लाजेचे द्वंद सुरू होते. त्याबरोबर मनात हाही विचार पक्का होत जात होता की जर बा आणि बापू हे काम करू शकतात तर आपल्याला हे काम लहान, ते काम मोठे असा भेद करायलाच नको.

इकडे बा आणि बापूंचा भांडी धुताधूता हास्यविनोद चालला होता. कोण भांडी अधिक स्वच्छ करतो, या विषयी त्यांच्यांत जणू स्पर्धाच लागली होती.  बापूजी मला म्हणाले, ‘काय बलवंतसिंह, भांडी कशी साफ झाली आहेत ? तुम्ही हिंमत का सोडता ? माणसाने एकदा निश्चय केला तर त्याला जगातले कुठलेही काम अशक्य नाही. आपल्या घरांमध्ये काय होतं बघं. स्त्रियाच सर्वांची खरकटी काढत असतात. आपलं एक मोठं कुटुंब आहे. आपण तरी स्त्री-पुरूष असा भेद करता कामा नये. म्हणून तर मी रसोड्याचा चार्ज कुणा महिलेकडे न देता तुझ्याकडे दिला. साबरमतीत रसोडा विनोबा सांभाळायचे. मी असं मानतो की स्त्री-पुरुषांच्या कामाचा भेद किमान आपण आश्रमात तरी पाळायला नको आणि रसोडा हा तर पुरूषांनीच चालवायला हवा. माझ्या

आयुष्यात मी असे अनेक प्रयोग केले आहेत, मी या निर्णयापर्यंत आलोय की सामुदायिक रसोडा चालविण्यात जी कुटुंब भावना वाढते ती अन्य कशामुळेही वाढत नाही. शिवाय सर्व वस्तू व्यवस्थित व स्वच्छ ठेवले जातात आणि जेवढे जेवणारे आहेत त्यांना ईश्वरस्वरूप मानून प्रेमाने जेवू घालणे ही आध्यात्मिक प्रगतीची मोठी साधना आहे. तू त्यात पास झालास तर मी असं समजेन की तू सेवा करू शकतोस.' माझ्या मनात एकीकडे चाललं होते की बापू सर्व भांडी तशीच ठेवून येथून जेवढ्या लवकर जातील तेवढे बरे. दुसरीकडे असेही वाटायचे ते जेवढा जास्तीत जास्त वेळ येथे राहतील तेवढे बरे. मी चित्रकार असतो तर त्यावेळचे चित्र काढून लोकांपुढे ठेवले असते. अनेकदा असे वाटते की, बापूंनी परत यावे आणि त्यांच्यापासून जगण्याचे असे अनेक धडे घ्यावेत. पण...अब पछताये क्या होत है, जब चिडिया चुग गयी खेत.

## बापूंचे आशीर्वाद

## ४८. नि:स्वार्थ सेवेमुळेच हृदयाला स्पर्श करता येईल

एका विशिष्ट दिवशी सावली गावात देवीला बोकडाचा बळी देण्याचे काम सामूहिकरित्या घडले होते. अनेक लोक एक एक बोकडा घेऊन तेथे जात, देवीसमोर बोकडाचा बळी देत व नंतर त्याचे मांस शिजवून खात. मी त्याचे सविस्तर वर्णन बापूजींना लिहून पाठवले. ते फार भयानक दृश्य होते. मोठमोठे जाड बोकड येथे टांगण्यात आले होते. माझ्या पत्राच्या उत्तरात बापूजींनी लिहिले.

वर्धा, १७/९/१९३५

चि. बलवंतसिंह,

देवीसमोर बोकड बळी देण्याचे वर्णन फार दु:खद आहे. युगानुयुगे चालणारा हा अंधविश्वास आपण एका क्षणात दूर करू शकणार नाही. लोक समजू शकतील अशी त्यांची सेवा जोपर्यंत आपण करू शकणार नाही तोपर्यंत आपली मते ऐकण्यासाठी त्यांचे मन तयार होणार नाही. बुद्धीचा विकास तर त्यापेक्षाही कठीण आहे. नि:स्वार्थ सेवेमुळे हृदयाला सहज स्पर्श करता येतो. म्हणून आज तर आपल्याला देवीला बोकड बळी देण्याऱ्यांमध्येच सेवेचे काम करावे लागेल. संधी मिळताच त्यांचा भ्रम दूर करता येईल. मात्र हे लक्षात ठेव की, जे दृश्य तू निरक्षर लोकांमध्ये पाहिले तेच दृश्य कलकत्त्याच्या शिकल्या सवरलेल्या लोकांमध्येही पहायला मिळेल आणि तेही खूप मोठ्या प्रमाणात.

## क्लेर शेरीडन

## ४९. विलक्षण साधेपणा

त्या लहानश्या पण महान असलेल्या महात्म्याचे फार जवळून निरीक्षण करण्याचे भाग्य मला लाभले. माझ्या भगिनीसारख्या असलेल्या सरोजिनी नायडूमुळे त्यांचा पुतळा बनविण्याची संधी मला मिळाली. हे काम सोपे नव्हते. पुतळा करवून घेण्यासाठी ते निवांत बसतील हे अशक्यच . त्याचे कारण एक तर त्यांची नम्रता किंवा कामाचा विलक्षण ताण किंवा मग कलेविषयीची अनास्था यापैकी काहीही असू शकेल. त्यावरून लोकनायक लेनिनची आठवण झाली. १९२० मध्ये मास्कोत क्रेमलिनच्या त्यांच्या कार्यालयात मला प्रवेश देण्यात आला. त्यावेळी त्यांनी अशाच अटी घातल्या होत्या. या लोकनेत्यांमध्ये आश्चर्य वाटेल असे साम्य आहे. हिंसा आणि अहिंसेविषयी दोघांमध्ये मतभेद असतीलही पण दोघेही प्रचंड आदर्शवादी होते.

मी प्रथमत: महात्माजींना भेटले तेव्हा त्यांनी सांगितले, (जसे लेनिनने सांगितले तसेच) खास पुतळा तयार करण्यासाठी मी तुझ्यासमोर बसू शकणार नाही. मी माझं काम करीत राहीन. त्या स्थितीत तुला जे काय करता येईन ते कर. गांधीजी जमिनीवर बसले व त्यांनी चरखा चालवायला सुरूवात केली. लेनिनने त्याच्या ऑफिसमधल्या खुर्चीवर बसून वाचन सुरु केले होते.

या दोन्ही प्रसंगात शेवटी आम्हा दोघांमध्ये मैत्री झाली होती. एके दिवशी गांधीजींनी लेनिन बोलायचा तसेच थोड्या व्यंगात्मक शैलीत सांगितले, “तर तुम्ही विन्स्टन चर्चिलच्या भगिनी आहात ? जुनी गंमत. विन्स्टनची एक सख्खी बहिण त्याच्या अत्यंत कट्टर शत्रूशी मैत्री करू पाहत होती ! गांधीजी पुढे म्हणाले, “तुम्हाला हे माहित आहे ना की तुमच्या भावाने तुम्हाला मला भेटायला नाही म्हटले होते ? पण तुम्हाला भेटून मला किती आनंद झाला हे तुम्ही त्याला सांगणार का ?''

लेनिनही जवळपास असेच बोलला होता. तुम्ही तुमच्या भावाला सांगा-वगैरे. या दोन्ही महान पुरूषांनी या जगाला जो अमर संदेश दिला तो दीन, दु:खी व दलितांमध्ये आशा व उत्साह जागवणारा आहे. त्या संदेशामुळे रंक माणसाचा माथा उंचावतो, त्याला या जगात आपलेही एक

स्थान आहे हे जाणवते. ज्यांनी लेनिनसाठी प्राण गमावले ते वीर होते पण ज्यांनी गांधीजींसाठी प्राण पाखडले, ते वीर आणि शहीद दोन्ही होते.

अमेरिकेचा शिल्पकार जो डेविडने पण गांधीजींच्या डोक्याची प्रतिकृती बनवली होती. त्याच्याशी बोलण्याची संधी मला मिळाली. जो डेविडने आपल्या काळातल्या बहुतेक श्रेष्ठ स्त्री-पुरुषांचे पुतळे बनविले आहेत. एका बाबतीत आम्ही दोघेही एकमत होतो. या लोकांना भेटून आम्हाला निराशाच अधिक आली. त्या सगळ्यासोबत पहारेकऱ्यांचे ताफे असत आणि ते स्वत:च्या महालात जणू बद्धावस्थेत असत. त्यापैकी एकाचीही छाप आमच्या मनावर पडली नाही. पण गांधीजी त्या सर्वांपेक्षा वेगळे होते. किरकोळ शरीरयष्टी असणाऱ्या, अनवाणी चालणाऱ्या आणि खादी पांघरलेल्या या माणसाचा विलक्षण साधेपणा मनावर गहिरा परिणाम करणारा होता.

# धीरूभाई ठाकर

## ५०. भव्योज्ज्वल जीवनाची चिरप्रतिष्ठा

महादेवभाई देसाई यांचे सुपुत्र नारायण देसाई यांनी लहानपणापासून गांधी विचार व आचाराचे संस्कार घेतले आहेत. मातृभाषा गुजराती बरोबरच बंगाली, हिंदी, इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व आहे. एका डझनापेक्षा अधिक पुस्तके त्यांनी लिहिली पण त्याच्या सृजनशीलतेचा खरा उन्मेष महादेव देसाई आणि गांधीजींविषयी त्यांनी लिहेलेल्या चरित्र-ग्रंथांमध्ये आहे. ‘अग्निकुंडात उगवलेले गुलाब' (१९९२) हे महादेवभाईंचे समग्र चरित्र आहे. एखाद्या कांदबरीसारखी रसवत्ता असलेले ते प्रमाणभूत चरित्र आहे. आणि ते जेवढे महादेवभाईंचे चरित्र आहे तेवढेच ते गांधीजींचेही आहे.

नारायणभाईंची श्रेष्ठ देणणी म्हणजे गेली कित्येक वर्षे परिश्रम करून त्यांनी ४ भागांमध्ये तयार केलेले गांधीजींचे बृहत चरित्र होय. त्याचे शीर्षक आहे. 'मारू जीवन ओज मारी वाणी' जवळपास २२०० पानांमध्ये विस्तारित या जीवन चरित्राचे प्रकाशन गुजरातच्या संस्कारी-जीवनातील आणि गुजराती साहित्यातील महत्त्वपूर्ण घटना आहे. गांधीजी आणि त्यांच्या जीवनकार्यावर असंख्य पुस्तके लिहिली गेली. पण गुजरातीत संपूर्ण आणि सुग्रथित असे अधिकृत बृहद गांधी चरित्र उपलब्ध नव्हते. गांधी जीवनाच्या प्रत्येक क्षणाचा हिशोब देणारे, विश्व साहित्यात स्थान प्राप्त करेल असे प्रभावशाली गांधी चरित्र लिहिण्याची महादेवभाईंची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी स्वत:च्या डायऱ्यांमध्ये साम्रगीही एकत्र केली पण त्यांचे दुदैवाने अकाली निधन झाले. नारायणभाईंनी हे चरित्र लिहून पित्याची मनोकामना पूर्ण केली. लेखकाने अनेक दुष्प्राप्य साधनांचा उपयोग करून महाकाव्यसदृश या भव्य सुंदर चरित्र कथेला एक श्रद्धेयता मिळवून दिली. या महाकथेत अनेक रसपरिपूर्ण उपकथा सहजपणे मिसळल्या आहेत.

नारायणभाईच देऊ शकतील असे अनेक सूक्ष्म संदर्भ रत्नकणांप्रमाणे या आत्मकथेत झगमगताना आढळतात. नारायण देसाई गांधी तत्त्वज्ञानाला जागतिक पातळीवर प्रस्थापित करणारे समर्थ चिंतक आहेत. परंतू ते सर्वात अधिक विश्वविभूती गांधीजींच्या भव्योज्ज्वल जीवनाला अक्षरबद्ध करून गुजराती साहित्यात त्याची चिरप्रतिष्ठा करणारे समर्थ चरित्रकारही आहेत. त्यांची हौ अक्षरसेवा गांधीजींइतकीच चिरस्मरणीय राहील.

# इंदूलाल याज्ञिक

## ५१. ऐतिहासिक सभा

अस्पृश्यता दूर करण्याची चळवळ, मुंबई-पुण्यात गांधीजी येण्यापूर्वी सुरू झाली होती. गुजराथेत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यांच्या उद्धारासाठी १९ व्या शतकापासून प्रयत्न सुरू होते. पण गांधीजींनी देशात पाऊल ठेवताक्षणीच अस्पृश्यता निवारण्याचे पुण्यकार्य हे स्वत:चे जीवितकार्य ठरवले व एका नव्या इतिहासाचा प्रारंभ झाला. गांधीजींच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर १८९७ मध्ये गोधरा येथे गुजरात राजकीय परिषद भरली. शेवटच्या दिवशी गांधीजींच्या प्रेरणेने व ठक्कर बाप्पा आणि मामा फडके यांच्या प्रयत्नामुळे गुजरातचे कार्यकर्ते, शहरातले सवर्ण व अंत्यज बंधू भगिनींची एक सभा भंगीवाड्यात बोलावण्यात आली.

स्मशानाच्या रस्त्यावर असलेल्या त्या वस्तीत गांधीजींचे व इतर सवर्ण पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी भंगी बांधवांनी गुढ्या-तोरणे उभारली व रस्ताही खूप सुशोभित केला. पाहता पाहता तेथे हजारो लोक जमा झाले असे दृश्य गुजरातमध्ये पहिल्यांदाच दिसत होते की, श्रीमंत शेठ-सावकर, वकील, व्यापारी, अन्य गृहस्थजन व भंगी एकमेकांत मिसळून बसले आहेत. पाहुण्यांच्या येण्याची वेळ झाली तसतशी भंगी बांधवांची घालमेल सुरू झाली. ब्राह्मण, वाणी, व्यापारी आज आपले पाहुणे म्हणून भले येवोत पण आपण त्यांना स्पर्श कसा करायचा ? त्या बांधवांनी हे ठरवलं की, पाहुणे आले की सर्वांनी आपआपल्या घराच्या छपरावर चढून बसायचे व तेथून गांधीजींचे भाषणही ऐकायचे. ठक्करबाप्पा आधी आले. वस्तीतली एवढी मोठी सभा व सवर्ण बंधूंची हजेरी पाहून ते प्रसन्न झाले. पण त्या आधी ज्या प्रमुख भंगी बांधवांना ते भेटून गेले होते त्यांची गैरहजेरी त्यांना जाणवली. सहज नजर वर करून त्यांनी पाहिले तर मुलंबाळं व स्त्रियांसह सारे भंगी बांधव छपरावर बसलेले. ते चकित झाले. पण हार मानणाऱ्यापैकी ते नव्हते. दु:खी मनाने त्यांनी त्या बांधवांना वारंवार विनंती केली. हात जोडले शेवटी बहुतेकांना खाली उतरवण्यात यशस्वी झाले.

## तनसुख भट्ट

## ५२. वेगळ्या पद्धतीची अहिंसा

आपल्या शेतात नासधूस करणाऱ्या माकडांना गावातले लोक गोफणीने हाकलत असत. गोफणीच्या दगडांचा मार हाडं तोडणाराच असे. त्यापेक्षा गांधीजींच्या अहिंसक आश्रमाची शेती काय वाईट ? तिथे निदान अशा पद्धतीची हाणामारी तरी होत नाही. कदाचित असा विचार करून माकडांची टोळकी आश्रमात शेतीकडे वळली. आश्रमात मुळा, टमाटे, पपई, नारंगी वगैरे असत. या कंदमुळांचा आणि फळांचा आहार माकडांना आवडला. परिणामी आश्रमातील शेती नुकसानीत यायला लागली. गांधीजींकडे तक्रार गेली. ते फार व्यवहारी होते. शेती परिश्रमाने करावी, भाजीपाला घ्यावा आणि शेवटी तो माकडांच्या हवाली करावा हे काम मूर्खपणाचे ठरले असते. म्हणून या अहिंसक महात्म्याने पंचमहालमधून धनुष्यबाणधारी भिल्ल बोलावले व त्यांना शेतीवर पहारेकरी म्हणून नेमले. या माकडांना बाणांनी वेळ प्रसंगी घायाळ करण्याची परवानगीसुद्धा त्यांनी दिली. जीवदयेपेक्षा गांधीजींची ही अहिंसा अगदी वेगळ्या प्रकारची होती.

# मुकुलभाई कलार्थी

## ५३. मोची बापू !

एकदा वल्लभभाई बापूंना म्हणाले, ‘गेल्यावर्षी येथे एक चांगला मोची होता. आताशी चांगले मोची मिळत नाहीत. माझे जोडे म्हणून मी परत पाठवून दिले’ बापूजी म्हणाले, ‘मी चामडं मागवून शिवून देतो, आपण शिकलेली कला आपल्याला अजूनही आठवते का ते तर पाहू? मी फारच चांगले जोडे शिवायचो, हे तर तुम्हालाही माहित आहे. माझ्या कामगिरीचा नमुना सोदपुरच्या खादी प्रतिष्ठानमध्ये आहे. येथे सोराबजी अडाजणी आले होते.

त्यांच्यावर सत्यानंदचे फार प्रेम. त्यांनी मला लिहिले की ‘या माणसाला तुमच्या हातांनी बनवलेले जोडे पाठवले तर फारच छान, मी त्याला पाठवलेही पण तो तर अतिनम्र बंगाली बाबू. तो म्हणाला, 'हे जोडे माझ्या पायासाठी नाहीत. माझ्या मस्तकासाठी आहेत’ त्याने एकही दिवस ते वापरले नाहीत. सांभाळून ठेवले आणि शेवटी खादी प्रतिष्ठानच्या संग्रहालयाला भेट दिले. त्या दिवशी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीसाठी ‘आत्मकथे’ची नवी प्रकरणे महादेवभाईंनी पूर्ण केली होती. बापूंनी ती सर्व तपासली.

या प्रसंगाची आठवण झाली. तेव्हा बापू म्हणाले, ‘महादेव, या संक्षिप्त आवृत्तीत माझ्या जोडे बनविण्याचा किस्सा कुठेच कसा नाही ? तो तर यायलाच हबा. टॉलस्टॉय फॉर्ममध्ये हा उद्योग छान चालायचा. मी कित्येक मुलांचे जोडे तयार करून दिले. कॅलनबेक एका ट्रॅपिस्ट मानेस्टरीत शिकून आले होते व त्यांनी मला ते शिकवले.

## ५४. चूक-भूल माफ करा !

बापूजी रविवारी दुपारी तीन वाजेनंतर मौन पाळीत. कुणाला भेटायचे किंवा बोलायचे असेल तर रवी आणि सोम यातला काही वेळ राखीव असे. एकदा तीन वाजायला दोन-चार मिनिटेच बाकी होते. तेवढ्यात वल्लभभाई म्हणाले...'चला, आता चार-पाच मिनिटेच आहेत. तुम्हाला जे काही विचारायचं-सांगायचं आहे ते उरकून टाका.’ ते ऐकून महादेवभाई म्हणाले, ‘तुम्ही तर असे बोलता आहात जणू काही शेवटचे 'विल'च तयार करावयाचे आहे.' बापू म्हणाले- ‘हा तसं असेल तर माझं म्हणणंही नोंदवून घ्या. काही चूक-भूल झाली असेल तर माफी करावी' असे म्हणून ते मुलं हसतात तसे हसले. त्यांना एक गोड आठवण येत होती. ते म्हणाले -'बिचारी बा नेहमी म्हणायची, काही चूक-भूल झाली असेल तर मला माफ करा. वल्लभभाईंनी विचारले, 'हो पण केव्हा म्हणायच्या ?' बापू-“अरे, मला पकडायला पोलीस आले तेव्हा. डोळ्यातून अश्रू पाझरायचे व तोंडाने म्हणायची 'काही चूक-भूल झाली असेल तर माफ करा.' तिला बिचारीला वाटायचं की या जन्मात जी भेट झाली ती झाली आणि काय सांगावं माफी मागितल्याशिवाय मेलो बिलो तर ?”

## ५५. उत्तम गाता आले तरच गा

एके दिवशी सकाळच्या प्रार्थनेत महादेवभाईंनी 'उठ जाग मुसाफिर' हे भजन म्हटले. पण महादेवभाई त्या भजनाचा रागही विसरले व चालही. परिणामी, तीन-चार सुरांची सरमिसळ झाली. प्रार्थना संपल्यानंतर थोड्या वेळाने बापूंनी महादेवभाईंना सांगितले...’जर उत्तम रितीने गाता आले नाही तर माझ्या लेखी कितीही चांगलं भजन किंवा भाष्य असले तरी ते निरर्थक ठरते.'

आज सकाळी तर मला ते कधी संपेल असे झाले होते. नंतर झवेरचंद मेघाणी यांची आठवण करून ते म्हणाले 'मेघाणी असे म्हणत की त्यांची गीते जेव्हा ते स्वत: म्हणतात त्याचवेळी त्याचा 'रस घेता येतो व अर्थही कळतो. त्यांचे म्हणणे खरे आहे, असे मला वाटते.'

## ५६. इतके घाबरता का ?

एकदा बा आणि बापू रोजच्या नियमाप्रमाणे फिरायला बाहेर पडले. कशी कोण जाणे पण बापूंना दगडाची ठेच लागली व अंगठ्यातून भळभळा रक्त वाहायला लागले. ते पाहून बापूजी बा ला म्हणाले, “अगं लौकर एखादी पट्टी आण व ती जखम बांध.” त्या म्हणाल्या, “एरव्ही तर सांगता की मी मरणालासुद्धा भीत नाही म्हणून. मग एवढी साधी ठेच लागली तर इतके घाबरता का ?”

ते ऐकून बापू म्हणाले, ''अगं, या देहावर आपली नाही पण लोकांची मालकी आहे. माझ्या बेदकारीमुळे अंगठ्यात पाणी गेले व तो पिकून पुढे आठ-दहा दिवस काम करणे अशक्य झाले, तर लोकांचे केवढे नुकसान होईल ? हा तर लोकांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाचा घातच म्हणावा लागेल.'' बा ना बापूंचे म्हणणे पटले.

## ५७. आज्ञा-पालन

अखिल भारत ग्रामोद्योग संघाची स्थापना केल्यावर संस्थेला एक व्यवस्थित रूप देण्याच्या दृष्टीने बापूजींनी स्वत: मगनवाडीत मुक्काम ठोकला. त्यावेळी तिथली सर्व कामे मगनवाडीत राहणाऱ्या लोकांनीच करण्याची पद्धत होती.

एकदा बापूजी आणि सी. कुमारप्पा यांच्या नशिबी स्वयंपाक घरातील भाडी साफ करण्याचे काम आले. बापू आणि कुमारप्पा त्या कामात मोठ्या हौसेने सहभागी झाले.

पण कुठूनतरी 'बा' च्या कानावर ही बातमी गेली. त्या स्वयंपाक घरात दाखल झाल्या आणि त्यांनी गांधीजींवर ठपका ठेवला. "ह्या कामाशिवाय तुम्हाला दुसरी कामं नाहीत वाटतं ? इतर कितीतरी अत्यावश्यक कामे आहेत, ती करा की ! ही कामं करणारी तर कुणीही मिळतील." बापू एकीकडे भांडी घासता घासता 'बा' चा हा मधुर ठपका ऐकत होते. 'बा' त्यामुळे अधिकच चिडल्या आणि त्यांच्या हातातले भांडे खेचून घेऊन घासायला लागल्या.

बापूजींच्या मातीने बरबटलेल्या हातात राहिली ती भांडी घासण्याची नारळाची धासणी ! हसत हसत ते कुमारप्पांना म्हणाले, 'तुम्ही खरोखर सुखी आहात बुवा. कारण तुमच्यावर राज्य करायला तुमची पत्नी नाही. पण मला तर माझ्या घरातही शांतता टिकविण्यासाठी 'बा' च्या आज्ञेचे पालन करावंच लागेल! त्यामुळे तुमच्या कामात मदतनीस म्हणून मी बा ची नियुक्ती केली तर कृपया मला क्षमा कराल.' असे सांगून हातपाय धुवून बापू आपल्या कुटीकडे गेले व बा आणि कुमारप्पांनी आपले भांडी घासण्याचे काम पुढे चालू ठेवले.

## ५८. आपण असलो तर फरक पडतो ना !

१९३२ साली हरिजन प्रश्नासंबंधी बापूजींनी येरवडा जेलमध्ये प्राणांतिक उपवास सुरू केला. बा त्यावेळी साबरमतीच्या तुरुंगात होत्या. आपण यावेळी बापूजींच्या सोबत नाही याची 'बा' च्या मनात खूपच खंत होती. आपल्या पतीचे सगळे जीवनच पणाला लागलेले बघून त्यांच्या हृदयात कशी कालवाकालव होत असेल ? त्यासंबंधी कळकळ व्यक्त करताना त्या एकदा तुरुंगातील भगिनींना म्हणाल्या, 'आपण भागवत वाचतो, रामायण वाचतो पण अशा पद्धतीच्या उपवासाबद्दल कधी वाचलं नाही. पण बापूजींची गोष्टच वेगळी. ते असंच काहीतरी जगावेगळं करीत असतात.'

'आता काय होईल देव जाणे ?' त्या भगिनी त्यांना सांगत 'बा, सरकार बापूजींना सर्व सोयी-सवलती देईल. तुम्ही का बरं चिंता करता ?' त्यावर कस्तूरबांचं उत्तर असे-"सरकार लाख देईल गं, पण बापूंनी त्या स्वीकारल्या पाहिजेत ना ! त्यांचा तर प्रत्येक बाबतीत असहकार असतो. खरं सांगते, मी असा मनुष्य पाहिला नाही !" पुराणातल्या अनेक कथा ऐकल्या पण असे तप आचरणारा कुणी पाहिला नाही !" पण थोडा वेळ थांबून त्या उच्चारत-"तसं काही अडत नाही म्हणा, तेथे महादेव आहे, वल्लभभाई आहेत, सरोजीनी देवी आहेत. पण आपण असलो तर थोडा फरक पडतो ना ?

# ५९. तुम्ही? आणि मला भीता?

साबरमती आश्रमात स्वयंपाक घराची जबाबदारी कस्तूरबांकडे होती. बापूजींना भेटायला रोज कितीतरी पाहुणे येत. कस्तूरबा त्या सर्वांचे आगत स्वागत उत्साहाने करीत.

त्यांच्या हाताखाली त्रावणकोरहून आलेला एक मुलगा होता. दुपारी सर्व आवरून बा नी रसोडा बंद केला व त्या थोडावेळ विश्राम करायला गेल्या. बापूजी त्याचीच वाट पाहत होते. कस्तूरबा आराम करायला गेल्याबरोबर बापूजींनी हलकेच त्या पोराला बोलावले व सांगितले, 'नीट ऐक, आता पुष्कळ पाहुणे येणार आहेत आणि त्या सर्वांच्या जेवणाची तयारी करायचीय. बा सकाळपासून काम करतेय, थकली असेल. तिला थोडा आराम करू दे. जागवू नकोस. हवं तर कुसूमला मदतीसाठी बोलाव. तू आणि कुसुम मिळून सारं काही करा. आधी चूल पेटवा. कणिक मळून तयार ठेवा व मग आवश्यकता पडली तर बा ना उठवा. नंतर तुम्ही दोघं सगळं सांभाळाल. बा ला राग येईल असं काही करू नका. सर्व वस्तू नंतर जेथल्या तेथे ठेवल्या की झालं. बा माझ्यावर रागावली नाही तर मी तुम्हाला शाबासकी देईन."

त्या मुलाने हळूच कुसुमबेनला बोलावून स्वयंपाकाची सर्व तयारी सुरू केली. कस्तुरबा जागू नयेत म्हणून ती दोघं सर्वतोपरी काळजी घेत होती. भाजी निवडून झाली. चूल पेटली. कणिक मळून झाली. पण एवढ्यात चुकून एक ताट अचानक कुसूमच्या हातून निसटलं. ताट पडल्याचा आवाज आला आणि बा ना वाटलं की स्वयंपाकघरात मांजर घुसलं. त्या उठून स्वयंपाकघरात आल्या तर तेथे स्वयंपाकाचा गदारोळ चाललेला ! चढ्या आवाजात बा नी विचारलं, ''ही कसली धमाल चाललीय इथं ? आं ? शेवटी त्या दोघांनी सर्व काही खरंखरं बा ला सांगून टाकलं "अरे, पण तुम्ही लोकांनी मला का नाही उठवलं ? माझ्याकडून काय एवढंही काम झालं नसतं ? बा म्हणाल्या.

संध्याकाळी सगळे पाहुणे गेले व बा बापूजींच्या समोर कमरेवर हात ठेवून उभ्या राहिल्या. 'मला न जागवता तुम्ही त्या दोन्ही बालकांवर हे स्वयंपाकाचं काम सोपलंच का ? मी आळशीबंब आहे असं तुम्हाला वाटलं ?'

बापूजींच्या लक्षात आलं की, आता पळायला कुठेही जागा नाही. ते हसता हासता म्हणाले, "अगं, अशावेळी मला तुझी भिती वाटते. तुला माहित नसेल पण..." बा ना एकदम हसू फुटलं. त्या उद्गारल्या..." तुम्ही ? आणि मला भिणार? चला, चला ! !"

# ६०. जर बा ने खाल्ले नाही तर मी खाईन

कस्तुरबा फारच उत्तम स्वयंपाक करायच्या. बापूजींनी जेव्हा आपल्या जीवन व्यवहारात आस्वादव्रत दाखल केले तेव्हा कस्तूरबांची ही कला निकामी झाली. तरीही त्या कधी-कधी त्यांना आवडणारी वस्तू बनवायच्याच. चांगल्या वस्तू करून त्या इतरांना खायला घालायच्या आणि स्वत:ही खायचा त्यांना शौक होता. त्यांच्या शेवटच्या आजारात त्या आगाखान पॅलेसमध्ये होत्या. तेथल्या डॉ. गिल्डर यांना सकाळच्या नाश्त्यामध्ये काही ना काही नवी वस्तू द्यायला त्या मनूला सुचवायच्या. एके दिवशी त्यांनी मनूला पुरणपोळी बनविण्याचे सुचविले. म्हणाल्या, “आज तर मी सुद्धा पुरणपोळी खाईन, बापूंना विचार, ते खातील का म्हणून ?”

कस्तूरबांची प्रकृती बरी नव्हती आणि पुरणपोळीसारखी जड वस्तू त्यांनी खाल्ली तर हृदयरोगाचा हल्ला होण्याची शक्यता अधिक होती. मनू ज्या वेळेला गांधीजींना हे विचारायला गेली. तेव्हा ते गांधीजींच्या लक्षात होते. ते म्हणाले,''होय, जर बा खाणार नसेल तर मी अवश्य खाईन.” कस्तुरबांनी निर्णय करायला एक क्षणसुद्धा लावला नाही. त्या म्हणाल्या, ‘ठिक आहे, मी नाही खाणार.' नंतर आपल्याजवळ बसवून कस्तूबांनी त्यांना व इतरांनाही पुरणपोळी वाढली. पण स्वत: त्यातला एक कणसुद्धा घेतला नाही !

## रावजीभाई पटेल

## ६१. 'गीते' चा गूढार्थ

बापूजींच्या सूचनेप्रमाणे मी आश्रमात गेलो. तेथे त्यावेळी राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांसाठी घरे बांधली जात होती. 'हृदय-कुंज' या घराचे कामही बाकी होते. थोड्या दिवसांनी बापूजीही तेथे पोहचले. मी दिवसा घरांवर देखरेख करीत असे, त्यांची मापे घेई आणि रात्री सर्व वस्तूंचा हिशोब ठेवी. आमच्या आश्रमाजवळ पारध्यांची वस्ती होती. म्हणून आम्हाला सतत भीती वाटे. आश्रमात वारंवार चोऱ्याही होत. म्हणून रात्री गस्त घालण्याचे ठरले. रोज १२ ते ३ वाजेपर्यंत मी आणि महादेवभाई यांच्याकडे ते काम असे.

अशात एकदा भरूचहून एक गृहस्थ आले. ते साहित्य रसिक होते. कविता करीत. त्यांना आश्रमात राहायचे होते. बापूजींसोबत त्यांची चर्चा झाली. “सांगा, काय काम करू शकाल?” बापूंनी विचारले. “कोणतेही” ते म्हणाले. बापूजींनी मला बोलावले व सांगितले की, “या गृहस्थाची बांधकामासाठी मदत घ्या.” ते माझ्यासोबत आले. मी त्यांना आलेल्या विटा मोजून रचून ठेवण्याचे व संध्याकाळी त्याचा हिशोब ठेवण्याचे काम सांगितले. दोन-चार दिवस त्यानी ते केले पण त्यांचे मन रमेना. त्यांना वाटे “मला ही अशी कामे देतात ? त्याचा काय उपयोग ? मी पुस्तके लिहू शकतो. कविता करू शकतो. गेले चार दिवस झाले. फुरसदच नाही. आणखी काही दिवस असेच गेले तर मी जड होऊन जाईल.” त्यांनी मला हे सांगितले. मी म्हटले “तुम्ही बापूजींना हे सांगा. ते याचे समाधानकारक उत्तर देतील.” ते बापूजींना भेटले म्हणाले, “मी आलो तेव्हापासून त्या विटा व चुन्यामध्येच अडकलोय. दुसरे काही करायला वेळच मिळत नाही.” बापूजी म्हणाले, “अरे व्वा, हे तर फारच छान मला आवडले.” पण बापूजी, “वाचायला किंवा विचार करायला मुळीच वेळ वाटेल तेव्हा वेळ मिळेलच. सध्या तुमच्यावर सोपवलेल्या कामात मग्न राहा आणि वाचण्याचा वगैरे मोह सोडा. इतके जरी येथे शिकलात तरी पुरेसे आहे.”

आश्रमात राहण्यासाठी आलेले एक साहित्यिक रसिक गृहस्थ बापूजींना म्हणाले, “बापूजी मी येथे आलो तोच मुळी तुमच्याकडून गीतेचा गूढार्थ समजून घेण्यासाठी. त्यानंतर मी 'गीते' वर काही विशेष लिहू शकेन.'' आश्रमात सुरू असलेल्या घरबांधणी कामावर लक्ष

ठेवण्याचे काम त्यांना देण्यात आले होते. त्यांचे म्हणणे ऐकून बापूजी मनापासून हसले म्हणाले, “तुम्हाला गीतेचा गूढार्थ समजून हवा. तुम्ही जे काम करता आहात त्यात एकाग्र झालात तर हा अर्थ  सहज लक्षात येईल. 'गीते' चा गूढार्थ निष्काम कर्मयोगात आहे. फळाची कुठलीही अपेक्षा न करता आपल्या अंगीकृत कार्यात एकाग्र होणे, कर्म करणे म्हणजेच 'गीते' चा गूढार्थ. तुम्ही तसे वर्तन करताही आहात.

या कामात कुठलाही लाभ नाही, तृष्णा नाही, स्वार्थ नाही. हे काम तुम्ही योगस्थ होऊन करा म्हणजे सगळ्या गीतेचा अर्थ कळला. यापेक्षा वेगळे आणखी काय हवे ? जर आपल्या रोजच्या दिनचर्येतच गीतेचा उपदेश आचरला जात असेल तर इतर भाष्य वाचणे व त्यावरून अन्य वेगळे भाष्य लिहिणे याचा मोह कशापायी ?”

ते गृहस्थ हे प्रवचन ऐकून स्तब्धच झाले. थोड्या वेळाने ते म्हणाले, “मला येथे जडत्व येत आहे वाटते. मी येथे वाचण्यासाठी, विचार करण्यासाठी, प्रेरणा घ्यायला आलो होतो. पण मला असे वाटते की मी महिनो न् महिने येथे असाच राहिलो तर मला काहीच मिळणार नाही.”

त्यांना समजून सांगत गांधीजी, म्हणाले, “मित्रा, येथले कामच असे आहे.

तुम्ही जे काम हाती घ्याल त्यातून प्रेरणा मिळवता यायला हवी. मी सुद्धा “गीते चा गूढार्थ याच मार्गाने शिकलो आणि दुसऱ्यांनासुद्धा हाच मार्ग अनुसरायला सांगतो.”

ते गृहस्थ काही दिवस तेथे राहिले व निराश होऊन परत गेले.

# ६२. सगळ्यांचे बापूजी

एके दिवशीची आठवण दाट काळोख होता. प्रार्थनेनंतर ‘रामायण’ पाठा नंतर गप्पा करताना साडेआठ वाजून गेले. कार्यक्रम पूर्ण झाल्यावर देवदास बाहेर पडले. दरवाज्यातून बाहेर पडताच एका सापाचा मोठा फुत्कार ऐकू आला. ते लगेच मागे वळले व मला म्हणाले 'बाहेर काही तरी आहे. जरा बत्ती घेऊन या' मी आणि मगनलाल गांधी एक लॅम्प घेऊन निघालो. अंधारात बारकाईने पाहिल्यावर सापाची फरपट आढळली. तपास केल्यानंतर घराजवळ एक पाण्याची टाकी होती. त्याच्यामागे एक मोठा साप दडलेला दिसला. साप पकडण्यासाठी आम्ही रेशमाच्या दोरीचा फास असलेली काठी वापरत होतो. तो फास टाकून साप पकडला व त्याला बाहेर खेचून काढले. तो सारखा फणा उगारून झडप घालायचा. आम्ही दोघांनी काठीने त्याला दडपून ठेवले होते. तरी आमच्या हातात हिसके बसत होते. तेवढ्यात बापूजी तेथे आले. त्यांनी साप पाहिला. म्हणाले, 'अरे हे तर फार सुंदर जनावर आहे. तो रेशमाचा फास फार कसू नका. त्याला त्रास होईल.’ नंतर आम्हाला म्हणाले, ‘त्याला खाली ठेवा’ आमच्या मनात आले. त्याला लवकर सोडून देण्याऐवजी बापू खाली  ठेवायला का सांगत आहेत ? पण आम्ही त्याला खाली ठेवला. बापूजी म्हणाले, 'ती दोरी थोडी सैल करा. आणि त्या गळ्याला फास लागणार नाही असे पहा.’

आम्ही दोरी खूपच सैल केली. इतकी की, सापाला पळून जायचे असेल तर तो सहज पळून जाईल. पण नंतर बापूजींनी काय केले असेल ? ते खाली वाकले आणि त्या आठ फूट लांब सापाच्या मस्तकावरून हळूवार हात फिरवता फिरवता म्हणाले, 'किती सुंदर प्राणी आहे !’ त्यांच्या मनात त्या विषारी प्राण्याविषयी नेमके कुठले भाव असतील ? एखाद्या लहान बाळाच्या मस्तकावर प्रेमाने हात फिरवावा तसा त्या सापाच्या मस्तकावर त्यांचा प्रेमळ हात फिरत होता. एकदा नव्हे तीनदा ! आधी न आवरलं जाणारं ते जनावर त्या प्रेमळं स्पर्शाने जणू लटू झालं. दंश करण्याचा आपला स्वभाव ते विसरले. त्याचा क्रोधही उतरला. त्या स्पर्शाने जादूने जणू न हलता-डुलता तो जमिनीवर पडून राहिला. थोड्या वेळानंतर बापू उठले. म्हणाले, ‘तुम्ही दोघेही त्याला अगदी अलगदपणे उचला व दूर सोडून या’ ते तुफानी जनावर त्या अद्‌भुत स्पर्शपाशातून जणू मोकळे होऊ इच्छित नव्हते. आम्ही त्याला उचलून झऱ्याजवळ सोडले. तो शांतपणे निघून गेला.

# हरिप्रसाद देसाई

## ६३. नवी पेढी वसवायची आहे.

कोचरबच्या श्री जीवनभाईंच्या बंगल्यात सत्याग्रह आश्रमाची छोट्या प्रमाणात स्थापना झाली. मी रोज संध्याकाळी फिरायला जायचो. आता सत्याग्रह आश्रम नित्य भेट देण्याचे माझे प्रिय स्थान झाले. गांधीजींसोबत त्यावेळी अनेक विषयांवर दीर्घ चर्चा चाले. आरोग्य, भोजन, धर्म, राज्य, साहित्य, वैद्यक, समाज सुधारणा, शेती, सेवा इत्यादी विषयांवर सविस्तर बोलायला त्यांना उसंत होती. हे अजून 'महात्मा' झाले नव्हते आणि आपण या देशात नेमक्या कुठल्या स्थानी आहोत हे जाणून घ्यायला उत्सुक होते. एक वर्षांपर्यंत या देशाचे अवलोकन करण्याचा सल्ला गोखलेंनी त्यांना दिला होता आणि तोपर्यंत एकही जाहीर भाषण न करण्याची शपथ होती. ज्या दिवशी गोखलेंची अट पूर्ण झाली त्या दिवशी मी त्यांच्याजवळ होतो. मी विचारले, “आपण देशात काय पाहिलं ते कृपया सांगाल ?''

ते किंचित निराशेने म्हणाले, “सगळीकडे नाटक चाललंय. देशासाठी मरायला कुणीही तयार नाही.'' मला मोठा धक्का बसला. पण मी विचारलं “आपण काय म्हणता ? लोकमान्य, मालवीयजी बंगाली नेते मंडळी या सर्वांना आपण भेटला आहात. तरी असं म्हणता ?”

गांधीजी - “मी फार दिलगीर आहे. मोठ्या लोकांविषयी बोलताना मला दु:ख होते. पण मी फार विचार करून बोलतोय.

मी म्हणालो - “पण ते बॉम्ब फेकणारे क्रांतिकारक ? तेही मरायला तयार नाहीत ?

“गांधीजी- 'ते अपवाद आहेत. ही गोष्ट खरी की त्यांना मृत्युशी भीती वाटत नाही. पण मला त्यांचा मार्ग मान्य नाही.'' आणि नंतर शांतीच्या मार्गाने, कुणालाही मारल्याशिवाय, रक्त वाहवल्याशिवाय असलेल्या आपल्या अहिंसा-वादाची चर्चा त्यांनी केली आणि सांगितले, “देशाने माझा मार्ग स्वीकारला तर त्या मार्गाने स्वराज्य मिळेल असे मला निश्चित वाटते. दक्षिण आफ्रिकेत जे झाले ते इथेही होईल. पण मी तेथल्या संचितावर जगू इच्छित नाही. मला नवे संचित, नवे धन गोळा करावे लागेल व नवी पेढी वसवावी लागेल.”

## गुणवंत शहा

## ६४. जटायू जिवंत झाला !

रामायणातला जटायू हा मला सर्वांत जास्त प्रिय आहे. अगदी रामापेक्षाही आज आपल्याला ज्या समस्या भेडसावत आहेत त्यांची उकल फक्त जटायूकडे आहे. हा जटायू कोण होता ?

जटायूसाठी मी शब्द वापरला आहे. सीतेच्या अपहारणाच्यावेळी जटायू जेव्हा स्वतःचे बलिदान द्यायला तयार झाला तेव्हा गिद्ध समाजात जी व्यवहारी व अनुभवी माणसं होती त्यांनी सांगितले असेल- “जटायू, ही राम आणि रावणाची लढाई आहे. तू का मध्ये पडतोस? ते दोघेही फार बलशाली आहेत. त्यात तुझा ठाव-ठिकाणा लागणार नाही. कुठे रावण, कुठे तू ? जरा विचार कर.”

जटायूने त्या वृद्धांना उत्तर दिले- “मी जिवंत असताना रावण सीतेचं अपहरण करू शकणार नाही. माझ्या जीवात जीव असेपर्यंत तर नाहीच.” गांधीजी गेल्यानंतर या समाजाची जटायूवृत्ती समाप्त झाली. आता आपल्याला सतत हे ऐकायला मिळते की 'आपण त्यात काय करू शकणार आहोत ?'

गांधीजी चंपारणला गेले. चंपारणमध्ये हे सांगू शकत होते की, “आपण काय करू शकणार आहोत ? “बारडोलीला गेले तेव्हाही असे सांगू शकत होते. शेतकऱ्यांच्या महसूलाचा प्रश्न होता, “आपण काय करू शकतो ?''असे सांगू शकत होते. आणि तसे बोलता बोलताच एखाद्या दिवशी त्यांची जीवनयात्रा संपली असती. इंग्रजांच्या राज्यातही असे सांगणारे खूप होते की “आपण त्यांची बरोबरी करू शकणार नाही'' पण याच देशात धुळीतून धुरंधर उभे करण्याचे काम गांधीजींनी केले. हा समाज सर्वथा निर्वीर्य होता. पण गांधीजींनी त्यात जटायूचा आत्मा ओतला. त्याला पुन्हा जिवंत केले.

# महेंद्र मेघाणी

## ६५. विस्कटलेल्या मैफलीचे पतंग

महावीर त्यागींच्या दोन छोट्या-छोट्या पुस्तिकांचे गुजराती अनुवाद (पुनर्मुद्रण) नुकतेच बाहेर पडले. "स्वराज्य संघर्षाचे ते दिवस (चौथी आवृत्ती) व नगारखान्यात पिपाणी/ तुतारीचा स्वर' (तिसरी आवृत्ती). १९९३ साली त्या मूळ हिंदीत छापल्या गेल्या होत्या. दोन्ही पुस्तिकांमध्ये लेखकाची संस्मरणे आहेत. एकीची १३२ पाने आहेत व दुसरीची १५२. त्यातले कमी पानाचे पुस्तक (स्वराज्य संघर्षाचे ते दिवस) मी प्रथमत: उघडले. त्यातली १४ प्रकरणे शेवटून वाचायला सुरूवात केली. वाचता वाचता अनेकदा डोळे ओले झाले व हास्याच्या उकळ्यासुद्धा फुटल्या. ज्या वाचकांना महावीर त्यागी माहित नसतील त्यांच्यासाठी 'स्वराज्य संघर्षाचे ते दिवस' मधला काही भाग सादर करीत आहे. "कुणा अलौकिक रागिणीच्या मधुर सुरांबरोबर मंत्रमुग्ध होऊन नाचणारे आम्ही मतवाले, तीस वर्षे निरंतर त्या महानृत्याचा ताल आपल्या हृदयाच्या ठोक्याशी जुळवून नातच होतो. जगातल्या सर्व शक्तींचा अधिक्षेप करीत त्या संगीतात मस्त होऊन आम्ही जगलो. पण आता पहिल्यासारखी मस्ती उरली नाही. तशी धूनही नाही. दीपशिखा विझल्यावर पतंगाची मैफल विस्कटून जाते, तशीच आमचीही मैफील विस्कटली. रागाविना स्वरासारखी बापूविना काँग्रेस झाली. गेल्या चाळीस वर्षात आम्ही काय काय केले ते सुद्धा धड आठवत नाही. जे काही केले असेल ते एका नशेच्या मस्तीत केले असेल. त्यात अडचणी पुष्कळ होत्या पण आम्ही हसत-खेळत कामे करीत राहिलो.

आता स्वराज्यामुळे आमचे बरेच काँग्रेसी रोजगार शिवाय व कुठलाही ठावठिकाणा नसलेले झाले आहेत. ज्या मालकाने आम्हाला पाळले होते तो तर दिवंगत झाला. त्याने टाळी वाजवली की आम्ही कान उंच करायचो. शिटी वाजवली की उड्या मारायचो, पळायचो. त्यांच्या मुखावरचे हास्य बघून लट्टू व्हायचो. आता आमच्या गळ्यातला पट्टा निघाला आहे आणि आम्ही अनाथासारखे शेपटी हलवत इकडे तिकडे फिरत असतो. आता कुणी टाळी वाजवत नाही की शिटी वाजवत नाही. जेव्हा इंग्रज होते तेव्हा मला रोज कुठलं ना कुठलं काम मिळायचं. काहीच जमलं नाही तर आम्ही प्रभातफेरी काढायचो. जिथे कुठे आठ-दहा माणसं एकत्र दिसली, तेथे

वर्तमानपत्रातल्या  बातम्या सांगायचो. लोक आम्हाला दुरून पाहून हाका मारायचे. जवळ गेलो की एक प्रश्न हटकून विचारायचे. "आजकाल महात्मा गांधी काय करताहेत ? तुम्हाला तर ते चांगले ओळखत असतील ना ?" मोठ्या उत्साहाने मी त्यांना गांधीजींच्या गोष्टी सांगायचो. पण आता सगळ्या गोष्टी एखाद्या स्वप्नासारख्या झाल्यात, इंग्रज गेल्यानंतर त्यांच्या बाबर्ची वगैरेंच्या नोकऱ्या गेल्या. तशा अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांना पण काही काम उरले नाही !

अगदी आठवणीने व स्मरणपूर्वक मी प्रत्येक नेत्याचा दरवाजा ठोठावला. कुणी मदत केली तर मलाही काम मिळेल. पण नेत्यांकडे पद, पैसा, परमिट, लायसन्स, शिष्यवृत्त्या वगैरे खूप होत्या, पण काम नव्हते !

## ६६. गांधी हृदयातल्या तीन मूर्ती

गांधीजींसारख्या कठोर व्रतधारीने लिहिले-"नुसती व्रते पाळून पार उतरता येत नाही. सतत कीर्तन चालत राहिले तर व्रतांची सार्थकता आहे. चांगली जीवन-चरित्रे वाचली तर काही एक बळ मिळते.'' या पुरूषाच्या स्वत:च्या हृदयात कशा स्त्री-पुरुषांच्या प्रतिमा होत्या याचा शोध 'अक्षरदेह' शंबर खंडातून कुणी घेतला तर फार मोठ्या वाचक वर्गाला त्याचा लाभ होईल. पण सध्या तर 'आत्मकथे'तल्या काही प्रतिमांवर नजर टाकू.

बाळाला जगाचा पहिला परिचय आईमुळे होतो. त्यांच्या आई पुतळीबाईचे चित्र गांधीजींनीच दोन वाक्यात रेखाटले आहे. 'आई साध्वी स्त्री होती. ती फार भाविक होती. अगदी कठिणातले कठीण व्रत ती आचरत असे व आजारी पडली तरी ते सोडत नसे' करमचंद गांधीविषयी ते लिहितात-'पिता कुटुंबप्रेमी, सत्यप्रिय, शूर, उदार पण क्रोधी होते. काही विषयांची त्यांना आसक्तीही होती. जे काही त्यांनी मिळविले ते केवळ अनुभवाच्या बळावर. तरी त्यांचे व्यवहारज्ञान परकोटीचे होते. अगदी सूक्ष्म प्रश्नांची उकलसुद्धा ते सहज करीत व हजारो लोकांकडून काम करून घेण्याची हातोटी त्यांना ज्ञात होती.'

बाळ मोहनवर प्रभाव टाकणारी तिसरी व्यक्ती होती रंभाबाई. त्यांची दाई. मोहन भूतप्रेतांना फार भ्यायचा. त्याच्यावर एकमात्र उपया 'रामनाम' आहे असे रंभाने त्याला सुचवले. मोहनला रामनामापेक्षाही रंभेवर जास्त श्रद्धा होती. लहानपणी मनात पडलेले रामनामाचे ते बीज जळून गेले नाही. जीवनभर एक अमोघ शक्ती म्हणून गांधीजींनी त्याचा उपयोग केला. कारण ते रंभाबाईने लावलेले रोपटे होते.

## केशुभाई भावसार

## ६७. समन्वयी गांधीजी

१९४१ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीची एक बैठक झाली. मी त्यावेळी जवळच्या सेवाग्राममध्ये खादी विद्यालयात शिकत होतो. त्यामुळे मला बैठकीचे कामकाज जवळून पाहता आले. काँग्रेसचे प्रमुख अब्दुल कलाम आझाद मंचावर आडवे पडून सिगारटेचे झुरके घेत होते. जवळ बसलेले गांधीजी एकचित्तपणे चरखा चालवत होते. ते दृश्य पाहून मला मोठा धक्का बसला. अशा सभेत आडवे पडून सिगारेटचे झुरके घेणे म्हणजे जनतेचा अपमान करणे होय असे मला वाटते. गांधीजी त्यावेळी लोकांना साधे, संयमी पण परिश्रमी जीवन, सत्य आणि अहिंसेबाबत जगण्याची दीक्षा देत होते. माझ्यासारख्या अनेकांना आपण गांधीजींचे सैनिक आहोत याचा अभिमान होता. ते दृश्य बघून माझे मन विदीर्ण झाले, पण त्यावेळी मी गप्प बसलो.

१९४२ च्या चळवळीत मी तुरुंगात गेलो. तेथे मोलाना आझादांचे ‘कुराण' वरचे पुस्तक वाचण्याचा योग आला. त्या व्यक्तिची विद्वत्ता व उदारतेपुढे मी अक्षरश: नतमस्तक झालो. मात्र माझ्या मनात हेही आले की, इतक्या महान प्रतिभाशाली असलेल्या व्यक्ती जर निर्व्यसनी व साधे जीवन जगू शकल्या तर किती बरे होईल !

दुसऱ्या बाजूला निर्व्यसनी व श्रम करणाऱ्या लोकांना पाहतो तेव्हा माझ्या मनात असेही येते की, यातल्या किती जणांमध्ये मौलाना आझादांसारखी निभर्यता, देशासाठी सर्वस्व देण्याची वृत्ती व समानतेची भावना असेल ? देशासाठी काहीही सहन करण्याची तयारी नसलेले व ऱ्हस्वदृष्टी असलेले लोक साधे आणि संयमी असले तरी त्यामुळे गांधीजींचे स्वप्न सिद्ध कसे होणार?

आज विचार करताना हे जाणवते की, अशा दोन्ही प्रकारच्या लोकांचा समन्वय व्हावा यासाठी तर गांधीजींचा आटापिटा होता. अब्दुल कलाम आझादांचे व्यसनही त्यांनी पचवले व आमच्यासारख्या संयमी जीवन जगणाऱ्या पण एकमेकांना अजिबात सहन न करणाऱ्या घमेंडखोर कार्यकर्त्यांनाही पचवले. अजूनही आपल्याला या दोन्ही तऱ्हेच्या लोकांचा समन्वय

करणे जमले नाही. साधे, स्वावलंबी व निर्व्यसनी जीवन हे स्वागतार्ह आहेच पण त्या सोबतच निर्भयता, औदार्य आणि कोट्यावधी दु:खी व अज्ञानी लोकांसाठी जीवनाचा होम करण्याची भावना हे एक समयावच्छेदे करून आपल्या आयुष्यात उतरली तर आपण खरे स्वातंत्र्य मिळवू शकू.

# मनू गांधी

## ६८. बोलण्यापेक्षा करणे चांगले

बापूजींचे स्वच्छतेच्या बाबतीत बारीक लक्ष असायचे. वस्तू अस्वच्छ असली तर समोरच्या माणसाला टोकण्यापेक्षा स्वत: ती साफ करणे, त्यातून स्वच्छतेचे समोरच्याला धडे देणे, त्यांना आवडे.

नौखालीचे रस्ते पायवाटेपेक्षासुद्धा लहान होते. काही काही रस्ते तर इतके अरुंद असत की बापूंना पुढे व मला मागे चालावे लागे. माझा आधार नसला की त्यांना काठीचा आधार घ्यावा लागे.

वाटेल त्या ठिकाणी पडलेली घाण बापूंना फारच अस्वस्थ करी. त्यांना उघड्या पायांनी त्या घाणेरड्या रस्त्याने जावे लागे. आजूबाजूला मल, थुंकी, कचरा आदी पडलेला असे. त्यांना झाडाची पाने घेऊन तो साफ करताना पाहून मी स्तंभितच झाले.

रागाने मी त्यांना म्हणाले, ‘बापूजी, तुम्ही मला का लाजवता, मी इथे मागेच होते ना? मग मला सांगण्याऐवजी तुम्ही का ती साफ करता ? हसता हसता बापूजी म्हणाले - अगं, अशी कामं करण्यात मला किती आनंद वाटतो याची तुला कल्पना करता येणार नाही ! बोलण्यापेक्षा करून टाकणे यात मला कमी कष्ट होतात !

मी म्हटलं, 'हो, पण गावातले लोक पहात आहेत. त्याचं काय ?

बापू म्हणाले, ‘तू बघ, उद्यापासून मला असे घाणीने भरलेले रस्ते साफ करण्याची जरूरच भासणार नाही. कारण लोकांना हे कळले की असे काम करणे हे हलकेपणाचे नाही आहे.'

मी म्हणाले, 'समजा, उद्या ही घाण साफ झाली पण परवा पुन्हा रस्ता जसा होता तसाच झाला तर तुम्ही काय कराल ? लगेच ते उत्तरले, 'तर मी तुला बघायला पाठविन आणि रस्ता तसाच घाणीने भरलेला असला तर स्वत: साफ करायला येईन.’

आणि खरेच तसे घडले. दिवसा मी बघायला गेले तर रस्ता घाणीने भरलेला होता. पण बापूंना सांगायला न जाता मी तो स्वतःच झाडून स्वच्छ केला. नंतर त्यांना म्हणाले, 'मी रस्ता स्वच्छ केला. माझ्या सोबत गावातले लोकही होते. आणि त्यांनी मला वचन दिले की, उद्या तुम्ही यायची गरज नाही, आम्हीच रस्ता स्वच्छ ठेवू'.

बापूजी म्हणाले, 'तू माझं पुण्य हिरावून घेतलसं. तो रस्ता मलाच साफ करायला हवा होता. पण आता दोन कामं झाली. एक तर स्वच्छता राखली जाईल व दुसरे जर लोकांनी दिलेले वचन पाळले तर ते सत्याने वागायला शिकतील आणि तो रस्ता शेवटपर्यंत स्वच्छ राहील.

# ६९. दोन डब्यांचा परिग्रह

नौखाली आणि बिहारच्या यज्ञात उडी घेतल्यानंतर ३० मार्च १९४७ ला बापूजींना लॉर्ड माउंटबॅटनला भेटायला जायचे होते. व्हाईसरॉयने बापूजींना विमानाने यायला सांगितले. पण “ज्या वाहनात कोट्यवधी गरीब प्रवास करू शकत नाहीत त्यात मी कसा बसणार?' असे सांगून बापूंनी नकार दिला व ट्रेनमध्येही मी माझी सगळी कामं व्यवस्थिपणे करू शकतो, म्हणून मी आगगाडीनेच जाईन असा आपला निश्चय जाहीर केला. असह्य गर्मी होती. २४ तासांचा प्रवास होता. मला बोलावून सांगितलं, ''कमीत कमी सामान घे व अगदी लहानातला लहान डबा निवड. तोही तिसऱ्या वर्गाचा.'' मी सामान तर कमीत कमी घेतलं. पण प्रत्येक स्टेशनावर बापूंना बघायला व भेटायला येणाऱ्यांच्या गर्दीचा मला अनुभव होता. त्यामुळे मी तिसऱ्या वर्गाचे दोन साधे डबे रिझर्व्ह केले. एकात सामान ठेवले व दुसऱ्यामध्ये त्यांच्या उठण्या-बसण्याची व्यवस्था केली.

पाटण्याहून दिल्लीला जाणारी ट्रेने सकाळी ९ वाजता निघते. उन्हाळ्याच्या दिवसात बापूजी दुपारचे जेवण १० वाजताच घेत. मी दुसऱ्या डब्यात त्यांच्या भोजनाची तयारी करायला गेले. थोड्या वेळाने बापूजींच्या डब्यात आले. ते लिहिण्यात मग्न होते. मला विचारले 'कुठे होतीस ?' मी म्हटलं ‘येथेच होते. तुमच्या भोजनाची व्यवस्था पाहत होते.’ त्यांनी मला खिडकीतून बाहेर पहायला सांगितलं. मी बाहेर पाहिलं आणि थक्कच झाले. लोक दोन्ही बाजूंनी डब्याला लटकलेले होते ! मला थोडासा ठपका देत ते म्हणाले, 'ह्या दुसऱ्या डब्याबद्दल तू सांगितलं होतंस का ?'

मी म्हणाले, 'हो. मी येथे सर्वच कामं करणार. स्टोव्हवर दूध गरम करणार, भांडी घासणार इत्यादी. तुम्हाला त्यामुळे त्रास होईल असे पाहिल्यार मी रेल्वेला दुसऱ्या डब्याविषयी सांगितलं . ‘वा, कसला पंगू बचाव आहे ! ह्याचं नाव आहे आंधळे प्रेम. मला त्रास होऊ नये म्हणून विमान किंवा स्पेशल ट्रेनबद्दल विचारण्यात आले होते. एका स्पेशल ट्रेनमुळे इतर कितीतरी गाड्या थांबतात व कितीतरी हजार रूपयांचा खर्च होतो. मला कसे परवडणार आहे ? मी हे जाणतो की, तू माझ्या प्रेमापोटी हे सर्व केलंस. पण मला तुला उच्च स्थानी न्यावयाचे आहे. खालच्या स्थानी ढकलायचं नाही. हे तू समजनू घ्यावंस आणि आता मी तुला सांगत असताना तुझ्या डोळ्यातून जे अश्रू ओघळत आहेत, तेही ओघळायला नको आहेत. आता याचे प्रायश्चित असे की, तू येथील

सर्व सामान आवर व जवळच्या डब्यात ठेव. दुसरे, पुढच्या स्टेशनवर स्टेशनमास्तरला माझ्याकडे पाठव.' मी तर थरथर कापत होते. सामान तर हलवलं पण मला बापूजींची चिंता होती. त्यांचे कसे होईल? ट्रेनमध्येच त्यांचे लिहिणे, वाचणे, सूत कातणे, काळ्या मातीचे लिंपण, मला शिकवणे वगैरे सर्व काही चाले ! जे घरात बसल्या बसल्या ते तसेच प्रवासातही !

पुढचं स्टेशन आले. स्टेशन मास्तरला बोलावले. बापूजींनी त्यांना माझा पराक्रम सांगितला. म्हणाले, 'ही मुलगी माझी पुतणी आहे. पण बिचारी खूप भोळी व चांगली आहे. पण अजून मला पुरतेपणी समजू शकली नाही. म्हणूनच तिने दोन डबे रिझर्व्ह केले. त्यात तिचा काही दोष नाही. असला तर दोष माझाच आहे. माझेच शिकवणं कमी पडले. आता आम्हा दोघांनाही प्रायश्चित करणे आलेच. म्हणून हा डबा रिकामा केलाय. तुम्ही त्याचा उपयोग बाहेर जे पॅसेंजर लटकलेले आहेत त्यांच्यासाठी करू शकता. म्हणजे मला थोडे कमी दु:ख होईल’. स्टेशन मास्तरने बऱ्याच अर्ज-विनंत्या केल्या. पण बापूजी ऐकतील तेव्हा नं ! शेवटी तो येथपर्यंत म्हणाला की, 'हवं तर त्या लोकांसाठी मी दुसरा डबा जोडतो. पण हा तुमच्यासाठी राहू द्या.’ बापूजी म्हणाले, 'दुसरा डबाही जोडा पण याही डब्याचा उपयोग करा. जे आपल्याला नको असेल पण अधिक मिळते म्हणून ठेवून घेणे ही सुद्धा एक हिंसा आहे. मिळणाऱ्या सवलतीचा दुरूपयोग करून तुम्ही या मुलीची सवय बिघडवू इच्छिता का ?’

बिचाऱ्या स्टेशन मास्तरला पुढे काय बोलावं ते सुचलं नाही. शेवटी त्याला बापूजींचे म्हणणे एकावेच लागले.

## आदम घोडावाला

## ७० आपण प्रासंगिक आहोत का?

आजच्या युगात गांधीजी प्रासंगिक आहेत का ? हा प्रश्न वारंवार चर्चिला जातो. गांधीजी प्रासंगिक आहेत की नाहीत, हा मूळ प्रश्न नाहीये. मूळ प्रश्न आहे आपण प्रासंगिक आहोत का ?

सध्या एकमात्र असलेल्या 'सुपर पॉवर' च्या वैश्विकीकरण व मुक्त बाजारच्या नीतीमुळे आपल्या गरीब देश बांधवांचे ब गरिबांचे मरण ओढवले आहे असे वाटत असेल तर त्या 'सुपर पॉवर' समोर निधड्या छातीने उभे राहण्याची त्या महात्म्यासारखी नैतिक हिंमत कुणाकडे आहे? आपण त्या महाशक्तीला हे सांगू शकतो का की, आम्हा गरिबांना आमची साधी भाजी भाकरी मिळू द्या. तुमचे पिइझा, बर्गर, कोकाकोला आणि पेप्सी आमच्या माथी  मारू नका, हिंमतवान माणसाच्या लेखी गांधीजी आजही प्रासंगिक आहेत.  डरपोक, भिरू माणसाच्या लेखी ते पूर्वीही प्रासंगिक नव्हते व आजही प्रासंगिक नाहीत.

## जगदीश चावडा

## ७१. आफताब

परीक्षितभाई कधीही रिकामे सापडत नसत. सण असो की रविवार, त्यांच्या लेखी सर्व सारखेच, हसता हसता ते म्हणायचे “सणासुदीला किंवा रविवारी आपण जेवतोच की नाही ? मग काम का बंद ठेवायचं?” सकाळी ५ वाजेपासून रात्री १० कधी कधी ११ वाजेपर्यंत ते सतत कामात गढलेले असत. गावातले कष्टकरी सतत त्यांच्या चारही बाजूला वेढून असत. ऑफिसात असोत की झोपण्याच्या जागी, प्रवासात असोत की गाडीत, भेटणाऱ्यांची रांग सतत लागलेलीच असायची' या, कसे आहात बंधू' असे म्हणत ते प्रत्येकाचे अगत्याने स्वागत करीत.

आश्रमात असत त्यावेळी हरिजन सेवक संघाच्या कार्यालयात ते सकाळी ७ पासून संध्याकाळी ५ पर्यंत सातही दिवस बसत. एकदा गोष्टीवरून गोष्टी निघत गेल्या. मी त्यांना विचारले ‘तुमच्याकडे होळीची रजा असते ?' रजेची यादी बघून मी म्हटले, ‘होळीची व धुळवडीचीही रजा असते?’ 'अरेच्या दोन दिवसांची रजा असते?' त्यांनी थोड्या आश्चर्यानेच विचारले. ऑफिसमधल्या सर्व कार्यकर्त्यांना ऐकू जाईल अशा आवाजात ते म्हणाले, ‘बापूजींनी कधीही सणासुदीची किंवा रविवारची सुटी घेतली नाही. ते येरवडा तुरुंगात होते तेव्हाही नेहमीप्रमाणे ते सकाळी लवकर उठत, प्रार्थना करीत, सूतकताई व वाचन-लेखन असेच, त्यांचा एक चौकीदार एडन निवासी सोमाली होता. त्याला इंग्रजीही येत नव्हते व हिंदीही. पण तो वेळ मिळे तेव्हा बापूंजवळ प्रार्थनेसाठी बसे, बापू सूत कातत, ते बघत राही.

त्या दिवसात बापूंना खूप सर्दी झाली होती. तरी त्यांचे रोजचे ठरलेले कार्यक्रम पहाटेपासून सुरू होत. सोमालीने ते पाहिले व तो बापूजबळ जाऊन त्याच्या भाषेत काही बोलू लागला. पण बापूजींना त्याची भाषा कळत नव्हती. शेवटी सोमालीने इशाऱ्याने त्यांना आराम करण्याविषयी सुचवले. बापूजींच्या ते लक्षात आले. त्यांनी डोक्यावर तळपणाऱ्या सूर्याकडे बोट दाखवले व म्हणाले- ‘आफताब ! आफताब !’ चतुर सोमाली बापूजींचा इशारा समजला. सूर्य जसा न थकता निरंतर काम करतो, कधी आराम करीत नाही, तसेच माणसाने निरंतर कार्यमग्न असावे.' प्रसंग सांगून संपला व परीक्षितभाई हसता-हसता आपल्या कामाला लागले.

# जुगतराम दवे

## ७२. आश्रम

अहमदाबाद साबरमती नदीच्या किनारी गांधीजींचा आश्रम आहे. आश्रमात गांधीजी, कस्तूरबा आणि अन्य अनेक बंधू-भगिनी, मुले मुली राहत. त्यात गुजराती, मराठी, पंजाबी, सिंधी, मद्रासी, नेपाळी तर होतेच पण हिंदुस्थानाबाहेरचे गोरे व चिनीसुद्धा होते.

ते सगळे खादी वापरत व नियमितपणे सूत कातत. सगळे मिळून पहाटे चार वाजता प्रार्थनेसाठी जमत व संध्याकाळीही एकत्र येत. तेथे ते श्लोक बोलत, भजन गात आणि रामधूनमध्ये रममाण होत. गीतेची पारायणेसुद्धा होत असत. प्रार्थनेनंतर गांधीजी प्रवचन करीत. आश्रमात मोठ्ठा रसोडा आश्रमवासी भगिनीच चालवत. त्या आळीपाळीने स्वयंपाक करीत. कोठरातले अन्न साफसूफ करीत. सगळा आश्रम एकाच रसोड्यात जेवण घेत असे. स्वयंपाकात मसाला, मिरची, हिंग, फोडणी वगैरे काहीही नसे. अगदी साधे व स्वच्छ भोजन असे. गांधीजी स्वत: वाढत असत. आश्रमातले हरिजन सर्वांसह राहत, सर्वांसोबत रसोड्यात काम करीत व जेवतही सर्वांसोबतच. आश्रमात कमाल स्वच्छता होती. आश्रमवासी स्वत: जातीने पायखान्याची सफाई करीत.

# ७३. डबा हेच घर !

## डबा हाच आश्रम ! !

बडोद्याचे गायकवाड स्वत:च्या ध्वजावर एक घोषणा लिहित- "जीन घर-जीन तख्त" मराठा सरदारांना याचा अभिमान वाटे की, आमच्या घोड्यावरची जीन कधीही उतरवली जात नाही. ती रात्रंदिवस कसलेलीच राहाते. तसेच गांधीजींचे घर, आश्रम आणि रेलगाडीच्या तिसऱ्या वर्गाचा डबा हे एकच होते. आपला संदेश देशाच्या एका भागापासून दुसऱ्या भागापर्यंत पोहोचवण्यासाठी ते सतत फिरत राहात. त्यांनी रेल्वे डब्यात अधिक वेळ घालवला की आश्रमात हे सांगणे अजिबात गैर नव्हते.

गाडीचा डबा हेच आपले घर समजून स्वत:चे सर्व कामकाज ते करीत. चरखा चालवत, सूत कातत, सकाळ व संध्याकाळच्या प्रार्थना करीत, पत्रव्यवहार चाले, मुलाखती होत. गांधीजी नेहमी तिसऱ्या वर्गातून प्रवास करीत. या वर्गातल्या प्रवाशांच्या हालअपेष्टांचा अनुभव घेताना त्यांना एकार्थाने बरे वाटले. ज्या वेळेला देश त्यांना 'महात्मा' म्हणून ओळखत नव्हता त्या वेळेला या हालअपेष्टा व धककाबुक्कीचा भरपूर अनुभव त्यांना आला. अनेकदा त्यांनी उभ्याने प्रवास केला व धक्के तर खूपच खाल्ले.

प्रथमत: तर देशाचे नेतेही प्रजेपासून थोडे अलिप्त राहात व कंगाल जनतेला भेटण्यास अनुत्सुक असत. मोठ्या अंमलदाराप्रमाणे तेही प्रथम वर्गानेच प्रवास करीत. एकदा गांधीजी कलकत्त्यात गोखलेच्या घरी राहिले होते. परतताना गोखले त्यांना स्टेशनवर सोडायला निघाले. गांधीजींनी फार विनयाने त्यांना सांगितले की, तुम्ही तसदी घेण्याचे कारण नाही. पण गोखलेंनी ऐकले नाही. ते म्हणाले, "इतरांसारखे तुम्ही प्रथम वर्गाने गेला असता तर मी तुम्हाला सोडायला आलो नसतो. पण तुम्ही तर तिसऱ्या वर्गाने प्रवास करणार आहात म्हणून तुम्हाला सोडायला मी येईनच." तिसऱ्या वर्गातून प्रवास करता करता गांधीजींना या देशातल्या दीनहीन प्रजेची पूरेपूर ओळख पटली. प्रजेचा स्वभाव तिच्यातला कमीपणा, तिच्या सवयी इत्यादींची नस न् नस त्यांच्या जेवढी ओळखीची होती, तेवढी अन्य कुणाही नेत्याची नव्हती. त्यामुळे लोकांची त्यांच्यावर अपार श्रद्धा होती.

# ७४. आनंदी सत्याग्रही

बारडोलीचे आणि गुजरातचे एक श्रेष्ठ सत्याग्रही हेते. स्वादलावासी मोरारजीभाई. ते खेड्यात राहात. ते खूप विनोदी होते. कुठल्याही प्रकारची आपत्ती असो. त्यातून नेमका मार्ग शोधून काढीत. सत्याग्रहाचा तुरुंगवास मोठा असायचा. पण मोरारजीभाई असले की तो सुखद व्हायचा. आमच्यासारख्या कित्येक साथीदारांचा तुरुंगवास त्यामुळे सहज पार पडायचा. आपापल्या तक्रारी घेऊन गावातले दोन्ही पक्ष त्यांच्याकडे यायचे. ते दोघांचेही खूप मनोरंजन करायचे व एकमेकांशी भेट घालून त्यांना परत पाठवायचे. संतती हवी म्हणून त्यांच्या वृद्ध पित्याने त्यांचे दुसरे लग्न लावून दिले. आमच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांचा विरोध त्यांनी हसण्यावारी उडवून लावला. जुन्या बायकोने नवीला आपल्या बहिणीप्रमाणे वागवले. त्यामुळे मोरारजीभाईंचा संसार सुखाने पार पाडला. एकदा गांधीजींबरोबर सहज गप्पागोष्टी चालल्या होत्या. महादेवभाईंनी मोरारजीभाईंच्या दोन बायकांची गोष्ट बापूंना सांगितली. बापूजींनी विचारले, “तुम्ही रामाला मानता की नाही?” मोरारजीभाई चटकन म्हणाले, “ बापूजी जर रामाला मानायचे तर रामाच्या बापाला का बरे मानू नये?” बापूजींची हसता हसता पुरेवाट झाली. मोरारजीभाईंच्या आनंदी स्वभावामुळे स्वराज्याचा संघर्ष एखाद्या खेळासारखा वाटायचा. स्वराज्य मिळाल्यानंतर काही वर्षात त्यांचा मृत्यू झाला. पण सर्वोदयाच्या रचनेत त्यांच्यासारख्या त्यागी लोकांची कमतरता सदैव भासत राहील.

# जोसेफ डोक

## ७५. कथानायक

१९०७ च्या डिसेंबरमध्ये अगदी शेवटच्या आठवड्यात मी गांधीजींना पाहिले. एशियन लोकांच्या त्या नेत्याला भेटण्याचा मी निश्चय केला. रिसिक अँड अँडरसन रस्त्याच्या कोपऱ्यावर असलेले त्यांचे ऑफिस इतर ऑफिसांसारखेच होते. तेवढ्यात एक लहानसी, चपळ पण सडसडीत मूर्ती माझ्या समक्ष येऊन उभी राहिली. तिच्या चामडीचा रंग श्यामला होता. डोळे ही काळे होते पण चेहऱ्यावर निर्मळ हास्य होते व सरळ निर्भिक दृष्टी समोरच्या माणसाला पाहता पाहता जिंकून घेत होती. त्यांचे वय ३८ च्या जवळपास असावे. डोक्यावर असलेल्या काही रुपेरी छटा त्यांच्यावर असलेल्या कामाचा बोजा किती आहे याची जणू चहाडी करीत होत्या. ते अत्यंत शुद्ध इंग्रजी बोलत होते आणि सगळ्या व्यक्तिमत्त्वावर असलेली संस्कारांची छाप स्पष्ट दिसत होती.

मला बसायला सांगून माझ्या मुलाखतीचा हेतू विचारला. मी खुलासा केला तेव्हा ते अगदी लक्षपूर्वक ऐकत होते. माझे म्हणणे झाल्यावर त्यांनी अगदी मुद्देसूदपणे पण ठाम शब्दात तेथल्या आशियाई लोकांच्या स्थितीविषयी मला सांगितले. इतकी साधी पण स्पष्ट मांडणी मी प्रथमच ऐकत होतो. त्यांनी अगदी लहान लहानशा गोष्टींचा सविस्तर खुलासा केला आणि अगदी शांतपणे पण धैर्यपूर्वक स्वत:चे म्हणणे मला पटवून दिले.

त्यांच्यात असलेली शांत पण सुदृढ मन:स्थिती, हृदयाची महानता आणि पारदर्शक प्रामणिकतेचे मला जे दर्शन घडले त्यामुळे त्या हिंदी नेत्याकडे मी एकदम आकर्षित झालो.

आम्ही ज्यावेळी वेगवेगळे झालो तेव्हा आमच्यात मैत्रीचा अतूट बंध निर्माण झाला होता.

# जिवतराम कृपलानी

## ७६. गांधीजी आधुनिक होते का?

सत्याला चिकटून राहणे आणि नीती-नियमांना सर्वोतोपरी मानणे हे जर आधुनिकतेचे लक्षण असेल तर गांधीजी आधुनिक होते.

दिलेले वचन पाळणे आणि स्वीकारलेले काम पूर्ण करणे हे जर आधुनिकतेचे लक्षण असेल तर ते आधुनिक होते. जर सहिष्णुता आणि समजदारी आधुनिक असेल तर गांधीजींना आधुनिक मानावे लागेल. आपल्यापेक्षा वेगळे मत धारण करणाऱ्या व आपल्या विरोधकांशीसुद्धा उत्तम वर्तन करणाऱ्याला जर आधुनिक म्हणता आले तर गांधीजी आधुनिक होते. जो पद, सत्ता आणि संपत्ती याचा विचार न करता सर्वांना समान सौजन्य दाखवतो तो आधुनिक असतो. जर दीनहीनांबरोबर तादाम्य साधणे हे आधुनिक असेल तर गांधीजी आधुनिक होते. जर गरीब, दरिद्री, दलित आणि दुर्बलांसाठी अविश्रांत काम करणे आधुनिक असेल तर गांधीजी आधुनिक होते. आणि सर्वांत मोठे हे की, एखाद्या श्रेष्ठ कार्यासाठी मृत्यू पत्करणे हे जर आधुनिकतेचे लक्षण असेल तर गांधीजी आधुनिक होते.

## मिर्झा इस्माईल

## ७७. संत, मुत्सद्दी, राष्ट्रविधायक

अनेकदा असे म्हटले जाते की, आपल्या समकालीनांपैकी अमुक माणसं अमर बनतील असं म्हणणे गैर आहे. कारण भविष्यातील जनता आपल्याला आवडेल त्या माणसाची कीर्ती अमर करण्याच्या मागे लागतात. पण महात्मा गांधीजींचे नाव अमर राहील ही ग्वाही भविष्यात खोटी ठरण्याची शक्यता जवळजवळ नाही. सध्या जिवंत असलेल्या हिंदी लोकांमध्ये ते सर्वश्रेष्ठ आहेत. ते भारताच्या भावजगताचे मूर्तिमंत अवतार आहेत आणि त्यांच्या वाणीतून भारतवर्षाविषयीचे प्रेम प्रगट होत असते. आपली सर्वव्यापी अहिंसा व उच्च आदर्शांनी युक्त असलेली जीवनशैली यामुळे त्यांनी सर्व देशवासियांची मने जिंकून घेतली. हिंदी प्रजेच्या मोठ्या भागावर त्यांचा असलेला असाधारण प्रभाव बघून हा कयास बांधता येतो की आजच्या ब्रिटिश साम्राज्यातले ते सर्वाधिक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आहे.

त्यांच्यापेक्षा मोठा अंतर्नादाला अनुसरणारा, धर्मपरायण आणि सिद्धांताच्या असिधारेवर चालणारा अन्य कुणी पुरूष हिंदुस्तानात नाही. आणि तरीही राजकारणात त्यांना पाठीमागे टाकेल असा कुणी मुत्सद्दी दिसत नाही. त्यांच्यात असलेले नीती बळ विलक्षण आहे. त्यांचे खासगी आयुष्य नितांत निष्कलंक आहे. मन, वचन, आणि कर्माची एकवाक्यता त्यांच्या ठायी आढळते. ते अत्यंत धर्मपरायण आहेत. त्यांना बघितल्यावर आपल्याला आपल्या साधू संतांची आठवण येते. पण दुसऱ्या बाजूला नवजागृत भारताला प्रेरणा देणारे, हिंदी लोकांमध्ये नवे प्राण भरणारे, त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारे आणि स्वतःच्या संस्कृतीविषयी गर्व धारण करणारे आहेत. ते महान मुत्सद्दी, असाधारण द्रष्टा आहेत. एका भारतीय राष्ट्राचा अभ्युदय होत आहे व गांधीजी त्या राष्ट्राचे विधायक आहेत, निर्माता आहेत.

# वल्लभभाई पटेल

## ७८. अंगणात वाहणारी गंगा

तुम्ही अहमदाबादच्या नागरिकांनी दिलेल्या मानपत्रात....मला गांधीजींचा पट्टशिष्य म्हटले आहे. ईश्वराकडे माझे हे मागणे आहे की, त्याने माझ्यात तशी योग्यता निर्माण करावी. पण मी हे जाणतो की, माझ्यात ती योग्यता नाही. ती मिळवण्यासाठी किती जन्म घ्यावे लागतील हे मलाही सांगता येणार नाही ! मी हेही सांगू इच्छितो की, प्रेमापोटी तुम्ही तुमच्या अनेक अतिशयोक्ती गोष्टी यात लिहिल्या आहेत. एक वेळ मी त्या गिळून टाकीन पण ही गोष्ट गिळणे मला शक्य नाही.

तुम्ही सर्वजण हे जाणता की, महाभारतात द्रोणाचार्यांचा एक भिल्ल शिष्य होता. प्रत्यक्षात त्याने द्रोणाचार्यांकडून एकही शब्द ग्रहण केला नव्हता पण त्यांचा मातीचा पुतळा करून तो रोज त्यांची पूजा करायचा आणि धनुर्विद्या शिकायचा. त्याने जेवढी विद्या मिळवली, द्रोणाचार्यांच्या दुसऱ्या कुठल्याही शिष्याने तेवढी मिळवली नाही. याचे कारण काय ? कारण त्याची गुरूवर भकती होती, श्रद्धा होती. त्याचे मन स्वच्छ होते. तुम्ही ज्याला माझा गुरू म्हणता तो तर नित्य माझ्याजवळच असतो. पण तरी त्यांचा पट्टशिष्यच काय, अनेक शिष्यांपैकी एक होण्याचीसुद्धा योग्यता माझ्यात नाही आणि त्या विषयी माझ्या मनात किंचितही शंका नाही. मात्र मला आशा आहे की, या देशात त्यांचे असे अनेक शिष्य असतील ज्यांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिलेही नसेल. पण त्यांनी त्यांच्या देहाची नव्हे तर मंत्राची उपासना केली असेल. या पवित्र भूमीत कुणीतरी असा एखादा लाल निघेलच. कित्येक लोक म्हणतात की, गांधीजी गेले तर काय होईल ? मी त्याविषयी निश्चित आहे. त्यांना जे काही करावयाचे होते ते त्यांनी केले. आता जे काही करावयाचे आहे ते आपण करावयाचे आहे.

# जॉन हेन्स होम्स

## ७९. एक नरोत्तम

आजपासून २० एक वर्षांपूर्वी मी अमेरिकन प्रजेला हे सांगितले होते की, गांधीजी हे जगातला सर्वोत्तम पुरुष आहेत. पश्चिमी देशात त्यावेळेला त्यांना फारसे ओळखत नव्हते.

गांधीजींना या युगात अग्रपद मिळाले ते प्रतिभा किंवा किर्तीमुळे नाही. ते कुठल्याही सैन्याचे सेनापती नाहीत किंवा मुलूख जिंकणारेही नाहीत. मोठ्या हुद्यावर बसून प्रजेवर अंमल गाजवणारे राजपुरूषही नाहीत. प्रभावशाली लोकनेता वाटावा असे चमकदार व्यक्तिमत्त्वही त्यांच्याकडे नाही. मात्र आत्मबलामुळेच अपूर्व व अद्वितीय प्रभाव आणि नेतृत्व त्यांना मिळाले. या आत्मबळाच्या जोरावर गांधीजींनी आपल्या देशबांधवांवर स्वदेशी संस्कार करून त्यांना जागृत केले. त्यांच्यात आत्मगौरव व स्वाभिमानी वृत्ती वाढवली. त्यांच्या मनाला व हृदयाला आत्मसंयमाचे वळण लावले, त्यांना स्वराज्य मिळवण्याइतके समर्थ व त्याचा उपभोग घेण्याइतके योग्य बनवले. गांधीजींनी त्यांना राजकीय स्वातंत्र्य दिले पण सोबत आत्म्याची विमुक्तीही दिली. याशिवाय त्यांनी अस्पृश्य वर्गाला दु:ख आणि दासत्व यातून मोकळे केले. जगाच्या इतिहासात मानवमुक्तीची जी महानतम कामे झाली त्यात हे काम चिरस्मरणीय ठरेल. शेवटी राहाते ते गांधीजींचे सर्वांत श्रेष्ठ कार्य. त्यांनी ‘अहिंसक प्रतिकाराचा’ सिद्धांत मांडून जगात स्वातंत्र्य, न्याय व शांतीच्या स्थापनेचे साधन म्हणून प्रस्थापित केले.

एक महापुरूष म्हणून गांधीजींची जगाच्या भूतकाळात झालेल्या मोठमोठ्या महापुरूषांशी सहज बरोबरी करता येईल. विलफर फोर्स, गॅरीसन आणि लिंकनसारखे ते गुलामांचे महान मुक्तिदाते होते. ‘अमोध प्रेमा’चे शिक्षक म्हणून ते संत फ्रान्सिस, थोरो आणि टॉलस्टायच्या रांगेत बसतात. सर्व काळातले सर्वश्रेष्ठ धार्मिक पैगंबर म्हणून लाओत्से, बुद्ध, झरथुष्ट आणि येशूच्या ते समकक्ष आहेत. पण या सर्वांपेक्षाही त्यांची महत्ता एक नरोत्तम, एक पुरूषश्रेष्ठ म्हणून अधिक आहे. मी माझ्या एका पुस्तकात त्यांच्याविषयी लिहिलयं- 'ते नम्र, विनयशील व अत्यंत प्रेमळ आहेत. त्यांची विनोदबुद्धी अजेय आहे. त्यांची सरळता मनाला मोहून टाकते. ते शांतिब्रह्म

आहेत. त्यांचे हृदय फुलाप्रमाणे कोमल पण शरीर वज्रासारखे कठोर आहे. त्यांची एकाग्रता पारदर्शक आहे, आणि त्यांची सत्याची उपासना अविचल आहे.'

## अमृतलाल बेगड

## ८०. अहिंसेला युद्धाच्या मैदानात आणणारे

कुठल्याही देशाचा इतिहास म्हणजे तेथल्या राजांचा, त्यांनी एकमेकांवर केलेल्या आक्रमणांचा, युद्धांचा इतिहास असतो. एकार्थाने इतिहास म्हणजे हिंसेचा इतिहास पण जर मानवजात हिंसेतच मग्न राहिली असती तर एव्हाना ती कायमची नष्ट झाली असती. ती वाचली याचे कारण हिंसेसोबतच अहिंसाही होती. जसा हिंसेला इतिहास आहे तसा अहिंसेलाही इतिहास आहे. अहिंसेचा उद्भव पहायचा असेल तर सुरूवात कृष्णापासून करायला हवी, महाभारत युद्ध होऊ नये यासाठी त्याने शक्यतो सर्व प्रयत्न केले. पांडवांचा दूत बनून कौरवांच्या सभेत गेला, पण दुर्योधनाच्या हट्टाग्रहामुळे युद्ध टळू शकले नाही. स्वतःची विशाल सेना कौरवांना सोपवून स्वत: पांडवांच्या पक्षात राहिला. पण अट सांगितली की, मी शस्त्र हाती घेणार नाही. हे सांगून आजपासून पाच हजार वर्षांपूर्वी कृष्णाने एक महत्त्वाचा संदेश लोकांना दिला. हिंसा अनिवार्य असेल पण अहिंसा हीच श्रेष्ठ आहे. महाभारत अनिवार्य बनले होते. एक आवश्यक अरिष्ट म्हणून ते स्वीकारण्याशिवाय पर्याय नव्हता. पण हिंसेने कुणाचेही भले होणार नाही, म्हणून मी हिंसेच्या पक्षात असणार नाही, असे त्याने निक्षून सांगितले. युद्धाच्या शेवटी पांडवांचा विजय झाला पण तो भीषण मानव-संहार पाहून युधिष्ठिराच्या मुखी हे शब्द घालून व्यासांनी हिंसेची निरर्थकताच व्यक्त केली. कृष्णानंतर बऱ्याच वर्षांनी आले बुद्ध व महावीर. दोघे समकालीन, त्यांनी स्थापिलेल्या बौद्ध आणि जैन धर्मांनी अहिंसेची प्रतिष्ठा वाढवली. कलिंगच्या युद्धात झालेला नरसंहार पाहून अशोकचा हिंसेवरचा विश्वास उडाला. त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. अहिंसा तर जैन धर्माचा प्राण आहे. त्याशिवाय अनेक साधू संतांनी पण अहिंसेचा महिमा गायिला आहे.

शेवटी येतात गांधीजी, त्यांनी अहिंसेला गती दिली. गांधीजी नव्हते तोपर्यंत अहिंसा व्यक्तिगत मोक्ष प्राप्त करण्यासाठी होती. गांधीजींनी सांगितले की सत्य आणि अहिंसेचा उपयोग शस्त्रासारखाही होऊ शकतो. हिंसेच्या हत्यारापेक्षा ते अधिक शक्तिशाली आहे. तुम्ही तिला कोटी-जन-व्यापी आंदोलनाचे रूप दिलेत. तिला युद्धाच्या मैदानात उभी केली आणि तिचा उपयोग एका विशाल देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केला.

आपण पुन्हा कुरूक्षेत्राकडे वळू या. ज्याच्या नेतृत्वाखाली पांडव लढले त्या कृष्णाने शस्त्र उचलेले नाही हे खरे पण सर्व पांडवसेना शस्त्रानिशीच लढली. समजा कृष्णाने असे सांगितले असते की, 'जसे माझ्या हातात शस्त्र असणार नाही तसे भीमार्जुनाच्या हातातही असणार नाही. आमची सर्व सेना नि:शस्त्र असेल, पितामह भीष्म, गुरू द्रोणाचार्य, चालवा धनुष्य बाण ! आम्ही इथे मारायला नव्हे तर मरायला आलो आहोत. आम्ही तुमच्या अन्यायापुढे वाकणार नाही. सर्व ताकदीनिशी त्याचा विरोध करू. पण विरोध हिंसेने नसेल,  अहिंसेने असेल. शस्त्र उचलणे तर दूरच पण आमच्या मनात तुमच्याविषयी प्रेमच आहे. आम्ही तुम्हाला प्रेमाने जिंकू.

कृष्णाने असे नाही सांगितले पण गांधीजींनी सांगितले. केवळ सांगितलेच नाही तर करूनही दाखवले. जगातल्या सर्वांत बलशाली ब्रिटिश साम्राज्याला त्यांनी बजावले. ‘आम्हाला गुलाम करण्याचा तुम्हाला कुठलाही अधिकार नाही. तुमच्या या अन्यायाचा आम्ही विरोध करू पण हिंसेने नव्हे, सत्य आणि अहिंसेने. तुम्हाला गोळ्या चालवायच्या आहेत ? चालवा, लाठीचार्ज करा. तुरुंगात डांबा. आम्ही तुमच्याशी वाकडा शब्दसुद्धा बोलणार नाही. आमच्या मनात तुमच्याविषयी संताप, चीड, राग, द्वेष नाही. प्रेमच आहे' जगात असे कधीही घडले नव्हते. गांधीजींनी अहिंसेचे ‘राष्ट्रीयकरण’ केले. अहिंसेच्या मार्गाने या गुलाम देशाला स्वतंत्र करून गांधीजींनी शूरवीरतेची नवी परंपरा कायम केली. सगळ्या मानवजातीसाठी हा सुखमय संदेश आहे.

## नगीनदास संघवी

## ८१. एक छोटे कर्णफुल

गांधीजी हरिजन फंडासाठी सर्व देशात फिरत होते. डेहराडूनमध्ये जवळपासच्या खेड्यातून दर्शनाला आलेल्या स्त्रियांमध्ये त्यांनी एक नवा खेळ सुरू केला. फंड गोळा करण्यासाठी ते स्वत: सभेत उतरले व ओंजळ पसरून फिरायला लागले. प्रभावित झालेल्या स्त्रियांनी त्यांच्या ओंजळीत पै, पैसा, नाणी, दागिने जे जमेल ते टाकले. ओंजळ भरली की गांधीजी ती तेथेच रिकामी करीत व पुन्हा रिकामी ओंजळ पुढे करून सांगत... 'माझी ओंजळ रिकामी आहे भरून द्या' अर्धा तास हा खेळ चालला. सभा संपली. खाली पडलेली नाणी, नोटा, दागिने एकत्र करण्याचे काम महावीर त्यागींवर सोपवून गांधीजी त्यांच्या कामाला निघून गेले. चिल्लर नाणी, नोटा, दागिने एकत्र करून रीतसर त्यांची एक यादी बनवून महावीर त्यागींनी गांधीजींना पाठवली व स्वत: आनंदाने घरी गेले.

तेवढ्यात रात्री साडे नऊ वाजता त्वरित हजर होण्यासंबंधीचा गांधीजींचा आदेश मिळाला. त्यागी पोहचले तेव्हा गांधीजी थोडे रागातच होते. “काम अंगावर घेतले तर ते पूर्ण करायला हवे. याची जबाबदारी समजते की नाही ?” ते म्हणाले, महावीर त्यांच्या तोंडाकडे आ वासून पहातच राहिले. “सभेत खाली राहिलेल्या सर्व वस्तू का गोळा केल्या नाहीत ?” महावीर यांनी भीत भीत सांगितले, “सर्वच वस्तू तर गोळा केल्या आहेत ?” “नाही” गांधीजी म्हणाले, “कोण म्हणतं असं?” महावीरने विचारले. हातातले एक लहान कर्णफुल उंच करीत गांधीजी म्हणाले, “हे कर्णफुल सांगतेय, ह्याच्या बरोबरीचे दुसरे कर्णफुल नाहीये. कुठलीही बाई केवळ एका कानातला दागिना देणार नाही, याची जोडी असलीच पाहिजे, तुम्हाला ते मिळाले नाही म्हणजे तुम्ही काम जबाबदारीने पार पाडले नाही.”

महावीर त्यागी त्यांच्या आठवणीत लिहितात, त्या रात्री किटसनच्या बत्त्या घेऊन आम्ही पुन्हा सभास्थानी पोहचलो. बैठकीच्या सर्व सतरंज्या, ताडपत्र्या उलट्या सुलट्या केल्या. सुदैवाने ते छोटे कर्णफुल सापडले. पण त्यासोबत चिल्लर आणि चुरगळलेल्या नोटींसहीत किमान दोनशे रू. ची रक्कमही मिळाली. ती सर्व एकत्र करून बापूजींना पाठवली. पण पुढे काही दिवस तरी त्यांना तोंड दाखवायला लाज वाटत होती !

## चंद्रशेखर प्रा. शुक्ल

## ८२. गरिबीवर मात करणारा आळस

आळस हा हिंदुस्थानी प्रजेचा जुना आणि खूप मोठा रोग आहे. गरिबी ही सुद्धा व्याधी आहे. पण गरिबीचे मूळ आळसात आहे हे लक्षात घ्यायला हवे. हिंदुस्तानच्या गरिबीवर एक उपाय म्हणून गांधीजींनी चरखा व खादी सांगितले. त्याचा प्रचार करता करता १९२४-२५ च्या प्रवासात लोकांचा त्यांना जो अनुभव आला त्यावरून त्यांचे मत झाले की, या प्रजेचा आळस गरिबीवरसुद्धा मात करणारा आहे.

शरीर आळसामुळे ज्यावेळी रिकामे पडून राहाते; त्यावेळी मन रिकामे नसते. निरूद्योगी मन अनेक विचार-विकारांनी भरलेले असते व ते शेवटी स्वत:चा आणि इतरांचाही सत्यानाश करते. आपल्यात एक म्हण आहे. 'रिकामा माणूस स्वप्ने पाहतो' इंग्रजीतही म्हणतात 'रिकामे मन सैतानाचे घर असते’ जगातल्या अनेक गुन्ह्याच्या व दंगलीच्या मागे रिकाम्या माणसांचा हात मोठा असतो.

प्राचीन रोमचे साम्राज्य देश-परदेशात विखुरले होते. खंडणी रूपाने त्या देशातून आलेले धान्य रोमच्या प्रजाजनांना फुकट वाटले जात असे. जी माणसं आधी शेतीवर मेहनत करायची ती स्वावलंबी होती. पण फुकट धान्य मिळायला लागल्याबरोबर ती निष्काळजी बनली. कालांतराने या वर्गात दंगली माजल्या. परिश्रम करण्याची सवय गेल्यामुळे लोक विलासी-आळशी झाले. रोमच्या पतनात या गोष्टीचा मोठा सहभाग होता. जंगली पण बलवान प्रजेने उत्तरेकडून येऊन सारे रोम पादाक्रांत केले.

आपल्या देशात पण मध्ययुगाच्या प्रारंभी वैभव, विलास व आळस वाढले. त्यामुळे लढायात आपण हरलो व पराभूत झालो. परिश्रम केल्याशिवाय खायला मिळणे म्हणजे स्वत:ला आणि प्रजेला शापित करणे आहे. समाजाची, देशाची व जीवनाची नवरचना करावयाची असेल तर अविश्रांत परिश्रम करायला हवेत. जगातल्या सर्व महापुरूषांमध्ये जर एक समान गुण असेल तर तो अविरत परिश्रम करण्याचाच आहे.

# ८३. स्वच्छतेचा धडा

परिश्रमाबाबत आपणा सर्वांनाच लष्करापासून खूप काही शिकता येईल. लष्कराच्या सैनिकाला या करता मान असतो की, तो जीव तळहातावर घेऊन देशाचे रक्षण करतो. त्याच्याविषयी आणखी एका कारणाने आदर वाटतो. त्याचे जीवन नियमबद्ध व शिस्तशीर असते.

लष्कराची छावणी कमाल स्वच्छ असते. त्याचा एक धडा आम्हाला गांधीजींनीच दिला होता. १९३४ च्या हरिजन यात्रे दरम्यान आम्ही कुर्गला होतो. अगदी पहाटे उठून निघायचे होते. तेवढ्यात गांधीजी आमच्या खोलीत आले. सर्वत्र कागदाचे कपटे पडलेले व कचरा साठलेला त्यांनी पाहिला. ते रागाने म्हणाले, 'ही जागा अशी सोडून जाणार होतात ? लष्कर ज्या ठिकाणी मुक्काम करते ती जागा सोडताना पूर्वीपेक्षा अधिक स्वच्छ करून जाते, तसा नियमच आहे. हा नियम आपणही पाळायला हवा. रोज जी जागा सोडाल ती पूर्णपणे साफसूफ करून नंतर सोडा. यात काडीचीही चूक झालेली मला खपणार नाही. मी लक्ष ठेवीन.’

# महादेव देसाई

## ८४. वियोग दु:ख

साजने जत्ता सौ आखोथी आंसू खरे
जे दी लोचन वर्षे लोही, ते साजन साचा जाणिया।।

(प्रिय व्यक्तीच्या जाण्याने सर्वांच्याच डोळ्यात अश्रू येतात. पण ज्या दिवशी डोळ्यातून रक्त वाहते, तेव्हा प्रिय व्यक्तीची किंमत कळते) सन १९१७ चा डिसेंबर महिना होता. मी त्या वेळेला नुकताच गांधीजींसोबत काम करायला लागलो होतो. मुस्लीम लीगने कलकत्त्याच्या बैठकीत छिंदवाड्यात अपहृत केलेल्या अलीबंधूंपैकी एकाला अध्यक्ष केले व त्याची खुर्ची रिकामी ठेवली. गांधीजींना तेथे जाण्याचे खास आमंत्रण होते. दुपारी आम्ही तेथे गेलो, उर्दूत बोलणाऱ्यांची झिम्मड चालू होती. प्रत्येक बोलणारा क्षणोक्षणी जे काही उच्चारायचा समोरची जनता 'आमीन! आमीन!' म्हणून तत्काळ त्याला डोक्यावर घ्यायची. प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रु वाहत होते आणि काहीच्या  हुंदके देण्याचे व रडण्याचे स्वरसुद्धा कानावर पडायचे. या वेळेला गांधीजींना बोलायला सांगितले गेले.

ते या रूदनात सामील झाले नाहीत. त्यांनी श्रोत्यांना सरळच प्रश्न विचारला 'हा जो अश्रूंचा पूर येथे वाहतो आहे, त्यातले किती अश्रू खरे आहेत? ते तुमच्या हृदयपासून निघाले आहेत का ? जर तुम्हाला शोकतअली आणि महंमद अलीच्या वियोगाचे इतके दु:ख होत असेल तर तुमच्या डोळ्यातून आज पाणी नव्हे पण रक्त वाहायला हवे. हे तुमचे अश्रू तेव्हाच खरे मानले जातील, जेव्हा या दोघा बंधूंना सोडविण्यासाठी तुम्ही प्रतिज्ञाबद्ध असाल, त्यांच्यासाठी प्राण पाखडायलासुद्धा तयार असाल.' हेच प्रश्न आज आपण स्वत:ला विचारू शकतो. गांधीजींना निरोप द्यायला आलेले सगळे स्वजन खरे होते? त्यांच्या निर्वाणाच्या वेळी अनेक घरामध्ये कोपऱ्यात बसून अश्रू ढाळणाऱ्याचे अश्रू खरे होते? जर खरे असतील तर गेल्यानंतर आपण काय करणार आहोत? वियोग दु:खाच्या विव्हलतेचे चित्र आपल्या साहित्यात खरे तर विश्वसाहित्यात- जसे महाभारतामध्ये आढळते तसे इतरत्र आढळत नाही. भरताला रामाला निरोप देण्याचे भाग्य मिळाले नाही. गांधीजींना निरोप देताना त्यांचा संदेश ऐकण्याचे जे भाग्य आपल्यातल्या काहींना

मिळाले ते भाग्य भरताच्या ललाटी नव्हते. आपल्या भावाच्या वियोगाची बातमी त्याला अयोध्येत आल्यावर कळली. अयोध्येत त्याचे अश्रू पुसून, 'संसारात दु:ख क्षणिक आहे आता तू राज्य सांभाळणे इष्ट' असे समजवणारे स्वजन गुरूजनही खूप होते व भरताने त्यापैकी कुणाचाही सल्ला ऐकला नाही. त्याला ते सल्ले विषासमान वाटले. रामचंद्राला बघितल्याशिवाय जगणे त्याला व्यर्थ वाटायला लागले. तत्क्षणी त्याने रामाच्या दर्शनाला जाण्याचा, त्यांचे चरणस्पर्श करून पुन्हा त्याला अयोध्येला आणण्याचा निर्धार जाहीर केला. हा निश्चय केल्यानंतर तुलसीदास त्याला सरळ रामाकडे नेत नाही. राम-भरत भेट होण्यापूर्वी भरताच्या अश्रूंनी भिजलेल्या प्रत्येक पावलाचे, प्रत्येक स्थळाचे वर्णन कवीने केले आहे. घाई-घाईने रथात बसून तो निघतो. गंगा पार करताना रामाचा परमभक्त गुह त्याला भेटायला येतो. रामाचा भक्त म्हणजे आपल्याला पूजनीय आहे, असे मानून रथातून उतरून पायी चालत तो गुहापर्यंत जातो. व त्याला प्रणाम करतो. तो रामाला ज्या श्रद्धेने आणि भक्तीने पहातो त्याच श्रद्धेने व भक्तींने तो गुहालाही बघतो. रामचंद्र कुठे गेले आहेत हे त्याच्याकडून जाणून घेतल्यावर भरत गुहाकडे पाठ फिरवत नाही. राम कुठे उतरले, कुठे झोपले, कुठे बसले ते सर्व विचारतो व तेथली रज कपाळी लावतो. रामनामाचे त्याचे उच्चारण सतत चालू असते व डोळ्यातून अश्रू सरत असतात. गुहासोबत रामाकडे जाणे, विनवणी करणे, शेवटी रामाच्या पादुका घेऊन खिन्न हृदयाने नंदीग्रामाला येणे सर्वांचे वर्णन कठीणातल्या कठीण हृदयालासुद्धा पाझर फोडणारे आहेत. रामाची वनवासातील दु:खे, सीतेची दु:खे विसरता येतील पण भरताचे वियोग दु:ख, त्याची १४ वर्षांची उग्र तपस्या, प्रभू प्राप्तीसाठी प्रभू एवढेच दु:ख सहन करण्याची त्याची प्रतिज्ञा विसरता येणार नाही. अशी पराकाष्ठेची भक्ती आणि वियोग दु:खानंतर अशा पराकाष्ठेचे तप ज्या देशाने आचरले त्या देशात धर्माचा इतका क्षय व्हावा की तो स्वत:चे वियोग दु:ख विसरून विलास प्रियतेत रत व्हावा ? तुरुंगात जाण्याआधी गांधीजी आपला संदेश जनतेपर्यंत पोहचवायला विसरले नाहीत. ‘पतंग नृत्य' सारखे लेख लिहून प्रजेच्या रोगाचे निदान त्यांनी स्पष्टपणे केले. गांधीजीसाठी रडणाऱ्या किती लोकांनी त्यांचा संदेश अंमलात आणला ? जेव्हा डोळ्यातून अखंड रक्ताची धार लागायला हवी, जेव्हा देशा अखंड विरहाग्नी पेटत रहायला हवा, तेव्हा जेथे पहावे तेथे एक निराशाजनक औदासिन्य आणि मृत्यूकडे धाव घेणाऱ्या नौबती झडत असताना दिसतात. या देशाला वियोग दु:ख आहे, असे कोण म्हणेल?

## रवींद्रनाथ टागोर

## ८५. हृदयी ज्वालामुखी आणि नयनी अमृतधार

अगदी योग्यवेळी महात्मा गांधी आले व भारताच्या कोट्यवधी, निराधार कंगालांच्या दारात उभे राहिले. थेट त्यांच्यासारखी भाषा ते बोलत व वेशही तसाच होता. प्रेमाचा तो अवतार भारताच्या भाग्यात अवतरला आणि सारी दारे सताड उघड झाली. गांधीजी मोठे राजकारणी पुरुष आहेत. मोठमोठ्या संघटना उभ्या करणारे आहेत. श्रेष्ठ सुधारक आहेत. या सर्वांपेक्षाही त्यांची अधिक महानता एक माणूस म्हणून आहे. तसे अगदी ठाम आदर्शवादी असूनही ते आदर्शांपेक्षा मानवाला अधिक किंमत देणारे आहेत. त्यांच्या जवळ बाहुबलही नाही व धनसंपत्तीही नाही. पण त्यांच्या जबरदस्त प्रभावामुळे एक पराधीन प्रजा जुलुमी सत्तेसमोर माथा उंचावून उभी राहिली. लोकांना त्यांच्यावर आस्था आहे आणि स्वत:च्या श्रद्धेसाठी ते मरायलाही तयार आहेत व कुठलेही दु:ख सहन करायला. हा सुद्धा एक चमत्कार आहे की अनेक शतकापासून चिरडले गेलेले लोक आता रस्त्यावर आले आहेत. दुसऱ्या कुणालाही इजा न पोहचवता ते स्वत: सर्व काही सहन करीत आहेत आणि या यातना सहन करूनही ते विजयी होत आहेत. गांधीजींच्या यशाचे मूळ त्यांच्या ज्वलंत आत्मनिष्ठेत आणि अपार त्यागात आहे. त्यांचे जीवन म्हणजे अखंड त्याग. त्यांना कुठल्याही सत्तेचा मोह नाही. धन, मान, पद, किर्ती यापैकी कशाचाही नाही. त्यागाची त्यांची शक्ती दुर्जेय आहे; कारण असीम निर्भयतेशी ती बांधली गेली आहे. मोठे-मोठे महाराज, शहेनशहा, बंदुका, संगीनी, तुरुंग, यातना काय पण प्रत्यक्ष मृत्युही त्यांचे धैर्य अस्थिर करू शकणार नाही. त्यांना कदाचित यश मिळणारही नाही. ज्या प्रकारे बुद्ध निष्फळ ठरले. येशू निष्फळ झाले तसे ते देखील मानवजातीला अन्यायी आचरणातून बाहेर काढू शकणार नाहीत. पण हे सदासर्वदा लोकांच्या स्मरणात राहील की असा एक मनुष्य होता ज्याने स्वत:चे सर्व जीवन येणाऱ्या युगासाठी एक दृष्टांत म्हणून उभे केले.

# लुई फिशर

## ८६. गांधीजी आणि रवींद्रनाथ टागोर

गांधीजी आणि टागोर समकालीन होते. दोघेही भारताच्या पुनरुत्थानासाठी कटिबद्ध होते, पण गांधीजी धान्याच्या शेतासारखे होते तर टागोर गुलाबाच्या बागेसारखे. गांधीजी कर्मरत हातांसारखे होते, तर टागोर सुरेल कथांसारखे. गांधीजी सेनापती होते तर टागोर अग्रदूत. गांधीजी कृश तपस्वी होते तर टागोर उमराव पुरूष. परंतू भारत आणि मानवजातीविषयी दोघांमध्ये जे अपार प्रेम होते त्यात एकरूपता होती.

## प्यारेलाल नैय्यर

## ८७. लहान लहानशा गोष्टींमुळेच जीवन घडते

'अहिंसा म्हणजे 'नितांत शुद्धी' –आंतरिक आणि बाह्य शुद्धी,' असे गांधीजी एकदा म्हणाले होते. ते म्हणाले की, आज खेडी कंगाल झाली आहेत. शहरांना थोडे राहण्यायोग्य बनविण्यात आले पण खेड्यात राहणाऱ्या कोट्यवधी लोकांना अज्ञानात सडू देण्यात आले. तेथे प्यायला साधे पाणीसुद्धा मिळत नाही. खेड्यात लोकांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि त्यांच्या डोक्यात अंधार माजला. रोखू शकता येईल अशा अनेक रोगांनी प्रत्येक खेडे पिडलेले असते. प्रत्येक गावात अनेक ठग भगत होते. ते गावातल्या लोकांचा बळी घेत राहिले. शरीर आणि मनाला लागलेल्या त्यांच्या सवयींच्या रोगाचे निवारण करण्याच्या कामाला आपण सुरुवात करायला हवी. देशात लोकांचा तुटवडा नाही. आवश्यकता आहे योग्य त्या सामूहिक पुरुषार्थाची. मग वाईट लोकांना जागा देणारे वातावरण तेथे राहणार नाही. लोकांच्या सहकारामुळे गरिबी व अज्ञान दूर होतील आणि तसे झाले तरच त्यांच्यात सौहार्द्र निर्माण होईल.

अशा रितीने अहिंसेची शक्ती प्रदर्शित करीत, गावातल्या लोकांच्या रोजच्या अनुभवांना स्पर्श करणाऱ्या लहान-लहान बाबींविषयी गांधीजी प्रवचन करीत. त्यांच्या मनात ही कामे मोठी व ही कामे छोटी असा भेदच नव्हता. सत्याग्रहीचे प्रत्येक कार्य मग ते त्याच्या खासगी जीवनाला किंवा सार्वजनिक जीवनाला स्पर्श करणारे असो सचोटीने युक्त असायलाच हवे. त्याच्या लहान किंवा मोठ्या कार्यामुळे सत्याचे दर्शन व्हायला हवे. लहान-लहान गोष्टीमुळेच किंवा प्रत्येक मनुष्य करू शकेल अशा सामान्य वस्तूंनीच माझे जीवन घडवले, असे गांधीजी म्हणत. म्हणून ते म्हणायचे जे मी साधले ते प्रत्येक व्यक्ती साध्य करू शकतो.

# ८८. शेवटचा दिवस

३० जानेवारीच्या त्या दैवनिर्मित शुक्रवारी गांधीजी असा विचार करीत होते की, दोन दिवसानंतर सेवाग्रामला जावे. ‘आपण तेथे पोहचण्याची तारीख तारेने त्यांना कळवायला हवी का ?' असे त्यांना विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, ‘तारेसाठी पैसे का घालवायचे ? येथून निघण्याची तारीख मी संध्याकाळच्या प्रार्थनासभेत जाहीर करीन. सेवाग्रामवाल्यांना तार मिळेल त्या आधीच वर्तमानपत्रातून ते कळेल.’ त्या दिवशी आंघोळ करून आल्यावर ते फारच प्रसन्न वाटत होते. आश्रमातल्या मुलींच्या कृश शरीराविषयी त्यांनी त्यांची थट्टा केली. कुणीतरी सांगितले की एक भगिनी आज सेवाग्रामला जाणार होत्या. परंतू त्यांना कुठलेही वाहन मिळाले नाही म्हणून राहिल्या. ऐकून गांधीजी म्हणाले-'तुम्ही चालत चालत स्टेशनावर का गेला नाहीत ?' गांधीजींची अपेक्षा होती की जवळ कुठलेही साधन उपलब्ध नसले तरी प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढायला प्रत्येकाने तयार असायला हवे. ते काम सोपवतील त्यात सुविधांचा अभाव वगैरे अडचणी सांगताच येत नसत. दक्षिण हिंदच्या प्रवासात एकदा वाहनात पेट्रोल संपले, तर ते तेरा मैल दूर अंतरावर असलेल्या स्टेशनावर पोहचण्यासाठी आपले सगळे सामानसुमान पाठीवर घेऊन निघायला तयार झाले होते. त्यांना खूप खोकला होता.

तो कमी व्हावा म्हणून कुणीतरी पेनिसिलीनची गोळी चोखण्याविषयी सांगितले. तेव्हा रामनामाच्या शक्तिनेच बरा होण्याचा आपला निर्धार पुन्हा एकदा त्यांनी प्रगट केला. त्यांच्या डोक्यावर मालिश करणाऱ्याला ते म्हणाले, ‘जर मी कुठल्याही रोगाने वारलो, अगदी लहानशा पुटकळीमुळेसुद्धा – तरी सर्व जगाला ओरडून सांग की हा दंभी महात्मा होता. त्यामुळे मी जेथे कुठे असेन तेथे माझ्या आत्म्याला शांती मिळेल. मग भले माझ्यासाठी लोक तुला शिव्या देवोत. रोगाने मी मेलो तर मला दंभी महात्माच ठरव. पण जर मला कुणी गोळी मारली आणि तरी तोंडातून एकही सुस्कारा न सोडत मी शेवटपर्यंत रामनाम घेत राहिलो तर लोकांना हे सांग की हा खरा महात्मा होता’ दुपारी चार नंतर गांधीजींनी चरखा चालवता चालवता सरदारांशी तासभर गप्पा केल्या. गप्पा गोष्टी करता करताच संध्याकाळचे जेवण घेतले. प्रार्थनेची बेळ होत आली होती. मध्ये बोलण्याची आभाला हिंमत झाली नाही. पण गांधीजींनी घड्याळाकडे पाहिले व आभाकडे एक नजर टाकली. शेवटी सरदारांना ते म्हणाले, 'आता मला गेल्याशिवाय गत्यंतरच

नाही.’ ते उभे राहिले व आभा आणि मनूच्या खांद्यावर दोन्ही हात ठेवून, त्यांच्याशी विनोद करीत प्रार्थना स्थळाकडे निघाले. प्रार्थनेच्या चौथऱ्याजवळ पोहचता पोहचता ते म्हणाले, 'दहा मिनिटे उशिरा पोहचणे मला मुळीच आवडत नाही. मला वाटते की, ठीक पाचच्या ठोक्याला मी प्रार्थनेत असावे.’ हे बापूजींचे शेवटचे शब्द होते.

# वैष्णव जन तो...

वैष्णव जन तो तेने कहिए जे पीड पराई जाणे रे;

परदु:खे उपकार करे तोये, मन अभिमान न आणे रे।

सकल लोकमां सहुने वंदे, निन्दा न करे केनी रे;

वाच, काछ, मन निश्चल राखे, धन-धन जननी तेनी रे।-२

समदृष्टि ने तृष्णा त्यागी, परस्त्री जेने मात रे;

जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथ रे।-३

मोह माया व्यापे नहीं जेने, दृढ वैराग्य जेना मनमां रे;

रामनामशुं ताली लागी, सकल तीरथ तेना तनमां रे।-४

वणलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध निवार्या रे;

भणे नरसेंयो तेनुं दरशन करतां कुल अेकोतर तार्या रे।-५

* * * * *